जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# भातकुलीतील बोरखडी व इस्माइलपुर ठरले स्व गणना पूर्ण करणारे जिल्ह्यातील पहिले गाव



**अमरावती/प्रतिनिधी-** भारत सरकारच्या जनगणना विभागामार्फत दिनांक १ मे पासून स्व गणना सुरू झालेली आहे. याबाबत जिल्हाधिकारी अमरावती यांनी नागरिकांना स्व गणना पूर्ण करण्याचे आवाहन केले होते.सदर आव्हानाला जिल्ह्यातील नागरिकांनी उत्तम प्रतिसाद देत भातकुली तालुक्यातील बोरखडी खू व इस्माइलपुर या गावातील सर्व कुटुंबांनी स्व गणना पूर्ण केली.अशा प्रकारे १०० टक्के स्व गणना पूर्ण करणारे जिल्ह्यातील पहिले गाव बोरखडी खू व इस्माइलपुर ठरले.या गावांचा आदर्श घेत जिल्ह्यातील जास्तीत जास्त कुटुंबांनी १५ मे पर्यंत स्व गणना पूर्ण करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी अमरावती यांनी केले.निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे व तहसीलदार अक्षय मांडवे यांचे मार्गदर्शनात सदर काम पूर्ण करण्यात आले. मंडळ अधिकारी संतोष धुर्वे,गौरव सुरपाटणे, ग्राम महसूल अधिकारी व्ही बी बिहाडे, व्हि. बी दहाट, धम्मपाल वानखडे,महसूल सेवक सीमा वानखडे,प्रशांत बिरे यांनी याबाबत विशेष परिश्रम घेतले.

# छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३६९ वा जन्मोत्सवा निमित्य मानवंदना कार्यक्रम

**■ लोक गायक अवधूत गांधी यांचा शिववाणीतून रंगणार लोकसंगीत सोहळा**
**■ यश खोडके यांची पत्र परिषदेत माहिती**

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्वराज्याचे दुसरे छत्रपती, अपराजित योद्धा, स्वराज्य रक्षक, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३६९ वा जन्मोत्सवानिमित्य दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा छत्रपती संभाजी महाराज स्मारक समिती व शोध प्रतिष्ठान,अमरावतीच्या वतीने गुरुवार दिनांक १४ मे २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज चौक नवसारी रिंग रोड अमरावती येथे मानवंदना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य संजय खोडके तसेच प्रमुख अतिथी म्हणून अमरावती विधानसभा मतदार संघाच्या आमदार सुलभा खोडके तसेच विशेष अतिथी म्हणून महाराष्ट्राला सुपरिचित असलेले प्रख्यात लोकगायक व कलावंत अवधूतजी गांधी यांची उपस्थिती लाभणार आहे. मानवंदना कार्यक्रमा नंतर अवधूतजी गांधी हे आपल्या सुमधुर वाणीतून शिव-शंभू यांची ख्याती विशद करणाऱ्या भक्ती - शक्ती संगीतमय कार्यक्रमाची प्रस्तुती देणार आहे. या रंगतदार कार्यक्रमातून मराठामोठ्या संस्कृतीचे दर्शन व वारकरी सेवेचा वारसा जपत शिवकालीन घटना व प्रसंगांना उजाळा मिळणार आहे. याशिवाय आकर्षक रोषणाई , सजावट, ढोल पथक, शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा, वादन व दमदार आवाज हे या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण राहणार आहे. अशी माहिती शोध प्रतिष्ठान अमरावतीचे अध्यक्ष यश खोडके यांनी पत्रकार परिषदेतून दिली.

पत्रकार परिषदेत माहिती देतांना यश खोडके यांनी सांगितले कि, कधीकाळी हॉटेल व धाबेवाल्यांचा चौक अशी ओळख असलेल्या नवसारी -रिंग रोड चौकाचे स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज




चौक असे नामकरण झाल्याने एक सुसंस्कारित चौक म्हणून नवीन ओळख प्राप्त झाली आहे. अमरावतीच्या आ. सुलभा खोडके यांच्या स्थानिक विकास निधीतून चौकाचे सौंदर्यीकरण करण्यात आले आहे. त्याठिकाणी शंभूराजांचे म्युरल साकारण्यात आले असून महाराजांच्या अलौकिक शौर्य व पराक्रमाच्या विविध छटांचे दर्शन घडविणारी भिंतीचित्रे साकारण्यात आली आहे. मागील वर्षी २०२५ मध्ये स्मारकाचे उदघाटन झाल्यानंतर आता त्याठिकाणी दरवर्षी १४ मे रोजी जन्मोत्सव ,१६ जानेवारीला महाराजांचा राज्यभिषेक दिवस तसेच ११ मार्च रोजी बलिदान दिवस निमित्य मानवंदना कार्यक्रमाचे आयोजन स्मारक समितीच्या वतीने केले जाते. त्याचबरोबर समितीच्या वतीने स्मारकाची संपूर्ण निगा राखली जात असून देखभाल केली जाते. स्मारकस्थळी दरवर्षी सामाजिक कार्यक्रम सुद्धा होत असल्याने आज स्वराज्यरक्षक संभाजी महाराज चौक हे तमाम शिव-शंभू प्रेमींचे एक प्रेरणास्थान बनले आहे. त्यामुळे स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांना मानवंदना अर्पण करण्यासाठी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन सुद्धा यश खोडके यांनी पत्रकार परिषदेतून केले आहे. या पत्रकार परिषदेला माजी महापौर ॲड. किशोर शेळके, मनपा स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, मनपा नगरसेवक चंद्रकांत उर्फ चंदू खेडकर,स्वराज्य रक्षक छ. संभाजी महाराज स्मारक समिती अमरावतीचे अध्यक्ष संकेत महल्ले, सचिव आकाश हिवसे, कार्यक्रमाचे निमंत्रक ऋतुराज राऊत, मनीष पाटील, अभिमन्यू तायवाडे , सार्थक खोरगडे आदींसह आयोजन समितीचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

पान १ व १० वरून

## केरळमधून सीकरला पोहोचले

**एकाच हस्ताक्षरात लिहिलेले ३००अ प्रश्न, १५० परीक्षेत आले**

प्रश्न बँक हाताने लिहिलेली आहे आणि तिचे हस्ताक्षरही एकच आहे. प्रश्न बँकमध्ये फिजिक्स, केमिस्ट्री आणि बायोलॉजीचे ३०० हून अधिक प्रश्न होते. हे सर्व हाताने लिहिलेले होते आणि त्यांचे हस्ताक्षरही एकच होते. यापैकी १५० प्रश्न नीटच्या पेपरमध्ये जसेच्या तसे आले. पेपरमध्ये एकूण १८० प्रश्न सोडवायचे असतात आणि प्रत्येक प्रश्न ४ गुणांचा असतो. म्हणजेच, ७२० पैकी ६०० गुणांचे प्रश्न थेट प्रश्न बँकमधून आले. तज्ञांच्या मते, एखाद्या विशिष्ट गेस पेपरमधून परीक्षेत काही प्रश्न जसेच्या तसे येण्याची शक्यता असते, परंतु इतक्या मोठ्या संख्येने प्रश्न येण्याची शक्यता सहसा नसते. आतापर्यंत कथित प्रश्न बँक किती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली, याचा आकडा समोर आलेला नाही, पण ही संख्या मोठी असण्याची शक्यता आहे. खरं तर, ज्यांना हे व्हाट्सापवर मिळाले, त्यात मेसेजसोबत फारवर्डेड मेनी टाइम्स असे लिहिलेले येत आहे. आता याचे धागेदोरे केरळ, राजस्थान, बिहार, महाराष्ट्रापर्यंत जोडले जात आहेत.

**२०२४ मध्येही पेपर लीक झाला होता** -२०२४ मध्येही ?क्क्र छक्र परीक्षा पेपरफुटीमुळे काही केंद्रांवर रद्द करण्यात आली होती. परीक्षा ५ मे २०२४ रोजी झाली होती. ६ मे रोजी NTA ने पेपरफुटीची बाब नाकारली होती. त्यानंतर बिहार (पाटणा) आणि झारखंड (हजारीबाग) येथे चौकशी झाली. चौकशीत पेपरफुटीचे पुरावे मिळाले आणि अनेक अटकसत्रही झाले होते. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने संपूर्ण परीक्षा रद्द करण्यास नकार दिला होता आणि काही केंद्रांवर १५३९ उमेदवारांची पुन्हा परीक्षा झाली होती. पेपरफुटीच्या आरोपांव्यतिरिक्त ६७ विद्यार्थ्यांना ७२०/७२० गुण मिळणे आणि एकाच केंद्रातून अनेक टापर येणे हे देखील मोठ्या वादाचे कारण ठरले होते.

## पहिली प्रश्नपत्रिका नाशिकमधून

खरेदी केली होती. त्यानंतर अधिक नफा मिळवण्यासाठी त्याने हीच प्रश्नपत्रिका हरियाणातील एका डॉक्टरला १५ लाख रुपयांना विकली. या व्यवहारातून त्याने अवघ्या काही वेळात ५ लाखांची कमाई केल्याचा संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे.तपासात असे समोर आले आहे की, नीट पेपरची पहिली कापी नाशिकमध्ये समोर आली. नाशिकहून हा पेपर हरियाणातील गुरु ग्राममध्ये पोहोचला. हरियाणात पोहोचल्यानंतर या पेपरचे १० संच तयार करण्यात आले आणि तिथून ते राजस्थान, बिहार, आंध्र प्रदेश आणि जम्मू-काश्मीरपर्यंत पसरले. इन्स्टाग्राम आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर ही प्रश्नपत्रिका वणव्यासारखी पसरली.अटकेपासून वाचण्यासाठी संशयित आरोपीने आपली ओळख लपवण्याचा प्रयत्न केला होता. त्याने आपली हेअरस्टाईल बदलली होती आणि टक्कलही केले होते. मात्र, नाशिक गुन्हे शाखेने तांत्रिक विश्लेषण आणि मोबाईल लोकेशनच्या आधारे सापळा रचून त्याला इंदिरानगर भागातून शिताफीने ताब्यात घेतले. राजस्थान सीबीआयने दिलेल्या माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.नीट पेपरफुटीचे गांभीर्य लक्षात घेता केंद्र सरकारने हा तपास सीबीआय कडे सोपवला आहे. या प्रकरणात जयपूरमधून अटक करण्यात आलेला मनीष हा मुख्य सूत्रधार असल्याचे बोलले जात आहे. नाशिकमधून अटक केलेल्या या तरुणाची आता सखोल चौकशी केली जाणार असून, यात आणखी काही मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता आहे. दरम्यान, या गोंधळामुळे ३ मे रोजी झालेली नीट परीक्षा रद्द करण्यात आली असून, पुढील परीक्षेची तारीख लवकरच जाहीर केली जाणार आहे. नीट पेपरफुटी प्रकरणाचा तपास सीबीआयकडे देण्यात आला असून आत्तापर्यंत हाती आलेल्या माहितीनुसार जयपूरमधून अटक करण्यात आलेला मनीष हाच पेपरफुटीचा मास्टरमाईंड असल्याचे दिसून येते. मनिषने प्रश्नपत्रिका प्रिंट होण्यापूर्वीच पेपरमधी संभावित प्रश्न माहिती करुन घेतले होते. पेपरीफुटीमुळे नीटची परीक्षा रद्द करण्यात आली असून सीबीआयमार्फत याप्रकरणाची चौकशी करण्यात येणार आहे. देशभरात गेल्याच आठवड्यात म्हणजेच ३ मे २०२६ रोजी नीटची परीक्षा घेण्यात आली होती. आता, नव्या परीक्षेची तारीख लवकरच जाहीर होईल, त्यासाठी परीक्षार्थीचे परीक्षा केंद्र ३ मे रोजीचेच राहणार असून विद्यार्थ्यांना नव्याने रजिस्ट्रेशन करण्याची गरज नाही. विद्यार्थ्यांकडून नव्या परीक्षेसाठी शुल्क घेतले जाणार नाही, मात्र नव्या परीक्षेसाठी नवे ओळखपत्र दिले जाणार आहे. विद्यार्थी,पालकांनी फक्त एनटीएच्या सूचनांवर लक्ष ठेवावे, असे आवाहन केंद्राकडून करण्यात आले आहे.

**परीक्षा रद्द, विद्यार्थ्यांमध्ये तणाव आणि चिंता**- देशभरात ३ मे रोजी झालेली NEET परीक्षा रद्द झाल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये मोठी चिंता आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी वर्षभर कठोर मेहनत घेत तयारी केली होती. परीक्षा पार पडल्यावर अनेक विद्यार्थी आपल्या गावी परतले आहेत, तर काही जण पालकांसोबत विदेश दौ-यावरही गेले आहेत. मात्र, परीक्षा रद्द झाल्याच्या निर्णयानंतर आता पुढे काय होणार, पुन्हा परीक्षा कधी होणार, याबाबत विद्यार्थ्यांसमोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. NEET परीक्षेच्या तयारीसाठी देशभरातील विद्यार्थी विविध राज्यांतून मोठ्या शहरांमध्ये येउन कोचिंग क्लासेस घेत असतात. ३ मे रोजी परीक्षा झाल्यानंतर अनेकांनी सुटकेचा निश्वास टाकत आपल्या गावी परतण्याचा निर्णय घेतला होता. काही विद्यार्थी सुट्ट्यांचा आनंद घेण्यासाठी बाहेर गेले आहेत. मात्र परीक्षा रद्द झाल्याच्या बातमीमुळे सर्व विद्यार्थ्यांमध्ये तणाव आणि चिंतेचे वातावरण पसरले आहे.

## बिहारमध्ये 60 लाखांत

छापे टाकून आणखी ४ आरोपींना अटक केली होती. आतापर्यंत या प्रकरणात एकूण ७ गुन्हेगारांना पकडून तुरुंगात पाठवण्यात आले आहे.

**५०-६० लाखांमध्ये सॉल्वर बसवण्याचा व्यवहार होत असे-** पोलिसांच्या तपासात समोर आले की, ही टोळी ?क्क्र परीक्षा पास करून देण्यासाठी एका उमेदवाराकडून ५० ते ६० लाख रुपयांपर्यंत वसूल करत असे. यापैकी १.५ ते २ लाख रुपये आगाउ म्हणून आधीच घेतले जात होते. यानंतर, परीक्षा केंद्रावर मूळ उमेदवाराऐवजी सॉल्वर बसवण्याची तयारी केली जात होती. मास्टरमाइंडने दिलेल्या माहितीनुसार, पोलिसांनी औरंगाबाद, जमुई आणि मुजफ्फरपूरसह विविध जिल्ह्यांमध्ये छापे टाकून आणखी ४ आरोपींना अटक केली होती. हे सर्वजण परीक्षेत सॉल्वर बसवणार होते, परंतु मुख्य आरोपीला अटक झाल्यामुळे संपूर्ण टोळीच्या मनसुब्यांवर पाणी फिरले.

**सर्वांना तुरुंगात पाठवले, फरार आरोपींचा शोध सुरू -** अटक केलेल्या आरोपींना ५ मे रोजी न्यायालयात हजर करून तुरुंगात पाठवण्यात आले होते. पोलिसांचे म्हणणे आहे की, इतर फरार आरोपींना अटक करण्यासाठी छापेमारी सुरू आहे. या नेटवर्कशी संबंधित आणखी लोकांचा खुलासा होउ शकतो.

**परीक्षा का रद्द झाली-** ८ मे रोजी तपास सुरू झाला होताः NTA ने सांगितले की, ८ मे २०२६ रोजीच या प्रकरणाशी संबंधित काही तपास केंद्रीय एजन्सींना सोपवण्यात आले होते, जेणेकरून परीक्षेची निष्पक्षता आणि सुरक्षा सुनिश्चित करता येईल. आता, तपास एजन्सींकडून मिळालेल्या माहितीनुसार आणि सरकारच्या मंजुरीनंतर, NTA ने निर्णय घेतला आहे की ३ मे २०२६ रोजी झालेली NEET (UG) परीक्षा रद्द करण्यात येत आहे आणि ती पुन्हा घेतली जाईल. नवीन परीक्षेच्या तारखा नंतर जाहीर केल्या जातील. तपास एजन्सींकडून मिळालेल्या निष्कर्षांच्या आधारे हे ठरवण्यात आले की सध्याची परीक्षा प्रक्रिया सुरू ठेवता येणार नाही. म्हणून, पारदर्शकता राखण्यासाठी परीक्षा पुन्हा घेतली जाईल. राजस्थानमध्ये हाताने लिहिलेले गेस पेपर सापडले होतेः ३ मे रोजी देशभरात NEET UG २०२६ ची परीक्षा झाली होती. परीक्षेचा पेपर आधीच फुटला असावा अशी शक्यता आहे. राजस्थानमध्ये अनेक विद्यार्थ्यांकडे हाताने लिहिलेले गेस पेपर सापडले आहेत, ज्यातील प्रश्न मूळ परीक्षेतील प्रश्नांशी जुळत आहेत. १० मे रोजी राजस्थान स्पेशल ऑपरेशन ग्रुप (SOG) ने गुप्त माहितीच्या आधारे कारवाई करत देहरादून, सीकर आणि झुंझुनू येथून १३ संशयितांना ताब्यात घेतले आहे. यात सीकरमधील एका कोचिंग इन्स्टिट्यूटशी संबंधित करिअर समुपदेशकाचाही समावेश आहे.७२० पैकी ६०० गुणांचे प्रश्न समानः तपासात समोर आले आहे की, परीक्षेतील ७२० पैकी ६०० गुणांचे प्रश्न दोन दिवसांपूर्वीच सीकरमधील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले होते. खरं तर, केरळमधील एका कॉलेजमधून MBBS करत असलेल्या एका विद्यार्थ्याने १ मे रोजी सीकरमधील आपल्या एका मित्राला एक गेस पेपर पाठवला होता. हाताने लिहिलेले प्रश्न विद्यार्थ्यांना मिळालेः चक्र सध्या प्रकरणाची चौकशी करत आहे. एजन्सी सूत्रधारापर्यंत पोहोचण्यासाठी प्रत्येक दुवा जोडत आहे. सर्व संशयितांचे सोशल मीडिया चॅट आणि काल लाग्स तपासले जात आहेत. खरेतर, हे एका गेस पेपरसारखे लोकांपर्यंत पोहोचले आहे आणि चक्र सध्या याला पेपरफुटी मानले जावे की नाही, याची चौकशी करत आहे. विद्यार्थ्यांपर्यंत जे प्रश्न बँक पोहोचले आहे, त्यात भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्रचे ३०० पेक्षा जास्त प्रश्न आहेत. हे सर्व हाताने लिहिलेले आहेत आणि त्यांची हस्ताक्षरेही एकच आहेत. यापैकी १५० प्रश्न ?क्क्र छक्र २०२६ च्या पेपरमध्ये जसेच्या तसे आले.तज्ञांनुसार, एखाद्या विशिष्ट गेस पेपरमधून परीक्षेत काही प्रश्न जसेच्या तसे येण्याची शक्यता असते, परंतु इतक्या मोठ्या संख्येने प्रश्न येण्याची शक्यता सहसा नसते.

**शुल्क परत केले जाईल, पुन्हा नोंदणी करावी लागणार नाही-** NTA ने माहिती दिली आहे की विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षेसाठी नोंदणी करावी लागणार नाही. मागील परीक्षा केंद्रांमध्येही कोणताही बदल होणार नाही. पुनर्परीक्षेसाठी नवीन प्रवेशपत्रे (अडमिट कार्ड) देखील जारी केली जातील. याव्यतिरिक्त, परीक्षेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांची फी देखील परत केली जाईल.

## अत्याचार करताना 4 ते 5 मुलांनी

आरोपीने, नाही, असे उत्तर दिलं. संपूर्ण युक्तिवाद पार पडल्यानंतर २४ मे पर्यंत आरोपीला पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

या प्रकरणी सर्वत्र संतापाची लाट उसळल्यानंतर या अत्याचार प्रकरणात सरकारने विशेष सरकारी वकिल म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ अजय मिसर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नसरापूर प्रकरणाची सुनावणी प्रभावीपणे आणि जलदगतीने पार पाडण्यासाठी शासनाकडून हा निर्णय घेण्यात आला आहे. अशातच आता या अत्याचार प्रकरणाबाबत एक महत्वाची माहिती समोर आली असून राज्य सरकार विशेष न्यायालय स्थापन करण्याबाबत अध्यादेश काढण्यात आल्याची माहिती आहे. दरम्यान, सरकारी वकील म्हणून नियुक्ती झाल्यानंतर अजय मिसर यांनी संपूर्ण प्रकरणाच्या तपासाचा आढावा घेतलाय. यासाठी अजय मिसर यांनी घटनास्थळी जाउन भेट दिली. यावेळी ग्रामीण पोलिसांकडून संपूर्ण प्रकरणाची माहिती जाणून घेतली. यावेळी तपास पथकाने आत्तापर्यंत केलेल्या तपासाचा आढावा अजय मिसर यांनी पोलिसांकडून घेतला आहे.

## मंदिराची भिंत कोसळून दोन

आणि मोठा अनर्थ घडला.

**मदतकार्य आणि प्रशासकीय कारवाई-** भिंत कोसळल्याचा आवाज होताच यात्रेतील नागरिक आणि स्थानिकांनी तातडीने धाव घेउन ढिगा-याखाली अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यास सुरुवात केली. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि महसूल विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. प्रशासनाकडून तातडीने पंचनामा सुरू करण्यात आला असून, मृतांच्या कुटुंबीयांना सांत्वन देण्यात येत आहे.

यात्रेच्या उत्साहावर विरजण-मरगुबाई देवीची यात्रा म्हणजे परिसरातील नागरिकांसाठी आनंदाचा सोहळा असतो. मात्र, निसर्गाच्या कोपामुळे आनंदाच्या वातावरणाचे रूपांतर काही क्षणातच किंकाळ्या आणि रडण्यामध्ये झाले. वादळी वा-यामुळे झालेला हा अपघात इतका भीषण होता की, कोणालाही सावरण्याची संधी मिळाली नाही.मोटेवाडी परिसरातील या घटनेमुळे सांगली आणि शेजारील कर्नाटक सीमाभागात हळहळ व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने या प्रकरणाचा सविस्तर तपास सुरू केला असून, जखमींना योग्य ते उपचार मिळावेत यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

## दोन दिवसांआधी SIT चौकशी

व्यवहारांची सखोल तपासणी केली जात आहे. अशातच एसआयटी प्रमुख तेजस्वी सातपुतेंनी रुपाली चाकणकरांची तब्बल ६ तास चौकशी केली होती. त्यानंतरपुन्हाएकदा रुपाली चाकणकरांना चौकशीच्या ससेमि-याला समोर जावंलागणार आहे.

दरम्यान, अशोक खरात प्रकरणात ईडीकडून विविध व्यक्तींची चौकशी सुरू असून आर्थिक व्यवहारांची सखोल तपासणी केली जात आहे. तरदुसरीकडे शिर्डी फसवणूक प्रकरणी कल्पना खरात यांच्या अटकपूर्व जामीन अर्जावरील सुनावणी उच्च न्यायालयाने तहकूब केली आहे. शिर्डी पोलीस ठाण्यात दाखल जमीन फसवणूक प्रकरणात फसवणूक आणि बेकायदेशीर सावकारीचे आरोप असलेल्या कल्पना खरात यांच्या अटकपूर्व जामीन अर्जावरील सुनावणी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने आज तहकूब केलीय.

राहाता येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळल्यानंतर कल्पना खरात यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यांच्या विरोधात शिर्डी पोलीस ठाण्यात फसवणूक आणि बेकायदेशीर सावकारीचा गुन्हा दाखल आहे. या प्रकरणात त्यांचे पती अशोक खरात आणि इतर आरोपींनी कर्ज व्यवहाराच्या नावाखाली सुमारे १० कोटी रुपये किमतीची शेतक-याची जमीन फसवणुकीने स्वत?च्या नावावर करून घेतल्याचा आरोप आहे. कल्पना खरात यांच्यावतीने ॲड. प्रशांत गिरी यांनी न्यायालयात बाजू मांडताना हा वाद दिवाणी स्वरूपाचा असून या प्रकरणात आधीच नोटिसा बजावण्यात आल्याचे सांगितले. तसेच कल्पना खरात यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांची अनेक पथके कार्यरत असून त्यांचे पती अशोक खरात या प्रकरणात आधीपासून तुरुंगात असल्याचेही त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

ॲड. गिरी यांनी न्यायालयाला असेही सांगितले की, अशोक खरात यांच्यावर झालेल्या आरोपांमुळे संपूर्ण कुटुंब लज्जित झाले असून अटकपूर्व जामीन अर्जावर तातडीने सुनावणी घेण्याची विनंती करण्यात आली. या प्रकरणी ६ मे रोजी नोटिसा जारी करण्यात आल्या होत्या आणि प्रकरण १२ मे रोजी ठेवण्याची मुभा देण्यात आली होती. मात्र आज उच्च न्यायालयाच्या कामकाजाच्या ताणामुळे प्रकरणावर गुणदोषांच्या आधारे सुनावणी होउ शकली नाही. आम्ही तातडीच्या सुनावणीची मागणी केली. त्यानुसार न्यायालयाने या महिन्याच्या अखेरच्या आठवड्यात, न्यायलयीन सुट्टीदरम्यान प्रकरण मांडण्याची मुभा दिली आहे. उच्च न्यायालयाने आता हे प्रकरण न्यायालयाच्या सुट्टीतील तिस-या आठवड्यात, म्हणजेच २५ मे ते ३० मे दरम्यान, उल्लेख करण्यास परवानगी दिली आहे.

## भारताने पाकशी चर्चेचा मार्ग

असं मला वाटतं असं होसबळे यांनी म्हटलं आहे.

**हिंदू राष्ट्र याबाबत होसबळे यांनी काय भूमिका मांडली?**

हिंदू राष्ट्र हा उल्लेख धार्मिक नाही आणि अल्पसंख्याकाना हा विश्वास कसा दिला जाईल की ते भारतात सुरक्षित आहेत? हा प्रश्न विचारला असता होसबळे म्हणाले, भारतात मुस्लिमांना दुय्यम वागणूक मिळते का? सरकारी योजना त्यांच्यापर्यंत पोहचत नाहीत असं आहे का? तर तसं मुळीच नाही. शिवाय आम्ही अल्पसंख्याक समुदायाच्या नेत्यांसह सातत्याने चर्चा करत असतो. धर्म बदलला म्हणजे राष्ट्रीयत्व बदलत नाही. जर आपल्या देशाची राष्ट्रीयता एक आहे तर आम्ही कुणालाही वेगळं समजत नाही. आम्ही कुठलंही हिंदू राष्ट्र निर्माण करत नाही. तर भारत हा देश हिंदू राष्ट्रच आहे. जेव्हा आपल्या देशात ब्रिटिशांचं राज्य होतं तेव्हाही हे हिंदू राष्ट्रच होतं. असं उत्तर होसबळेंनी दिलं आहे.

## राष्ट्रीय हिताच्या प्रश्नांवर

भावना निर्माण करणे हेच सध्याच्या परिस्थितीत केंद्र सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असले पाहिजे, अशी ठाम भूमिका शरद पवार यांनी मांडली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जे काटकसरीचे आवाहन केले आहे याबद्दल अगोदरच राहुल गांधी यांनी सांगितले होते. निवडणुकीच्या काळात प्रचंड धुमाकूळ केला. प्रचंड इंधन वापरले आणि आता हे काटकसर सांगत आहेत. हे काही बरोबर नाही, सुरुवात स्वतःपासून केली पाहिजे, असे काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी म्हटले आहे.

## कोणार्कचे ट्रक चालक व स्वच्छता

पैसे दिले जात नाही. सुरक्षा साधनाची कमतरता आहे. युनिफॉर्म न दिल्याने अधिकृत ओळख स्पष्ट होत नाही. ड्युटी दरम्यान अपघात झाल्यास जबाबदारी कंपनीची असतानाही याकडे दुर्लक्ष होत असल्याचाही आरोप करण्यात आलेला आहे. कामगारांनी आरोप केला आहे की जुन्या वाहनांना रंग लावून नवीन दाखवले आहे. वेतन ३० दिवसाच्या हिशोबाने दिले जात असले तरी महिन्यातील प्रत्यक्ष दिवसानुसार योग्य गणना होत नाही. अशा अनेक तक्रारी घेऊन कर्मचाऱ्यांनी संप पुकारला आहे. १०० हून अधिक चालक काम बंद मध्ये सहभागी. यामुळे शहरातील कचरा संकलन आणि वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आंदोलनाची दखल घेत उपमहापौर सचिन भेंडे आणि नगरसेवक प्रशांत वानखडे यांनी आंदोलन स्थळी भेट देऊन चालकांच्या समस्या जाणून घेतल्या त्यांनी चर्चा करून तोडगा काढण्याचा आश्वासन दिला आहे.

## अमरावतीवरून अपहृत तरुणी

अपहरण कुठून झाले यावर पोलिसांना संशय आला. तांत्रिक तपासादरम्यान पोलिसांना पीडित तरुणी धामणगाव व जवळपासच्या स्टेशनवर महाराष्ट्र एक्सप्रेस मध्ये असल्याची माहिती मिळाली. अमरावती पोलिसांनी नागपूर जीआरपीएफच्या मदतीने नागपूर स्टेशनवर प्रत्येक डब्यात शोध घेतला आणि तिला ताब्यात घेतले. तिने चौकशीमध्ये स्वतःहून घरून निघून गेली असल्याचे सांगितले. पोलिसांनी तरुणला आई-वडिलांच्या स्वाधीन केले.

## चांदुर रेल्वे पोलिसांनी

करण्यात आली. त्यानंतर ट्रकची झडती घेतली असता त्यामध्ये प्रतिबंधित गुटखा व तंबाखूचा सुमारे १० टन साठा आढळून आला. या मालाची किंमत ७५ लाख ७५ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. याशिवाय २५ लाख रुपयांचा ट्रक, दोन मोबाईल असा एकूण १ कोटी १ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईदरम्यान पोलिसांनी ट्रक चालक शेख इमरान शेख मुस्कान (वय ३६, पठाण चौक, अमरावती) याला ताब्यात घेतले. प्राथमिक चौकशीत या रॅकेटमध्ये आणखी तीन ते चार आरोपींचा सहभाग असल्याची माहिती समोर आली असून ते सध्या फरार आहेत. सर्व आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून फरार आरोपींच्या शोधासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहेत. पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ही गुटख्याची खेप अमरावतीकडे येत होती. मात्र हा गुटखा नेमका कुठून आणला गेला आणि तो कुणासाठी होता, याबाबतची माहिती अद्याप समोर आलेली नाही. चांदूर रेल्वे पोलीस चालक शेख इमरान याची कसून चौकशी करीत आहेत. पोलीस अधीक्षकांच्या आदेशानंतर झालेल्या या कारवाईमुळे शहर व जिल्ह्यातील गुटखा माफियांची नावे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पुढील तपास चांदूर रेल्वे पोलीस करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, चांदूर रेल्वे उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल पवार आणि पोलीस निरीक्षक अजय आकरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पीएसआय वीणा पांडे, रोहित कुदळे, नीतेश आझाडे यांच्यासह पोलीस कर्मचारी शिवाजी, शेख, नितीन, योगेश, राहुल, कीर्ती, संदीप, सागर, ऋषिकेश, शुभम, स्वप्नील, निलेश आणि रामेश्वर यांनी कारवाईत सहभाग घेतला.

## कर्जाच्या विळख्यात अडकलेल्या

नेत असताना वाटेतच अक्षय यांची प्राणज्योत मालवली. अक्षय यांच्या पश्चात आई, पत्नी आणि भाऊ असा परिवार आहे. कर्त्या तरुण शेतकऱ्याच्या अकाली जाण्याने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, गावातही शोकमय वातावरण निर्माण झाले आहे. घटनेची माहिती मिळताच वरुड पोलिसांनी प्राथमिक पंचनामा केला. त्यानंतर पुढील तपासासाठी प्रकरण शेंदुरजनाघाट पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आले आहे. पोलिसांकडून कुटुंबीयांचे जबाब नोंदवले जात असून, घटनेचा अधिक तपास सुरू आहे.

## पालकमंत्र्यांच्या आदेशावर गुप्तचर

सांगितले होते. यावेळी एएसआय अशोक वाटाणे यांनी दोघांच्या मधात सुरु असलेल्या चर्चेचा व्हिडिओ रेकॉर्ड केला. व्हीआयपी मुव्हमेंटची माहिती पोलिसांपर्यंत पोहोचवण्यासाठी व्हिडिओ रेकॉर्ड करण्यात येत होते. पालकमंत्र्यांनी त्यांना पाहिले आणि यावर आक्षेप घेतला. अधिकाऱ्याने आपली ओळख सांगण्याचा प्रयत्न केला पण युनिफॉर्म मध्ये नसल्याने पालकमंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली आणि तातडीने प्रभारी पोलीस आयुक्त श्याम घुगे यांना तात्काळ कार्यवाहीचे निर्देश दिले. यामुळे एएसआय अशोक वाटाणे यांना तात्काळ निलंबित करण्यात आले. त्यांच्यावर शिस्त आणि गोपनीयता भंग केल्याचा आरोप आहे. या कारवाईमुळे पोलीस विभागात विविध चर्चा सुरू झाले आहे.

## एकाच झाडावर दोन मित्रांनी

बार्शीटाकळी पोलीस स्टेशनमध्ये मर्ग दाखल करण्यात आला आहे. पोलिसांना मृतकांनी नातेवाईकांना केलेल्या शेवटच्या फोन कॉलचे रेकॉर्डिंग तसेच व्हॉट्सॲपवर पाठवलेली कथित सुसाईड नोट प्राप्त झाली आहे. घटनास्थळावरील परिस्थिती, मोबाईल डेटा आणि प्राथमिक पुराव्यांच्या आधारे प्रथमदर्शनी ही आत्महत्येची घटना असल्याचे दिसून येत असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पुढील तपास सुरू केला आहे. प्राथमिक तपासात ही घटना आत्महत्येची असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत असला तरी पोलिसांकडून सर्व तांत्रिक आणि वैद्यकीय पुराव्यांच्या आधारे सखोल तपास केला जात आहे.

## बंगाली व्यापारी हत्या ßाकरण

व्यवहारावरून वाद झाला होता. हा वाद एवढा वाढला की, आरोपी यांनी पश्चिम बंगाल येथील व्यापारी अभिजीत सुकुमार (वय ५३) यांच्यावर चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. जेथे त्यांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणानंतर तणाव निर्माण झाला होता. मृतकाच्या पत्नीने या प्रकरणात खासदार अनिल बोंडे यांची भेट घेऊन सर्व आरोपींच्या अटकेची मागणी केली होती. मुख्य आरोपी रहीमसह अन्य आरोपी असल्याचे त्यांनी म्हटले होते. या प्रकरणात पोलिसांनी मंगळवारी आणखीन तीन आरोपींना ताब्यात घेतले आहे.


## जाहीर नोटीस

**सर्व सामान्य लोकांना सुचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे** गोपाल अंबादास गोलम **यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाणे --**

मिळकतीचे वर्णन - **मौजे - पिंपळशेंडा, मालमत्ता क्र.३८, अनु.क्र.३८ ता. मुर्तिजापूर, जि.अकोला**

**सदर मिळकत माझे पक्षकार नामे** गोपाल अंबादास गोलम **यांना सदर मालमत्ता ही वारसाने वडिलोपार्जित मिळाली आहे. तसेच सदर मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किंवा वारस हक्क असल्यास इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्र.वर ही जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या ७ दिवसांच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही, आणि सदर मालमत्ता Piramal Finance Ltd. येथे कर्जासाठी केलेल्या अर्जानुसार गहाण करण्यात येईल. करीता ही जाहीर नोटीस देत आहे.**

शिक्का

आपला,
ॲडव्होकेट
रवींद्र रु.वाटाणे,
स्नेहगंधा कॉलनी, अमरावती
मो.नं.**9823698745**

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, १३ मे २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## मोहगव्हाण परिसरात दारूच्या अड्ड्यावर एलसीबीचा छापा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखा, वाशिमने अनसिंग पोलीस ठाणे हद्दीतील ग्राम मोहगव्हाण परिसरात मोठी कारवाई करत गावठी हातभट्टी दारूच्या अड्ड्यावर छापा टाकला. या कारवाईत तब्बल ४ लाख ७३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून नष्ट करण्यात आला.



जिल्हा पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील यांनी पदभार स्वीकारल्यानंतर जिल्ह्यातील अवैध दारू, जुगार, गुटखा तसेच शस्त्र अधिनियमांतर्गत कारवाया अधिक प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना पोलीस विभागाला दिल्या आहेत. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी यांना ग्राम मोहगव्हाण येथील धरणाच्या काठावर काही इसम गावठी हातभट्टीची दारू तयार करत असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली होती.

या माहितीच्या आधारे दिनांक १२ मे रोजी पहाटे स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथक मोहगव्हाण परिसरात रवाना करण्यात आले. सकाळी सुमारे ५ वाजताच्या सुमारास धरणाच्या काठावर छापा टाकण्यात आला. मात्र पोलिसांची चाहूल लागताच आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. पोलिसांनी परिसराची तपासणी केली असता झाडाझुडपात तसेच जमिनीत खड्डे करून लपवून ठेवलेला मोठ्या प्रमाणात सडवा मोहमाच व गावठी हातभट्टी दारूचा साठा आढळून आला. यात १० ड्रम, ४ प्लास्टिक टाक्या, ८२ पिंपे, ३१ प्लास्टिक कॅनमधील एकूण ४ हजार ६९५ लिटर सडवा मोहमाच तसेच २० लिटर गावठी हातभट्टी दारू असा एकूण ४ लाख ७३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पंचासमक्ष हा सर्व मुद्देमाल नष्ट करण्यात आला. या प्रकरणी फरार आरोपी सलीम घांसी भवानीवाले व मोहम्मद पिरू नंदावाले, दोघेही रा. मोहगव्हाण, यांच्याविरुद्ध महाराष्ट्र प्रोहिबिशन कायद्याच्या कलम ६५ (ई) (फ) अन्वये अनसिंग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक लता फड, उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल क्षिरसागर, पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी, पोउपनि निलेश जाधव तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पार पाडली.

## लक्ष्मी नगरात सार्वजनिक नाली व रस्त्याची तोडफोड ; नागरिक संतप्त कारवाईची मागणी

■ प्रतिनिधी | कारंजा ■

शहरातील लक्ष्मी नगर परिसरात सार्वजनिक नाली व रस्त्याची प्रत्यक्ष जेसीबीने तोडफोड केल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. प्लॉट क्रमांक ४२, ४३ आणि ४४ समोरील अतिक्रमण प्रकरणावरून हा वाद चिघळला असून संबंधित अतिक्रमण धारकाविरोधात कठोर कारवाईची मागणी रहिवाशांनी केली आहे.

कन्हैयालाल रामगोपाल ठाकूर व इतर रहिवाशांनी दिलेल्या माहितीनुसार, मागील अनेक महिन्यांपासून सदर ठिकाणी अतिक्रमणामुळे सार्वजनिक नाली व रस्त्यावर वाहतुकीस अडथळा निर्माण होत होता. याबाबत नगर परिषद कारंजा येथे ३० सप्टेंबर २०२५ व २३ जानेवारी २०२६ रोजी लेखी तक्रारी देण्यात आल्या होत्या. नगर परिषद प्रशासनाने जागेचे मोजमाप करून अतिक्रमण असल्याचे नागरिकांसमोर स्पष्ट केले होते तसेच अतिक्रमण हटविण्याचे आश्वासनही दिले होते. यानंतर नगर परिषदेचे बांधकाम अधिकारी शेख साहेब, पाटील साहेब, मानेकर साहेब, डेंडुळे साहेब व इतर कर्मचारी जेसीबीसह अतिक्रमण हटविण्यासाठी घटनास्थळी पोहोचले होते. मात्र संबंधित अतिक्रमण धारकाने पोलिसांना बोलावून कारवाई थांबविल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. दरम्यान, १० मे २०२६ रोजी सुट्टीचा दिवस साधून संबंधित व्यक्तीने स्वतःच्या खर्चाने जेसीबी मशीन आणून सार्वजनिक नाली व रस्त्याची तोडफोड केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे नगर परिषदेच्या शासकीय संपत्तीचे मोठे नुकसान झाल्याचे रहिवाशांचे म्हणणे आहे.



घटनेनंतर लक्ष्मी नगरातील नागरिकांनी कारंजा शहर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली असून एनसीआर क्रमांक ०२६७/२०२६ दिनांक १०/०५/२०२६ असा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. नागरिकांनी आता नगर परिषद प्रशासनाने स्वतः फिर्याद दाखल करून संबंधित आरोपीविरोधात तात्काळ एफआयआर नोंदवावा, अशी मागणी केली आहे. 'जर प्रशासनाने कारवाई केली नाही तर अतिक्रमण धारकाला नगर परिषदेचे पाठबळ असल्याचा समज नागरिकांमध्ये निर्माण होईल,' असा इशारा रहिवाशांनी दिला आहे. भविष्यात या प्रकरणातून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन कोणतीही जीवितहानी झाल्यास त्याची जबाबदारी नगर परिषद प्रशासनावर राहील, असा गंभीर इशाराही नागरिकांनी निवेदनातून दिला आहे.

## कारंजा भाजप शहराध्यक्षपदी अमित संगेवार यांची निवड



■ प्रतिनिधी | कारंजा ■

शहरातील राजकीय वर्तुळात प्रतिष्ठेची मानली जाणारी भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्ष पदाची निवड अखेर जाहीर करण्यात आली असून, अमित संगेवार यांची कारंजा भाजपा शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. मागील अनेक दिवसांपासून हे पद प्रभारी असल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली होती. अखेर पक्षश्रेष्ठींनी अमित संगेवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब करत त्यांच्याकडे शहराध्यक्षपदाची धुरा सोपविली. निवडीची घोषणा होताच भाजपा कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते अमित संगेवार यांना निवडीचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

या प्रसंगी खासदार अनुप धोत्रे, भाजपा मुख्य प्रतोद तथा अकोला पूर्वचे आमदार रणधीर सावरकर, आमदार श्याम खोडे, आमदार सईताई डहाके, माजी खासदार अनंतराव देशमुख, भाजपा जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तमजी चितलांगे, भाजपा जिल्हा सरचिटणीस डॉ. राजीव काळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## जिल्ह्यात पाणी टंचाई निवारणासाठी ७४.३९ लाखांच्या उपाययोजनांना मंजुरी

### ३६ रिचार्ज शाफ्ट व ट्रेंच कामांद्वारे भूजल पुनर्भरणाला चालना

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील संभाव्य पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता सन २०२५-२६ च्या पाणी टंचाई कृती आराखड्यांतर्गत विविध गावांमध्ये स्त्रोत बळकटीकरणासाठी रिचार्ज शाफ्ट व रिचार्ज ट्रेंच या उपाययोजनांच्या कामांना अटी व शर्तीच्या आधिन जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मंजुरी दिली आहे. या कामांसाठी एकूण ७४ लाख ३९ हजार ६८८ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून जिल्ह्यातील १२ गावांमध्ये ३६ उपाययोजना राबविण्यात येणार आहेत.

भूजल पातळीत सातत्याने होत असलेली घट आणि उन्हाळ्यात निर्माण होणारी पाणी टंचाई लक्षात घेऊन भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, वाशिम यांच्या माध्यमातून हा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. वरिष्ठ भुवैज्ञानिक यांनी या कामांची तांत्रिक तपासणी करून अंदाजपत्रकास मान्यता दिली आहे. तसेच संबंधित तहसीलदार, गट विकास अधिकारी आणि वरिष्ठ भुवैज्ञानिक यांनी या उपाययोजनांची आवश्यकता अधोरेखित करत शिफारस केली होती.

या अंतर्गत कारंजा तालुक्यातील दुधोरा व बेंबळा, मंगरूळपीर तालुक्यातील निंभी व एकांबा, मानोरा तालुक्यातील भोयनी व वार्डा, मालेगाव तालुक्यातील चिवरा व दुधाळा, रिसोड तालुक्यातील वडजी व येवता तसेच वाशिम तालुक्यातील सावरगाव जिरे व उकळी पेन या गावांचा समावेश आहे. प्रत्येक गावात तीन उपाययोजना राबविण्यात येणार असून प्रत्येक गावासाठी ६ लाख १९ हजार ९७४ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

सदर कामांमध्ये रिचार्ज शाफ्ट आणि रिचार्ज ट्रेंचच्या माध्यमातून पावसाचे पाणी जमिनीत मुरवून भूजल पातळी वाढविण्यावर भर दिला जाणार आहे. यामुळे भविष्यातील पाणी टंचाई कमी होण्यास मदत होणार असून विहिरी, बोअरवेल आणि इतर जलस्त्रोतांच्या पाणीसाठ्यात वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

जिल्हा प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, ही कामे दीर्घकालीन जलसंधारणाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरणार असून ग्रामीण भागातील नागरिकांना त्याचा थेट लाभ होणार आहे. तसेच पाणी टंचाईग्रस्त भागांमध्ये शाश्वत जलव्यवस्थापनासाठी अशा उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर प्रशासनाचा भर राहणार आहे.

## कार्ली येथे जवाहर नवोदय प्रवेश परीक्षा-२०२७ साठी मोफत शिकवणी वर्गास प्रारंभ

■ प्रतिनिधी | वाशिम ■

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन मिळावे व अधिकाधिक विद्यार्थी जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षेत यशस्वी व्हावेत, या उद्देशाने जागेश्वर विद्यालय कार्ली येथील शिक्षक चिंचोले यांनी पुढाकार घेत जवाहर नवोदय प्रवेश परीक्षा-२०२७ च्या तयारीसाठी मोफत शिकवणी वर्ग सुरू केला आहे.

दि. ०६ मे पासून सुरू झालेल्या या वर्गाचे वेळापत्रक दररोज सकाळी ८ ते १० असे ठेवण्यात आले असून विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची योग्य तयारी करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे.

या मोफत शिकवणी वर्गाला स्व. शिंदे गुरुजी संस्थेच्या संचालिका आदरणीय श्रीमती वैशाली आरु यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत शिक्षक चिंचोले यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले. तसेच विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यास करून यश संपादन करावे, असे मार्गदर्शनही त्यांनी केले.



यावेळी संस्थेचे संचालक हर्षवर्धन शिंदे, महाले तसेच काटेकर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे अभिनंदन करत विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी अशा शैक्षणिक उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले.

## बालविवाह कायद्याअंतर्गत कारवाई

■ प्रतिनिधी | वाशिम ■

अल्पवयीन मुलीचा बालविवाह लावण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी संबंधित पालक व मध्यस्थांविरोधात रिसोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ अंतर्गत करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, रिसोड तालुक्यातील कवठा (चिखली) येथील अल्पवयीन मुलीचा विवाह दि. २८ एप्रिल २०२६ रोजी सातारकर महाराज संस्थान, रिसोड येथे आयोजित करण्यात आला होता. याबाबतची माहिती चाईल्ड हेल्पलाईन १०९८, वाशिम यांना मिळताच पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विवाह सोहळा थांबवत मुलीची कागदपत्रे तपासली असता तिचे वय १५ वर्षे ५ महिने असल्याचे निष्पन्न झाले. कायदेशीर विवाहासाठी आवश्यक वयोमर्यादेपेक्षा ते कमी असल्याने ही कारवाई करण्यात आली.

यानंतर मुलीचे पालक, विवाहासाठी मध्यस्थी करणारे व संबंधित व्यक्तींविरोधात बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ च्या कलम ९, १० व ११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. संबंधितांना कायदेशीर नोटीसही बजावण्यात आली आहे.

या कारवाईत चाईल्ड हेल्पलाईनचे सदस्य अमोल देशपांडे, सुजात खान, प्रतिभा घनसावंत, निलिमा भोंगाडे, मुख्यसेविका शुभांगी शिंदे, अंगणवाडी सेविका आम्रपाली पठाडे तसेच रिसोड पोलीस स्टेशनचे कर्मचारी कांचन डोंगरदिवे व राजेश गांगवे यांनी सहभाग घेतला. संबंधितांचे समुपदेशन करून बालविवाह प्रतिबंधक कायद्याबाबत माहिती देण्यात आली.

जिल्हा प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, बालविवाह हा कायद्याने गुन्हा असून अशा प्रकारांची माहिती तात्काळ पोलिस किंवा महिला व बालविकास विभागाला द्यावी. बालविवाहामुळे मुलांच्या शिक्षण, आरोग्य व भवितव्यावर गंभीर परिणाम होत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी उत्तम शिंदे यांनी सांगितले की, बालविवाह होत असल्याची माहिती मिळाल्यास नागरिकांनी चाईल्ड हेल्पलाईन १०९८ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल.

## वेदांत पब्लिक स्कूल पोहाच्या एसएससी बोर्डात शंभर टक्के निकाल

■ प्रतिनिधी | कारंजा ■

शिक्षण क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या वेदांत पब्लिक स्कुल पोहा ने यंदाच्या सन २०२६ च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (एएण) बोर्ड परीक्षेत दैदिप्यमान यश संपादन करत शंभर टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. विद्यालयातील सर्व २३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून अनेक विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय गुण मिळवत विद्यालयाचा नावलौकिक उंचावला आहे.

यंदाच्या निकालात रोशन चांदुरकर याने ९२.०० टक्के गुण मिळवत विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. अंजली चव्हाण हिने ९०.६० टक्के गुणांसह द्वितीय स्थान मिळविले, तर सार्थक टुले याने ९०.४० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांकावर झेप घेतली. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे पालक, शिक्षक व ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यालय प्रशासनाने सांगितले की, विद्यार्थ्यांचा नियमित अभ्यास, शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळे हे यश शक्य झाले. विद्यालयात शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर विशेष भर दिला जात असल्याने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास अधिक बळकट होत आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा लवकरच सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती विद्यालय प्रशासनाने दिली.

विद्यालयाच्या या उज्ज्वल निकालाबद्दल परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, पालकांनी विद्यालयाच्या दर्जेदार शिक्षणपद्धतीबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

## यशवंतराव चव्हाण इंग्लिश हायस्कूलचा दहावीचा शंभर टक्के निकाल; यशाची परंपरा कायम

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

शैक्षणिक वर्ष फेब्रुवारी/मार्च २०२५-२६ शासनाने कॉपीमुक्त अभियान हाती घेतले होते त्या अनुषंगाने कॉपीमुक्त वातावरणात घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत मंगरूळपीर येथील इंग्रजी माध्यमाच्या यशवंतराव चव्हाण इंग्लिश हायस्कूल ने यंदाही उज्वल यश संपादन करत सलग पंधराव्या वर्षी १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावी या उद्देशाने माजी मंत्री श्री सुभाषरावजी ठाकरे साहेब यांनी मंगरूळपीर येथे यशवंतराव चव्हाण इंग्लिश हायस्कूलची स्थापना केली शाळेने मागील पंधरा वर्षापासून सातत्याने शंभर टक्के निकालाची परंपरा जपत वाशिम जिल्ह्यात वेगळी ओळख निर्माण केली आहे. यावर्षी दहावी परीक्षेसाठी एकूण ६८ विद्यार्थी बसले होते त्यापैकी सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक अक्षरा राठी ९६.२०टक्के द्वितीय क्रमांक सोहम झळके ९२.६०टक्के तृतीय क्रमांक राज वाघमारे ९२.४०टक्के व चतुर्थ क्रमांक सक्षम राऊत ९१.८०टक्के या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष तथा माजी मंत्री सुभाष ठाकरे व सचिव चंद्रकांत ठाकरे तसेच मुख्याध्यापिका शारा राजन यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या

विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय शाळेतील शिस्तबद्ध शिक्षण पद्धती शिक्षकाचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन व पालकांच्या सहकार्याला दिले कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा देऊनही मिळालेल्या यशामुळे विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले शाळेतील शिक्षकांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन अतिरिक्त सराव परीक्षा व अभ्यासातील शंका निरसरण यामुळे आत्मविश्वास वाढला त्यामुळेच आम्हाला हे यश मिळाले अशी भावना यशस्वी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली तसेच विद्यार्थ्यांनी यशवंतराव चव्हाण इंग्लिश हायस्कूल मध्ये मिळणारे गुणवत्ता पूर्ण शिक्षण अभ्यासासोबतच नैतिक मूल्यावर दिला जाणारा भर आणि शिक्षकांचे वैयक्तिक लक्ष यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही मोठी संधी उपलब्ध होत असल्याचे सांगितले शेवटी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.


## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), मालेगांव, जि. वाशिम यांचे न्यायालयात ०२**

सिव्हील एम. ए. नं. ९६/२०२६ चौ.ता. १८/०६/२०२६

प्रोसेस नं. १३०० / २०२६ दिनांक : १२/०५/२०२६

**अर्जदार :** १. कलावती सोपान काकडे, वय अं. ७५ वर्षे अर्जदार क. रा. रेल्वे स्टेशन जवळ वाशिम ता. वाशिम जि. वाशिम

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** १. चंद्रप्रभा मुरलीधर लोखंडे, वय अं. ६१ वर्षे रा. बसमत ता. बसमत जि. हिंगोली ह. मु. चिवरा ता. मालेगांव जि. वाशिम

ज्याअर्थी मयत नामे रामजी आनंदा गायकवाड हयांचा मृत्यू दि. २४/०८/२०११ रोजी झाला असुन ते रा. चिवरा ता. मालेगांव जि. वाशिम येथील रहीवासी होते. तसेच गयाबाई रामजी आनंदा हयांचा मृत्यू दि. १८/०८/१९५१ रोजी झाला व शशिकला रामजी गायकवाड हयांचा मृत्यू दि. २०/०९/२०२४ रोजी झाला असुन मयताचे अर्जदार हेच वारस असून अर्जदाराने मयताचे वारस म्हणुन नोंद करण्याकरिता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०२ नुसार कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे. या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही.

याअर्थी सदर अर्जा संबंधी कोणास कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी चौकशी तारीख १८/०६/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता किंवा ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत कागदपत्रासह वि. न्यायालयात स्वतः किंवा निर्देशीत केलेल्या वकिला मार्फत हजर राहुन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे समजुन सदर प्रकरण कायद्यानुसार निकाली काढण्यात येईल. आज दिनांक १२/०५/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय (क.स्तर), मालेगांव


## माझं गाव आरोग्य संपन्न गाव अभियानास प्रतिसाद

**अकोला :** जिल्ह्यात ५३४ गावांचा सहभाग ग्रामीण भागातील नागरिकांचे आरोग्य अधिक सक्षम व निरोगी करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या 'माझं गाव आरोग्य संपन्न गाव' अभियानास अकोला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. जिल्ह्यातील एकूण ५३४ गावांपैकी ५३४ गावांनी या अभियानात सहभाग नोंदवून आरोग्यदायी गाव उभारणीसाठी पुढाकार घेतला आहे. या अभियानांतर्गत गावपातळीवर स्वच्छता, सुरक्षित पिण्याचे पाणी, लसीकरण, माता-बाल आरोग्य, संसर्गजन्य व असंसर्गजन्य रोग प्रतिबंध, कुपोषण निर्मूलन, तंबाखूमुक्त परिसर, नियमित आरोग्य तपासणी आणि जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत.

## एसआयआर आढावा बैठक व भव्य पक्षप्रवेश सोहळा

■ प्रतिनिधी | कारंजा ■

कारंजा शहरात भारतीय जनता पक्षाच्या वतीने आयोजित विशेष गहन पुनरीक्षण (SIR) आढावा बैठक पार पडली. या बैठकीला खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधिर सावरकर, आमदार सई डहाके, आमदार शाम खोडे, भाजप जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत विधानसभा क्षेत्रात विशेष गहन पुनरीक्षण (SIR) प्रभावीपणे राबविण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. बूथस्तरापर्यंत संघटन मजबूत करून प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. यानंतर पार पडलेल्या



भव्य भाजपा पक्षप्रवेश सोहळ्याने कार्यक्रमात विशेष रंगत आणली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आमदार सईताई डहाके यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत विविध पक्षांतील अनेक कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. विशेष म्हणजे, माजी जिल्हा परिषद सदस्य उमेश ठाकरे यांनी शेकडो युवकांसह भाजपमध्ये प्रवेश केला. तसेच राष्ट्रीय युवक काँग्रेसचे तालुका अध्यक्ष आणि त्यांच्या समर्थकांनीही भाजपची विचारधारा स्वीकारत पक्षात प्रवेश केल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. पक्षप्रवेश करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. यावेळी माजी खासदार अनंतराव देशमुख, विजयराव जाधव, वाशिम न . प . चे नगराध्यक्ष अनिल केंदळे ,जिल्हा सरचिटणीस डॉ. राजीव काळे, भक्तराज महाराज, युवा नेते कौस्तुभ डहाके, भाजपा शहराध्यक्ष अमित संगेवार, तालुका अध्यक्ष अमोल ठाकरे, नगरपरिषद गटनेत्या शालिनी ठाकरे यांच्यासह भाजपा नगरसेवक, पदाधिकारी आणि शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमामुळे कारंजा मानोरा विधान सभा मध्ये भाजप संघटन अधिक बळकट झाल्याचे चित्र दिसून आले.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १६५ ■ बुधवार १३ मे २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मूल्य ३.००रु


# गांधी जिल्ह्यात गांधींच्या पुतळ्याची भरदिवसा विटंबना; वर्ध्याची मान शर्मेने झुकली

## नग्नावस्थेत इसमाचा गांधी पुतळ्यावर थरार

## CCTV, कंट्रोल रूम आणि सुरक्षा यंत्रणा ठरली निष्क्रिय

**वर्धा जनमाध्यम** : राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचारांनी जगाला अहिंसा आणि संस्कारांचा संदेश देणाऱ्या वर्धा शहराची मान मंगळवारी भरदिवसा शर्मेने खाली झुकली. शहराच्या मध्यवर्ती वर्दळीच्या ठिकाणी असलेल्या गांधीजींच्या पुतळ्यावर एका मानसिक रुग्णाने नग्नावस्थेत चढून धिंगाणा घातल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. या प्रकारामुळे केवळ गांधी पुतळ्याची विटंबनाच झाली नाही, तर शहरातील सुरक्षा व्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचे उघड झाले आहे.

प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, संबंधित इसम अचानक गांधी चौक परिसरात आला आणि काही क्षणातच अंगावरील कपडे काढून थेट गांधी पुतळ्यावर चढला. त्याने पुतळ्याला मिठी मारत विचित्र हालचाली सुरू केल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. भरदिवसा महिलां, विद्यार्थी आणि नागरिकांची मोठी वर्दळ असताना हा संतापजनक प्रकार घडत राहिला; मात्र सुरक्षा यंत्रणा कुठेच दिसून आली नाही. विशेष म्हणजे, घटनास्थळी सीसीटीव्ही कॅमेरे असून जवळच कंट्रोल रूमही आहे. तरीही संबंधित इसम बराच वेळ पुतळ्यावर धिंगाणा घालत राहिला. कॅमेरे फक्त शोभेचे आहेत का, कंट्रोल रूममधील कर्मचारी झोपले होते का असे प्रश्न आता नागरिक उपस्थित करीत आहेत. या घटनेचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने प्रशासनाची चांगलीच नामुष्की झाली आहे.



महात्मा गांधींच्या विचारांचा वारसा सांगणाऱ्या वर्ध्यातच त्यांच्या पुतळ्याची अशी विटंबना होणे, ही अत्यंत वेदनादायक बाब असल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत. संबंधित इसम मानसिक रुग्ण असल्याचे सांगितले जात असले, तरी संवेदनशील आणि महत्त्वाच्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था इतकी ढिसाळ कशी, हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

या घटनेनंतर गांधी पुतळ्याजवळ कायमस्वरूपी सुरक्षा रक्षक नियुक्त करावेत, नियमित पोलिस गस्त वाढवावी आणि नियंत्रण कक्ष अधिक सतर्क ठेवावा, अशी जोरदार मागणी नागरिकांतून होत आहे. गांधींच्या शहरातच गांधींच्या सन्मानाचे रक्षण होत नसेल, तर प्रशासन नेमके करत काय असा प्रश्न आता वर्धेकर विचारू लागले आहेत.

# सेलूत स्वतंत्र उपविभागीय पोलीस कार्यालयाचा मार्ग मोकळा



## गृहराज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या पुढाकाराने पोलीस प्रशासनाला मिळणार नवी ताकद;

### वाढत्या गुन्हेगारीवर बसणार लगाम

**वर्धा जनमाध्यम** : वाढती गुन्हेगारी, वाढलेली पोलीस ठाण्यांची संख्या आणि वाढता प्रशासकीय ताण लक्षात घेता सेलू येथे लवकरच स्वतंत्र उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय स्थापन होणार आहे. राज्याचे गृह राज्यमंत्री तथा वर्ध्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या पुढाकारामुळे या महत्त्वाच्या निर्णयाला गती मिळाली असून त्यामुळे जिल्ह्यातील पोलीस प्रशासन अधिक सक्षम आणि गतिमान होणार आहे.

मंगळवारी मुंबई मंत्रालयात गृह विभागाची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत वर्धा जिल्ह्यातील पोलीस व्यवस्थेवरील वाढता ताण आणि त्यावर उपाययोजना याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सध्या वर्धा जिल्ह्यात १९ पोलीस ठाणे कार्यरत असून जवळपास १७९२ पोलीस अधिकारी व कर्मचारी सेवा बजावत आहेत. या पोलीस ठाण्यांची विभागणी वर्धा, हिंगणघाट, आर्वी आणि पुलगाव अशा चार उपविभागांमध्ये करण्यात आली आहे.

त्यापैकी वर्धा उपविभागात वर्धा शहर, रामनगर, सावंगी मेघे, सेवाग्राम, सेलू, सिंदी रेल्वे आणि दहेगाव अशी तब्बल सात पोलीस ठाणे समाविष्ट आहेत. वाढत्या लोकसंख्येसोबतच गुन्हेगारी घटनांमध्येही वाढ होत असल्याने या उपविभागावर मोठा कामाचा बोजा निर्माण झाला होता. सन २०२५ मध्ये वर्धा उपविभागात भाग १ ते ५ अंतर्गत १०७९ तर भाग ६ अंतर्गत तब्बल २५४४ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. त्यामुळे स्वतंत्र उपविभागाची मागणी जोर धरत होती.

या पार्श्वभूमीवर डॉ. पंकज भोयर यांनी पुढाकार घेत पोलिस अधीक्षक कार्यालयामार्फत गृह विभागाकडे प्रस्ताव सादर केला. प्रस्तावानुसार सेलू, सेवाग्राम, सिंदी रेल्वे आणि दहेगाव या चार पोलीस ठाण्यांचा समावेश करून स्वतंत्र सेलू उपविभागीय पोलीस कार्यालय स्थापन करण्यात येणार आहे. तर वर्धा शहर, रामनगर आणि सावंगी मेघे ही पोलीस ठाणे विद्यमान वर्धा उपविभागातच कायम राहतील.

नवीन उपविभागासाठी १ उपविभागीय पोलीस अधिकारी, १ पोलीस उपनिरीक्षक आणि ८ पोलीस अमलदारांच्या पदांना मंजुरी देण्यात येणार असल्याने पोलीस यंत्रणा अधिक बळकट होणार आहे. बैठकीला अपर पोलीस महासंचालक प्रवीण साळुंखे, विशेष पोलीस महानिरीक्षक प्रवीण पडवळ, पोलीस उपमहानिरीक्षक मोक्षदा पाटील, पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल यांच्यासह गृह विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# वर्ध्यातील चैन स्नॅचिंगचा अखेर पर्दाफाश

## एलसीबीच्या जाळ्यात अट्टल चोरटा ; २.३६ लाखांचे सोन्याचे दागिने जप्त



**वर्धा जनमाध्यम** : शहरात महिलांच्या गळ्यातील दागिने हिसकावून दहशत निर्माण करणाऱ्या अट्टल चैन स्नॅचरला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सिनेस्टाईल कारवाई करत अखेर बेड्या ठोकल्या. या आरोपीकडून तब्बल २ लाख ३६ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले असून पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे चैन स्नॅचिंगच्या घटनांना आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

मोहम्मद फरहान अशोकराव शेख उर्फ सुरज अशोकराव भांगे (वय ३१, रा. पापानगर, इराणी वाडा, भुसावळ, जि. जळगाव) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

२३ मार्च २०२६ रोजी स्नेहल कमलाकर मिसाळ या आपल्या पुतण्याच्या घरी जेवणाच्या कार्यक्रमासाठी जात होत्या. त्या पटेल प्लायवुडजवळील गतिरोधकाजवळ पोहोचताच दुचाकीवर आलेल्या दोन अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील सोन्याचे पेंडल असलेली सोनसाखळी हिसकावून क्षणार्धात पलायन केले होते.

या घटनेने शहरात मोठी खळबळ उडाली होती. वर्धा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होताच स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास सुरू केला. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले तसेच तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपींचा माग काढला. तपासादरम्यान आरोपी भुसावळ येथील असल्याची माहिती समोर येताच एलसीबीच्या पथकाने भुसावळ येथे सापळा रचत आरोपीला मोठ्या शिताफीने अटक केली.

चौकशीदरम्यान आरोपीने आपल्या साथीदारासह गुन्हा केल्याची कबुली दिली. चोरीतील सोन्याचे दागिने जामनेर येथील एका सोनाराला विकल्याचेही निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांनी संबंधित सोनाराकडून १७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने जप्त केले.

ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या धडक कारवाईमुळे गुन्हेगारांमध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे.

# भरधाव कारची दुचाकीला जोरदार धडक; तिघे जखमी

**वर्धा जनमाध्यम** : शहरातील गर्जना चौकात भरधाव कारने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने तिघेजण जखमी झाल्याची घटना घडली. या अपघातात जखमी झालेल्यांपैकी एकाची प्रकृती गंभीर असून त्याला सावंगी मेघे येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी रामनगर पोलिसांनी कार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

हिंगणघाट येथील रहिवासी भुषण किशोर गहुकर हा अग्निहोत्री कॉलेजमध्ये अभियांत्रिकी शिक्षण घेत आहे. त्याची प्रकृती अचानक बिघडल्याने त्याचे मित्र श्रीहरी वानखेडे आणि राहुल फुलभोगे यांनी एमएच १२ एमएच ६१४४ क्रमांकाच्या दुचाकीने त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी नेले होते. उपचारानंतर तिघेही दुचाकीने परत जात असताना

### गर्जना चौकातील अपघाताने खळबळ; एकाची प्रकृती गंभीर

गर्जना चौकात एमएच ३२ एस ६७९७ क्रमांकाच्या भरधाव कारने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.या धडकेत दुचाकीवरील तिघेही रस्त्यावर फेकले गेले आणि गंभीर जखमी झाले. अपघातानंतर परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. जखमींना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले. त्यापैकी श्रीहरी वानखेडे याची प्रकृती गंभीर असल्याने त्याला सावंगी मेघे येथील रुग्णालयात रेफर करण्यात आले आहे.

या प्रकरणी रामनगर पोलिसांनी संबंधित कार चालकाविरुद्ध निष्काळजीपणे वाहन चालविल्याप्रकरणी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# अकरावी प्रवेशासाठी 'ऑनलाइन' रणधुमाळी



## जिल्ह्यात १३३ कनिष्ठ महाविद्यालयांत २३ हजार ३०० जागा; विज्ञान शाखेकडे विद्यार्थ्यांचा सर्वाधिक ओढा

**ठळक मुद्दे**

एकूण कनिष्ठ महाविद्यालये : १३३
दहावी उत्तीर्ण विद्यार्थी : १३,२१८
उपलब्ध जागा : २३,३००

शाखानिहाय प्रवेश क्षमता
कला : ९,६८०
वाणिज्य : २,५६०
विज्ञान : ९,३००
व्होकेशनल : १,७६०

**वर्धा जनमाध्यम** : दहावीचा निकाल जाहीर होताच आता विद्यार्थ्यांची धाव अकरावीच्या प्रवेशासाठी सुरू झाली असून, ११ मेपासून अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेला अधिकृत सुरुवात झाली आहे. यंदा जिल्ह्यात दहावी उत्तीर्ण झालेल्या १३ हजार २१८ विद्यार्थ्यांसाठी १३३ कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये तब्बल २३ हजार ३०० जागा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. कला, वाणिज्य, विज्ञान आणि व्यावसायिक शाखांमध्ये पुरेशा जागा असल्या तरी विज्ञान शाखेत प्रवेश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये मोठी चुरस पाहायला मिळत आहे.

राज्य शासनाच्या ऑनलाइन प्रवेश प्रणालीमुळे विद्यार्थ्यांना पसंतीच्या महाविद्यालयात पारदर्शक पद्धतीने प्रवेश मिळण्याचा मार्ग खुला झाला आहे. १० एप्रिल ते ८ मेदरम्यान विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया पूर्ण केली होती. त्यानंतर ८ मे रोजी दहावीचा निकाल जाहीर होताच ११ मेपासून प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्याला सुरुवात करण्यात आली आहे.

जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. जयश्री घारफळकर (राऊत) तसेच अकरावी ऑनलाइन प्रवेश समितीचे जिल्हा समन्वयक प्रा. नितीन ठाकरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, विद्यार्थ्यांनी शासनाच्या ब्र्स्प्ग्दह.ग्ह या संकेतस्थळावर एकदाच नोंदणी करून पसंतीच्या शाखा आणि महाविद्यालयांची निवड करणे आवश्यक आहे. या प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांना घरबसल्या प्रवेश अर्ज करता येत असून, प्रवेशातील गैरप्रकारांनाही मोठ्या प्रमाणात आळा बसणार आहे.

यंदा कला शाखेसाठी ९ हजार ६८०, वाणिज्य शाखेसाठी २ हजार ५६०, विज्ञान शाखेसाठी ९ हजार ३०० तर व्होकेशनल शाखेसाठी १ हजार ७६० जागा उपलब्ध आहेत. विज्ञान शाखेकडे विद्यार्थ्यांचा वाढता कल लक्षात घेता शहरातील नामांकित कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये मोठी स्पर्धा निर्माण होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, राज्य मंडळासह सीबीएसई, आयसीएसई आणि इतर मंडळांतील विद्यार्थ्यांनाही या प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे. पूरक परीक्षा उत्तीर्ण तसेच एटीकेटी असलेल्या विद्यार्थ्यांनाही प्रवेशाची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. व्यवस्थापन, इन-हाऊस आणि अल्पसंख्याक कोट्यांतर्गतही प्रवेश प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येणार असल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले.

# वंजारी चौकात तलवार घेऊन दहशत; आरोपीला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

## पोलिस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर प्रकार; तलवार जप्त

**वर्धा जनमाध्यम** : शहराच्या मध्यवर्ती वर्दळीच्या वंजारी चौकात हातात तलवार घेऊन नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या युवकाला रामनगर पोलिसांनी धाडसी कारवाई करत अटक केली. या कारवाईत पोलिसांनी आरोपीकडून तलवार जप्त केली असून परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

गजानन नारायण राऊत (रा. मनीष नगर, म्हसाळा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. ११ मे रोजी वंजारी चौक परिसरात एक युवक हातात तलवार घेऊन फिरत असून नागरिकांना धमकावत दहशत पसरवित असल्याची माहिती रामनगर पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळ गाठले.पोलिसांना आरोपी तलवार हातात घेऊन परिसरात फिरताना आढळून आला. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी प्रसंगावधान राखत आरोपीला मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले. त्याच्याकडील तलवार जप्त करून त्याच्याविरुद्ध



रामनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, ज्या ठिकाणी हा प्रकार घडला तो परिसर रामनगर पोलिस स्टेशनपासून अवघ्या काही मीटर अंतरावर असल्याने शहरातील कायदा-सुव्यवस्थेबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. या घटनेमुळे वर्दळीच्या भागात शस्त्रे घेऊन फिरणाऱ्यांविरोधात कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित सर्व कामे तातडीने पुर्ण करा - जिल्हाधिकारी वान्मथी सी

## आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची मान्सुन पुर्वतयारी बैठक



**वर्धा जनमाध्यम** : मान्सुन काळात वेगवेगळ्या प्रकारचे आपत्कालीन प्रसंग उद्भवण्याची शक्यता असते. अशा संभाव्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी विभागांनी पुर्व तयारी करणे आवश्यक आहे. विभागांकडे याबाबत सोपविलेली कामे मे महिना अखेरपर्यंत पुर्ण करावीत. आपला स्वतांत्र आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करून सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी दिले.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची मान्सुन पुर्व तयारी आढावा बैठक जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली. त्यावेळी त्या बोलत होत्या. बैठकीला जिल्हाधिकाऱ्यांसह अप्पर जिल्हाधिकारी संजय तेली, अतिरिक्त जिल्हा पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपजिल्हाधिकारी प्रताप वाघमारे, राजु रणवीर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शुभम घोरपडे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

पावसाळ्याच्या दिवसांमध्ये पुरस्थिती उद्भवल्यास बचाव पथके व साहित्याची तातडीने आवश्यकता भासते. त्यामुळे पथकातील मनुष्यबळाचे प्रशिक्षण, साहित्याची सुस्थिती याबाबी आताच तपासून घेणे आवश्यक आहे. तहसिलदारांनी तालुकास्तरावर बैठका घेऊन संबंधितांना स्पष्ट सूचना द्याव्यात. पावसाळ्यात नदी काठावरील काही भागात वारंवार पाणी साचण्याच्या जागा असतात. अशा ठिकाणी आवश्यक उपाययोजना केल्या जाव्या. शहरे गावांमधील नाल्यांची सफाई, स्वच्छता करण्यात यावी, असे निर्देश दिले.

विभागांनी आपले आपत्ती व्यवस्थापन आराखडे २० मे पर्यंत आपत्ती व्यवस्थापन कक्षास सादर करावे तसेच विभागांतर्गत तालुका आणि गावपातळीवरील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या बैठका घेऊन त्यांना योग्य प्रशिक्षण देण्यात यावे. आपत्तीकाळात संवादासाठी एका अधिकाऱ्यास नोडल अधिकारी म्हणून नेमावे. दिनांक १ जून पासून नियंत्रण कक्ष सुरु करावे. शोध व बचाव साहित्यांची प्रत्यक्ष तपासणी करण्याच्या सूचना जिल्हाधिऱ्यांनी दिल्या. पावसाळ्यात अतिवृष्टी झाल्यास ग्रामीण भागात रोगांच्या साथी पसरण्याची शक्यता असते. त्यादृष्टीने आरोग्य विभागाने पुरेसा औषधी साठा, ग्रामीण पाणी पुरवठ्याच्या विहीरींमधीस पाणी दुषित होऊ नये, यासाठी आवश्यक उपाययोजना, तीन महिने पुरतील इतका अन्नधान्याचा साठा उपलब्ध ठेवण्यात यावा, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या.मान्सून काळात आपत्ती व्यवस्थापनासाठी ज्या विभागांचा महत्वाचा सहभाग असतो, अशा सर्व विभागांना जबाबदारीची वाटप करण्यात आले असून त्यांनी त्याप्रमाणे कामे वेळेत पुर्ण करणे आवश्यक आहे. महसूल विभाग, पोलिस, कृषी, पुरवठा, आरोग्य, जलसंपदा, नगरपालिका, बांधकाम, परिवहन महामंडळ, वीज वितरण कंपनी, परिवहन विभाग, शिक्षण, पशुसंवर्धन यासह सर्व संबंधित विभागाकडून त्यांच्या तयारीचा जिल्हाधिकाऱ्यांनी आढावा घेतला.

बैठकीला सर्व विभाग प्रमुख अधिकारी, सर्व उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलिस अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी, तहसिलदार, मुख्याधिकारी, गटविकास अधिकारी, तालुका कृषि अधिकारी उपस्थित होते.


## जाहीरनामा

ज्याअर्थी, विधि व न्याय विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांची दिनांक ११/०८/२०२३ ची अधिसूचना अन्वये जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार, ज्या जन्म व मृत्यूच्या नोंदणीबाबत १ वर्षापेक्षा अधिक कालावधीने सूचना प्राप्त होते, अशा प्रकरणात नोंदी घेण्यासाठी कार्यकारी दंडाधिकारी, ज्यांना जिल्हा दंडाधिकारी यांनी प्राधिकृत केले आहे, अशा कार्यक्षेत्रासाठी ज्या ठिकाणी अशा व्यक्तीचा जन्म व मृत्यू झाला आहे, त्याबाबतच्या अचूकतेबाबत खात्री करुन विलंब शुल्क आकारुन अशा नोंदी घेण्याबाबत आदेशित करण्याची सुधारीत तरतूद करण्यात आली आहे. जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ मधील कलम १७ व महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम, २००० मधील नियम १३ (३) नुसार जन्म-मृत्यू घटना नोंदणी संदर्भातील निबंधक, जन्म व मृत्यू यांनी अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यासंबंधी तरतूद करण्यात आली आहे. तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक : जमृनों २५२५/ई.ऑ.९९११८१) प्र.क्र.२२/कु.क. दिनांक १२ मार्च, २०२५ मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ व सुधारणा अधिनियम, २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म-मृत्यु नोंदीबाबतची कार्यपध्दती निश्चित केली आहे.

ज्याअर्थी, श्री.अशोक दमडूजी पखाले, रा.नांदपूर ता.आर्वी जि. वर्धा यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, नांदपूर ता.आर्वी जि. वर्धा येथे उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या जन्म-मृत्यू नोंदीचे अनुपलब्धता प्रमाणपत्र, जन्माचे पुरावे, शैक्षणिक पुरावे, रहीवासाचे पुरावे, मालमत्तेचे पुरावे, ओळखीबाबतचे पुरावे व कौटुंबिक पुराव्यासह सचिव तथा जन्म-मृत्यू निबंधक, ग्रामपंचायत कार्यालय, नांदपूर ता.आर्वी जि. वर्धा यांनी या न्यायालयास प्रस्ताव सादर केला आहे.

त्याअर्थी, श्री. अशोक दमडूजी पखाले, रा.नांदपूर ता. आर्वी जि. वर्धा यांच्या विलंबाने जन्माच्या नोंदीबाबत कोणाचे काही आक्षेप / हरकती असल्यास त्या सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत (विहीत मुदतीत) न्यायालयीन कामकाजाचे दिवशी व वेळी लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. विहीत मुदतीनंतर आक्षेप /हरकतींचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

**हरीश काळे**
**तहसिलदार आर्वी**

## जाहीर सूचना

माझे पती अविनाश वसंतरावजी बोबडे याचे दिनांक ०२ फेब्रुवारी २०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या मालकीचे दुचाकी वाहन क्रमांक MH32AN4275 हा आहेत. (नाते पत्नी) माझे नाव सीमा अविनाशराव बोबडे वय (४२) रा. पुलगाव ता. देवळी जि. वर्धा हे असून, ते वाहन माझ्या नावाने हस्तांतरण करण्यासाठी माझा कुटुंबातील सदस्यांनी ना-हरकत परवानगी दिली आहे. वाहन हस्तांतरण करण्यासाठी कुणाचा आक्षेप असल्यास दहा दिवसांच्या आत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय वर्धा येथे आक्षेप नोंदवावा.

**आपली नम्र**
**सीमा अविनाशराव बोबडे**
**रा. पुलगाव ता. देवळी जि. वर्धा -**
**९६५७११३०३१**

## जाहीर सुचना

माझे अशिल श्री. बालकृष्ण माणिकराव झाडे हे मौजा-बोरखेडी, ता. हिंगणघाट, जि. वर्धा येथे स्थित असलेल्या खालील मिळकतीचे मालक आहेत. सदर मिळकत ग्रामपंचायत डाभा हद्दीत येत असून, वॉर्ड क्र. २, घर क्र. १८४(असेसमेंट प्रमाणे) क्षेत्रफळ १३९.४१चौ. मी. (१५००.०० चौ. फूट) तसेच नगर भूमापन क्र. ४४ क्षेत्रफळ १५०.५१ चौ. मी. (मालमत्ता पत्रकाप्रमाणे) असून त्यावर बांधकाम केलेले घर आहे.सदर मिळकतीच्या सीमा खालीलप्रमाणे आहेत :-

**पूर्वेस : श्री. मन्ने यांचे घर,**
**पश्चिमेस : श्री. गिरडे यांचे घर,**
**उत्तरेस : श्री. नोकरकर यांचे घर,**
**दक्षिणेस : रस्ता,**

परीक्षणार्थ सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरून असे दिसून येते की, वरील अनुसूचित मिळकत मूळतः श्री. बालकृष्ण माणिकराव झाडे यांच्या मालकीची असून, दि. १५/०१/२०२६ रोजीच्या मालमत्ता पत्रकानुसार सदर मिळकत त्यांना वडिलोपार्जित स्वरूपात प्राप्त झालेली आहे. आता श्री. बालकृष्ण माणिकराव झाडे हे सदर मिळकतीचे गिफ्ट डीड श्री. ओमप्रकाश बालकृष्ण झाडे यांच्या नावे करणार आहेत. श्री. ओमप्रकाश बालकृष्ण झाडे यांनी पिरामल फायनान्स लिमिटेड येथे कर्जासाठी अर्ज केलेला आहे.

यासंदर्भात सर्वसामान्य जनतेस जाहीर सूचित करण्यात येते की, वरील व्यवहारास कोणाची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा. अन्यथा कोणतीही हरकत नसल्याचे समजण्यात येईल.

**ॲड. आर. आर. तिवारी**
**रामनगर, वर्धा**
**मो. नं. :- ९९२२४२६१६८**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# नितीन धांडे यांचा अभिष्टचिंतन सोहळा थाटात

## 'डॉ. नितीन धांडे हे संयम, शिस्त व संवाद यांचे प्रतीक' - पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे



**अमरावती/प्रतिनिधी-** भाजपा अमरावती शहर जिल्हा अध्यक्ष तथा विदर्भयुथ वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष तसेच अमरावती जिल्हा नियोजन समितीचे सदस्य डॉ. नितीन धांडे यांचा वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा सर्वपक्षीय नेते मंडळी तथा हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमध्ये विविध सामाजिक, धार्मिक व जनहिताच्या उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

सकाळी अंबादेवी व एकविरा देवी मंदिरात महाआरती करण्यात आली. गोरक्षण संस्थेत लापशी तुला कार्यक्रम पार पडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच इरविन चौक येथे केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. जिल्हा सामान्य रुग्णालयात रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना फळांचे वाटप करण्यात आले. मुख्य 'अभिष्ट चिंतन सोहळा' संध्याकाळी संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथील लॉन मध्ये पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, माजी खासदार नवनीत राणा, आमदार प्रताप अडसड, किरण पातूरकर, प्रा. रवींद्र खांडेकर, सुनील वऱ्हाडे , रमेश बुंदिले,प्रदेश प्रवक्ते शिवराय कुलकर्णी यांनी शुभेच्छापर भाषणे केली.

डॉ. नितीन धांडे यांना शुभेच्छा देताना माजी खासदार नवनीत राणा यांनी त्यांच्या शैली मध्ये जोरदार फटकेबाजी करत डॉ नितीन धांडे यांनी लवकरात लवकर आमदार व्हावे व त्यांना व्यासपीठावरील सर्वांचा आशीर्वाद मिळावा अशा शुभेच्छा दिल्या.आगामी विधान परिषद निवडणुकीसाठी त्यांच्या उमेदवारीचा गांभीर्याने विचार करावा, असे आवाहन त्यांनी भाजपा नेतृत्वाला केले.

प्रमुख अतिथी म्हणून शुभेच्छा देताना पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी डॉक्टर नितीन धांडे यांच्या नेतृत्वाचा उल्लेख करत अमरावती शहराच्या संघटनात्मक बळकटीमध्ये डॉक्टर नितीन धांडे,यांचे महत्त्वपूर्ण योगदान सांगितले,डॉ. धांडे यांच्या जीवनातील अनेक बाबींना स्पर्श करत एक उच्च विभूषित डॉक्टर, विदर्भातील नामांकित शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आणि भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष म्हणून डॉक्टर धांडे यांनी त्यांच्या कार्याचा ठसा प्रत्येक क्षेत्रामध्ये कसा उमटविला याबाबत देखील उल्लेख केला,सोबतच त्यांच्या राजकीय भावी वाटचालीला शुभेच्छा देताना डॉ. धांडे यांना भारतीय जनता पार्टी अनेक मोठ्या जबाबदाऱ्या वेळेनुसार देणार असल्याचे स्पष्ट केले.

डॉ. धांडे यांनी अमरावतीत भाजपा वाढविण्यासाठी दिलेल्या योगदानाचे कौतुक केले. त्यांचे संयमी नेतृत्व, शिस्तबद्ध कार्यपद्धती आणि संवाद कौशल्य प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. पुढील राजकीय वाटचालीसाठी पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले तसेच डॉक्टर धांडे यांनी राजकीय क्षेत्रामध्ये जे काही स्वप्न बघितले असतील ते सर्व पूर्ण होत अशी आई जगदंबा महालक्ष्मीच्या चरणी प्रार्थना करतो असा उल्लेख देखील बावनकुळे यांनी केला.

डॉ. नितीन धांडे यांनी चंद्रशेखर बावनकुळे, नवनीत राणा,डॉ.अनिल बोंडे,तसेच व्यासपीठावरील सर्व नेते मंडळी तथा शुभेच्छा द्यायला आलेले सर्व स्नेही वर्ग व आयोजन समितीचे आभार मानत समाजहित व पक्षवृद्धीसाठी आपले कार्य यापुढेही सुरू ठेवणार असल्याचे सांगितले.

यावेळी महापौर श्रीचंद तेजवानी, माजी आमदार प्रवीण पोटे, उपमहापौर सचिन भेंडे, जयंत डेहनकर, रविराज देशमुख,बाळासाहेब हिंगनिकर, डॉ. अविनाश चौधरी, माजी महापौर रीना नंदा कौर,चेतन गावंडे, बादल कुलकर्णी, ललित समदुरकर, सुनील काळे, सचिन रासने, कौशिक अग्रवाल, संजय तिरथकर, संजय नरवणे, राधा कुरिल, अँड. प्रशांत देशपांडे,राजू कुरिल, चेतन पवार, गंगा खारकर, सुरेखा लुगारे, सुधा तिवारी, राजेंद्र मेटे, गजानन देशमुख, प्रवीण वैश्य, कामेश शाहू, ऋषिकेश देशमुख, संध्या टिकले, सुमित पवार,कुसुम शाहू, मिलिंद बांबल, कुणाल टिकले, सुधीर थोरात, प्रवीण उईके, एजाज अख्तर, राजेश आखेगावकर, रीता मोकलकर, राजू राजदेव, शाम पाध्ये, अभिजीत वानखडे, उमेश निलगिरे, भारती गुहे, संतोष कावरे, विनोद ठोसर, प्रवीण बोके, सचिन नाईक, विनोद तन्वैस, प्रमोद राऊत, मनोज काळे, पंकज गुप्ता, अमोल आगरकर, गणेश खोत, आकाश पाटील, सुमित गुल्हाने, शितल वाघमारे, कल्याणी मुदलियार, अमृत यादव, अशोक नागवाणी, आत्माराम पुरस्वानी, संजय शादी, राजेंद्र बघेल, निलेश काजे, दीपक पोहेकर, सचिन डाके, रविकांत कोल्हे, अश्विन राऊत, विशाल डहाके, राजेश गोफणे, प्रकाश सरदार, अमोल साळुंखे, यांच्यासह अमरावती महानगरपालिकेचे सर्व नगरसेवक, अमरावती जिल्ह्यातील सर्व नगरपालिका नगरपरिषद व नगरपंचायत चे नगराध्यक्ष व नगरसेवक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हुंड्याच्या छळातून विवाहितेचा गर्भपात

- परतवाड्यात संतापजनक प्रकार
- मारहाणीमुळे बाळाचा मृत्यू
- पतीसह तिघांविरुद्ध गुन्हा

**परतवाडा/प्रतिनिधीः-** हुंड्यासाठी विवाहितेचा छळ करत अमानुष मारहाण केल्याने तिच्या गर्भातील तीन महिन्यांच्या बाळाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना अचलपूर तालुक्यात उघडकीस आली आहे. या प्रकरणी परतवाडा पोलिसांनी पती, सासू आणि नणंदेविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून, घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

पीडित सुजाता (वय २७) हिने दिलेल्या तक्रारीनुसार, ९ मे २०२५ रोजी तिचा विवाह राजेश याच्यासोबत झाला होता. मात्र लग्नानंतर दुसऱ्याच दिवसापासून माहेरून कमी हुंडा आणल्याचे कारण देत तिचा शारीरिक व मानसिक छळ सुरू झाला होता. तक्रारीनुसार, पती राजेश, सासू अनिता आणि नणंद आशा हे वारंवार हुंड्याच्या कारणावरून तिला टोमणे मारत होते. माहेरून अधिक पैसे आणि वस्तू आणाव्यात, यासाठी दबाव टाकला जात होता. या छळामुळे सुजाता मानसिक तणावाखाली होती. २६ एप्रिल रोजी दुपारच्या सुमारास हुंड्याच्या कारणावरून पुन्हा वाद झाला. यावेळी आरोपींनी सुजाताला लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप आहे. या मारहाणीचा फटका तिच्या पोटावर बसल्याने ती गंभीर जखमी झाली. त्यानंतर तिचा गर्भपात झाला आणि तीन महिन्यांच्या गर्भातील बाळाचा मृत्यू झाला. या घटनेतील वेदनादायक बाब म्हणजे, ज्या दिवशी तिच्या विवाहाला एक वर्ष पूर्ण झाले, त्याच दिवशी सुजाताला न्यायासाठी पोलीस ठाण्याच्या पायऱ्या चढाव्या लागल्या. संसाराची स्वप्ने पाहून सासरी गेलेल्या महिलेवरच अत्याचार झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. सुजाताच्या तक्रारीवरून परतवाडा पोलिसांनी पती राजेश, सासू अनिता आणि नणंद आशा यांच्या विरोधात संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू असून, दोषींवर कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. या घटनेमुळे हुंड्यासारख्या सामाजिक विकृतीमुळे महिलांवर होणारे अत्याचार पुन्हा एकदा समोर आले असून, समाजमन हादरून गेले आहे.



# अमरावती विभागाच्या राज्य सेवा हक्क आयुक्तपदी अरुण डोंगरे

**अमरावती/प्रतिनिधीः-** सामान्य प्रशासन विभागाच्या ३० एप्रिल २०२६ च्या अधिसूचनेनुसार अरुण किशोर डोंगरे यांची अमरावती विभागाच्या राज्य सेवा हक्क आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली. राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव यांनी डोंगरे यांना पद व गोपनियतेची शपथ दिली.

नवीन प्रशासन भवन, मुंबई येथील महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाच्या कार्यालयात झालेल्या शपथग्रहण सोहळ्यामध्ये माजी आयुक्त दिलीप शिंदे यांनी नियुक्तीची अधिसूचना वाचून दाखविली. अमरावती विभागाच्या राज्य सेवा हक्क आयुक्तपदी काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल नवनियुक्त आयुक्त अरुण डोंगरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव तसेच वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांचे आभार मानले. या शपथविधी सोहळ्याला विधानसभा सदस्य करण देवतळे, राज्याचे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे, कोकण विभागाचे राज्य सेवा हक्क आयुक्त बलदेव सिंह, पुणे विभागाचे राज्य सेवा हक्क आयुक्त सुधाकर तेलंग तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# एमडी ड्रग्जविरोधात मोठी कारवाई
## 1 कोटी 90 लाखांचे 950 ग्रॅम मेफेड्रोन जप्त

**सोलापूर/प्रतिनिधी :** सोलापूर शहर गुन्हे शाखेनं अमली पदार्थांविरोधात मोठी कारवाई करत तब्बल १ कोटी ९० लाख रुपये किमतीचं ९५० ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) हा अमली पदार्थ जप्त केला आहे. या कारवाईत दोन आरोपींना अटक करण्यात आली असून एका महिलेच्या सहभागाचाही तपास सुरू आहे. पोलीस उपआयुक्त गोहर हसन यांनी पत्रकार परिषद घेउन सविस्तर माहिती दिली. पोलिसांनी अमली पदार्थासोबत दहा लाखांचे चारचाकी वाहन देखील जप्त केले आहे. त्यामुळे पोलिसांनी एकूण दोन कोटींचा मुद्देमाल जप्त केला आहे. रिजवान शब्बीर खान (वय २६, रा. अंबिका नगर भाग-३, नवी जिंदगी, सोलापूर), साहील सिकंदर पिरजादे (रा. सोलापूर) या दोघांना अटक केलं असून कोर्टात हजर केलं असता, चार दिवसांची पोलीस कोठडी मिळाली आहे. एका महिलेला ताब्यात घेतलं असून पोलिसांचा तपास सुरू आहे, आणखीन एक संशयित आरोपी फरार असून पोलीस त्याचा शोध घेत असल्याची माहिती डीसीपी हसन गोहर यांनी दिली.

पोलिसांना खब-याने टीप दिली - क्राईम ब्रँचच्या पोलिसांना एका खब-याने अचूक टीप दिली होती. १२ मे रोजी सकाळी गुन्हे शाखेचे पोलीस पथक शहरात पेट्रोलिंग करत असताना पोलीस अंमलदार भारत पाटील यांना गोपनीय माहिती मिळाली. सात रस्ता परिसरात असलेल्या मुस्लिम कब्रस्तान ते संगमे□र क?लेजकडे जाणा-या रस्त्यावर एका कारमध्ये अमली पदार्थ आहे. पोलिसांनी ताबडतोब जाउन पाहणी केली असता, एक कार संशयित रित्या उभी होती. क्राईम ब्रँचच्या पोलिसांनी उभी असलेल्या हुंडाई व्हेन्यू कारभोवती तत्काळ सापळा रचला.दोन कोटींचा मुद्देमाल हस्तगत - सोलापूर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी कार क्रमांक ग्क्त१३ क्-१४११ मधील संशयिताला ताब्यात घेउन चौकशी केली. कार चालक रिजवान शब्बीर खान (वय २६, रा. अंबिका नगर भाग-३, नवी जिंदगी, सोलापूर) याला ताब्यात घेउन तपास सुरू केला. कारची झडती घेतली असता ड्रायव्हर सीटजवळील ड्रावरमध्ये प्लास्टिकच्या पिशवीत पांढ-या रंगाचा पदार्थ आढळून आला. फारेन्सिक तपासणीत हा पदार्थ मेफेड्रोन (एमडी) असल्याचं स्पष्ट झालं. पोलिसांनी १ कोटी ९० लाख रुपये किमतीचं ९५० ग्रॅम एमडी जप्त केलं. तसंच १० लाख रुपये किमतीची हुंडाई व्हेन्यू कार असा एकूण २ कोटी रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. एका महिलेचा सहभाग असल्याचा संशय - पोलिसांनी या प्रकरणात रिजवान खान याच्यासह साहील सिकंदर पिरजादे (रा. सोलापूर) याला अटक केली असून दोघांना न्यायालयानं चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. तपासादरम्यान या गुन्ह्यात साहील पिरजादे याची पत्नी कायनात साहील पिरजादे उर्फ कायनात साहील खान (मूळ रा. मुंबई, सध्या रा. मंत्रीचंदक नगर, सोलापूर) हिच्या सहभागाची शक्यता समोर आली आहे.

# ये ऊपदेश नहीं-ये नाकामी के सबूत हैं।



## 'सोनं खरेदी करू नका' पीएम मोदींच्या आवाहनावर राहुल गांधींची सडकून टीका; म्हणाले, देश चालवणे त्यांच्या क्षमतेबाहेर!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** इराणमधील संघर्षमय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (१० मे) देशातील नागरिकांना एक महत्त्वपूर्ण आवाहन केलं. त्यांनी नागरिकांना सोन्याची खरेदी टाळण्याचं, परदेश प्रवास मर्यादित करण्याचं आणि पेट्रोलचा वापर कमी करण्याचं आवाहन केलं. याव्यतिरिक्त, त्यांनी कंपन्यांना त्यांच्या 'वर्क फ्रॉम होम' व्यवस्थांचा विस्तार करण्याचं आवाहन केलं आहे. पंतप्रधान मोदींच्या या आवाहनावर काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी म्हटलं आहे की, हे केवळ सल्ले नसून, ते अपयशाचे पुरावे आहेत.

राहुल गांधींची पंतप्रधानांवर टीका : लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स वर एक पोस्ट शेअर केली. त्या पोस्टमध्ये त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना 'तडजोड करणारे पंतप्रधान' असं संबोधलं. त्यांनी लिहिले की, मोदीजींनी काल जनतेकडे त्यागाची मागणी केली सोने खरेदी करू नका, परदेशात जाउ नका, पेट्रोल कमी वापरा, खाद्यतेल आणि इतर वस्तूंचा वापर कमी करा, मेट्रोनं प्रवास करा, वर्क फ्रॉम होम काम करा. हे उपदेश नाहीत, तर अपयशाचे पुरावे आहेत.

ते पुढे म्हणाले की, १२ वर्षांत देशाला अशा स्थितीत आणलं गेलं आहे की आता जनतेलाच सांगावं लागत आहे की काय खरेदी करावं आणि काय नाही, कुठं जावं आणि कुठं जाउ नये. प्रत्येक वेळी जबाबदारी जनतेवर टाकली जाते, जेणेकरून स्वत?ची जबाबदारी झटकता येईल. देश चालवणं आता कॉम्प्रोमाइज्ड पंतप्रधानांच्या आवाक्याबाहेर गेलं आहे.

**पंतप्रधान मोदी काय म्हणाले होते? :** पंतप्रधान मोदींनी जनतेला एक वर्षासाठी सोनं खरेदी करू नका, असं आवाहन केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आयातीवरील अवलंबित्व कमी करण्याची गरज अधोरेखित केली. ते रविवारी हैदराबादच्या सिकंदराबाद येथील एका कार्यक्रमात बोलत होते. मोदींनी सांगितलं की, प्रत्येक कुटुंबानं खाद्यतेलाचा वापर कमी करावा. तसेच, नैसर्गिक शेतीकडे वळावं, जेणेकरून परकीय चलनाची बचत होईल आणि पर्यावरणाचंही संरक्षण होईल.

ते पुढे म्हणाले की, खाद्यतेलाचा वापर कमी केल्यास लोकांचं आरोग्य सुधारेल तसेच देशाची अर्थव्यवस्था अधिक मजबूत होईल. त्यांनी स्पष्ट केलं की, देशाला खाद्यतेलाच्या आयातीसाठी मोठ्या प्रमाणावर परकीय चलन खर्च करावं लागतं. जर प्रत्येक कुटुंबानं खाद्यतेलाचा वापर कमी केला, तर ते देशभक्तीचं मोठं योगदान ठरेल. या उपायामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला फायदा होईलच, शिवाय प्रत्येक व्यक्तीचे आरोग्यही सुधारेल, असंही त्यांनी नमूद केलं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रासायनिक खतांच्या आयातीमुळे देशावर येणा-या आर्थिक दबावाबाबतही भाष्य केले. त्यांनी सांगितले की भारत मोठ्या प्रमाणात परदेशातून रासायनिक खते आयात करतो, त्यामुळे परकीय चलनाचा मोठा खर्च होतो.

मोदींनी शेतक-यांना रासायनिक खतांचा वापर कमी करण्याचं आवाहन केलं. त्यांनी म्हटलं की कृषी क्षेत्रातही मोठ्या प्रमाणावर परकीय चलन खर्च होतं. आपण परदेशातून आणल्या जाणा-या रासायनिक खतांचा वापर निम्म्यावर आणला पाहिजे आणि नैसर्गिक शेतीकडे वळायला हवं. यामुळे परकीय चलनाची बचत होईल आणि जमीन तसेच मातीचं संरक्षण होईल.या वेळी पंतप्रधानांनी देशभक्तीची नवीन व्याख्याही मांडली.

# कर्जमाफीचे पैसे 30 जूनपर्यंत शेतक-यांच्या खात्यात जमा होणार

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील बळीराजासाठी राज्य सरकारने एक अत्यंत दिलासादायक पाउल उचलले आहे. प्रलंबित कर्जमाफीच्या अंमलबजावणीला आता वेग आला आहे. थकबाकीदार शेतक-यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्याचा ऐतिहासिक निर्णय सरकारने घेतला असून या योजनेचा लाभ ३० जूनपूर्वी प्रत्यक्ष लाभार्थ्यांच्या खात्यात पोहोचवण्याचे नियोजन सहकार विभागाने केले आहे. या संदर्भातील सर्व तांत्रिक माहिती संकलित करून सहकार विभागाने राज्य सरकारला सादर केली आहे. आता केवळ अंतिम निर्णयाची प्रतीक्षा आहे.



**सुमारे ३५ लाख शेतकरी होणार कर्जमुक्त-** राज्य सरकारच्या या महत्त्वाकांक्षी निर्णयामुळे महाराष्ट्रातील अंदाजे ३४ ते ३५ लाख शेतक-यांना थेट फायदा होणार आहे. विशेष म्हणजे, ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत ज्या शेतक-यांची कर्जे थकीत आहेत, त्यांना या योजनेचे निकष लागू होण्याची दाट शक्यता आहे. वरिष्ठ सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सरकारने बँकांकडून अत्यंत सूक्ष्म स्तरावर डेटा संकलित केला आहे. यामध्ये शेतक-यांचे नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक, खाते क्रमांक, मंजूर कर्ज रक्कम, पीककर्जाचा तपशील आणि व्याजासह थकीत रकमेची सर्व माहिती गोळा करण्यात आली आहे.

**तीन वर्षांच्या माहितीचे सविस्तर संकलन-** सहकार विभागाने बँकांकडून २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या सलग तीन आर्थिक वर्षांतील नियमित कर्जफेड करणारे आणि थकबाकीदार अशा दोन्ही प्रकारच्या कर्जदारांची माहिती मागवली होती. यामध्ये बँकेचा क्ष्क्ष्क्व कोड, सभासद क्रमांक, ग्राहक आयडी आणि जमीन रेकार्ड अशा तांत्रिक बाबींचाही समावेश आहे. बँकांनी ही सर्व माहिती सरकारकडे सुपूर्द केली असून पात्र लाभार्थ्यांची छाननी पूर्ण झाली आहे. मे महिन्याच्या अखेरीस होणा-या मंत्रिमंडळ बैठकीत या कर्जमाफीच्या प्रस्तावावर अंतिम शिक्कामोर्तब होण्याची चिन्हे आहेत.

**नियमित कर्जदारांनाही मिळणार प्रोत्साहन-** केवळ थकबाकीदारांनाच नव्हे, तर प्रामाणिकपणे आणि वेळेत कर्जाची परतफेड करणा-या शेतक-यांनाही सरकारने विसरलेले नाही. जे शेतकरी नियमितपणे कर्जफेड करत आहेत, त्यांना ५०,००० रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर अनुदान देण्याचा प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन आहे. यामुळे राज्यातील कृषी कर्ज वितरण प्रणालीमध्ये शिस्त राखणा-या शेतक-यांना मोठा आर्थिक पाठबळ मिळणार आहे.

**३० जूनची डेडलाईन-** सरकारने आखलेल्या आराखड्यानुसार, मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर तातडीने निधी वितरणाची प्रक्रिया सुरू केली जाईल. ३० जूनपूर्वी पात्र शेतक-यांच्या बँक खात्यात कर्जमाफीची रक्कम वर्ग करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी आणि खरिपाच्या पेरण्यांच्या पार्श्वभूमीवर ही रक्कम मिळाल्यास शेतक-यांना मोठा आधार मिळेल, अशी भावना व्यक्त होत आहे. सध्या सहकार विभाग आणि राज्य सरकार या योजनेचे अंतिम निकष ठरवण्याच्या कामात व्यस्त असून, लवकरच अधिकृत घोषणा अपेक्षित आहे.



# चंद्रपूरच्या परिचारिका ऊज्ज्वला सोयाम यांचा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते गौरव, राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्काराने सन्मानित



**चंद्रपूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या दुर्गम आणि नक्षलग्रस्त भागामध्ये आरोग्यसेवेची मशाल ही सदैव तेवत ठेवणा?या ऊज्ज्वला महादेव सोयाम यांचा नवी दिल्ली येथे गौरव करण्यात आला. आंतरराष्ट्रीय परिचारिका दिवस निमित्त आज राष्ट्रपती भवन या ठिकाणी आयोजित सोहळ्यात, राष्ट्रपती दौप्रदी मुर्मू यांच्याहस्ते ऊज्ज्वला सोयाम यांना त्यांच्या अतुलनीय कार्याबद्दल प्रतिष्ठित समजला जाणारा "राष्ट्रीय फलोरेन्स नाइटिंगेल पुरस्कार" या पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. या विशेष सोहळ्यात देशभरातील निवडक १५ नर्सिंग अधिकारी, कर्मचारी यांचा उत्कृष्ट सेवेसाठी सन्मान करण्यात आला. या सोहळ्याला केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा, आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव, आरोग्य सचिव पुण्य सलीला श्रीवास्तव उपस्थित होत्या.आदिवासी भागात कन्याभ्रूण हत्या रोखण्यात योगदान - चंद्रपूर येथील शासकीय सामान्य रुग्णालयमध्ये कार्यरत असलेल्या ऊज्ज्वला सोयाम यांनी २४ वर्षांपासून आरोग्य क्षेत्रात अत्यंत समर्पित सेवा दिलेली आहे. विशेषत? नक्षल प्रभावित आणि आदिवासी भागात कन्याभ्रूण हत्या रोखण्यास त्यांनी दिलेलं योगदान, आरोग्य जनजागृतीमध्ये घेतलेला पुढाकार हा गौरवास्पद आहे. नैसर्गिक आपत्ती प्रवणक्षेत्र असो की कठीण भौगोलिक परिस्थिती, उच्च जोखीम असलेलेल्या गर्भवती मातांची व बालकांची काळजी घेण्यात त्यांनी नेहमीच तत्परता दाखवली आहे.

आमच्या परिचारिका,आमचे भविष्य - यावर्षीच्या आंतरराष्ट्रीय परिचारिका दिवसाची संकल्पना आमच्या परिचारिका, आमचे भविष्य सक्षम परिचारिका जीव वाचवतात, अशी ठेवली होती. या पुरस्काराचं स्वरूप पदक, प्रमाणपत्र, प्रशस्तीपत्र आणि १ लाख रुपये रोख असं आहे.ग्रामीण भागात काम करताना अनेक समस्या येतात. मात्र त्यावर मात करुन परिचारिका या सेवा देत असतात. अशाच एका परिचारिकेचा राष्ट्रीय गौरव झाल्यानं त्यांच्या सहकारी परिचारिकांनी आनंद व्यक्त केला.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## धोक्याची घंटा

महाराष्ट्रातील यंदाची पाणी स्थिती केवळ उन्हाळ्यातील नियमित टंचाई नसून राज्याच्या जल व्यवस्थापनासमोरील गंभीर आव्हानाची स्पष्ट सूचना आहे. राज्यातील धरणांमध्ये सध्या ६५३.६३ टीएमसी इतका पाणीसाठा उपलब्ध असून तो मागील वर्षाच्या तुलनेत १०१.७७ टीएमसीने अधिक आहे, ही बाब दिलासादायक असली तरी हवामान बदलाचे गंभीर परिणाम आणि तापमानाची वाढती तीव्रता चिंताजनक म्हणावे अशा पातळीवर पोहोचली आहे. साहजिकच मे मध्ये धरणांचा सरासरी साठा ३७ ते ३८ टक्क्यांवर घटला. ४११ गावे आणि ११९४ वाड्या-वस्त्या टँकरवर अवलंबून आहेत. शासनाकडून ४६६ टँकर्सद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. विशेषतः मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची परिस्थिती चिंताजनक आहे.छत्रपती संभाजीनगर विभागात सर्वाधिक १३८ टँकर्सद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे, तर नाशिक विभागात ८३, पुणे ३७ आणि सातारा जिल्ह्यात ४१ टँकर्स वापरले जात आहेत. कोयना धरणातील उपयुक्त पाणीसाठा २५.७२ टक्क्यांवर आला, तर नाशिक विभागातील जल प्रकल्पांचा साठा ४२.६९ टक्क्यांवर आहे. ही आकडेवारी केवळ धरणातील पाण्याची नसून राज्याच्या भविष्यातील जलसुरक्षेची धोक्याची घंटा मानावी लागेल! एप्रिल-मे महिन्यातील उष्णतेच्या लाटेमुळे भूजल पातळी मोठ्या प्रमाणावर खाली गेली. अनेक गावांमध्ये विहिरी आणि बोअरवेल कोरड्या पडल्या. टँकर हेच पाण्याचे मुख्य साधन बनले. ग्रामीण भागात महिलांना अजूनही पाण्यासाठी मैलोन्मैल पायपीट करावी लागते. पिण्याच्या पाण्याची समस्या आता सामाजिक आणि आर्थिक संकटात रूपांतरित होत आहे. या पार्श्वभूमीवर सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे राज्याने पाण्याच्या प्रश्नाकडे केवळ हंगामी आपत्ती म्हणून पाहणे थांबवले पाहिजे. ही टंचाई केवळ पावसाच्या कमतरतेमुळे निर्माण झालेली समस्या नाही; तर ती नियोजनातील त्रुटी, भूजलाचा अनियंत्रित उपसा, जलस्त्रोतांचे असमान वितरण आणि पाण्याच्या अव्यवस्थित वापराचा परिणाम आहे. मोठी धरणे उभी राहिली, परंतु शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचविणारी शाश्वत यंत्रणा आजही नाही.शेती क्षेत्र हा राज्यातील सर्वाधिक पाणी वापरणारा घटक आहे. एकीकडे उसासारख्या पिकांसाठी पाण्याचा सुकाळ असताना कोरडवाहू भागातील शेतकरी पाण्याविना त्रस्त आहेत. यासाठी पीक पद्धतीमध्ये बदल करणे अत्यावश्यक आहे. कमी पाण्यात येणाऱ्या डाळी, तेलबिया, फळबागा आणि बहुपयोगी पिकांना प्रोत्साहन दिले पाहिजे. ठिबक आणि तुषार सिंचनाचा वापर सक्तीने वाढवण्याची गरज आहे. जल संधारणाशी जोडलेल्या शेती धोरणाशिवाय राज्याची पाणी समस्या कमी होणार नाही. त्याचबरोबर शहरांतील पाण्याचा अपव्यय हा देखील गंभीर विषय आहे. महानगरांमध्ये हजारो लिटर पाणी केवळ गळतीमुळे वाया जाते. पुनर्वापर आणि सांडपाण्याच्या शुद्धीकरणाकडे अजूनही आवश्यक त्या गांभीर्याने पाहिले जात नाही. औद्योगिक क्षेत्रासाठी पुनर्वापरित पाण्याचा वापर बंधनकारक केला गेला पाहिजे. उद्योगांनी गोड्या पाण्यावरचा ताण कमी करण्यासाठी 'झिरो लिक्विड डिस्चार्ज'सारख्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे आवश्यक आहे.ग्रामीण महाराष्ट्रात जलसंधारणाची चळवळ पुन्हा नव्या ताकदीने उभी करण्याची गरज आहे. जलयुक्त शिवारसारख्या योजनांचे केवळ उद्घाटन नको, तर त्यांचे परिणामकारक पुनरुज्जीवन आवश्यक आहे. गावपातळीवर पाण्याचे 'वॉटर बजेट' तयार झाले पाहिजे. पाण्याची उपलब्धता आणि त्याचा वापर याचे नियोजन लोकसहभागातून झाले पाहिजे. पाण्याचा प्रश्न केवळ शासनाचा नाही; तो समाजाचाही आहे, ही जाणीव निर्माण करावी लागेल. हवामान बदलाचा गंभीर परिणामही आता स्पष्ट दिसू लागला आहे. एल निनोच्या प्रभावामुळे मान्सूनबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. पाऊस लांबल्यास किंवा कमी झाल्यास विद्यमान परिस्थिती आणखी बिकट होऊ शकते. असे असले तरी, बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार होत असल्याने पूर्व मान्सूनसाठी अनुकूल स्थिती निर्माण होत असल्याचे संकेत दिलासादायक आहेत. तरीही केवळ पावसाच्या आशेवर अवलंबून राहणे धोकादायक ठरेल.राज्य सरकारने तातडीच्या आणि दीर्घकालीन अशा दुहेरी पातळीवर उपाययोजना करणे आवश्यक आहे. तातडीच्या उपायांमध्ये टँकर व्यवस्थापन अधिक पारदर्शक करणे, पिण्याच्या पाण्यास प्राधान्य देणे, रेल्वेने पाणीपुरवठ्याचे पर्याय तयार ठेवणे आणि भूजल उपशावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. दीर्घकालीन उपायांमध्ये नदीजोड प्रकल्पांचा पुनर्विचार, जलपुनर्भरण, शहरी सांडपाणी पुनर्वापर, जलमित्र ग्राम योजना आणि भूजल कायद्याची प्रभावी अंमलबजावणी यांचा समावेश असला पाहिजे. जलसंधारण, पुनर्भरण आणि पाण्याचा काटकसरीने वापर, याशिवाय भविष्यातील जलसुरक्षा शक्य होणार नाही. प्रत्येक गावाने स्थानिक जलस्त्रोतांचे संरक्षण करण्यासाठी लोकसहभागातून दीर्घकालीन नियोजन करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना कमी पाण्यात येणाऱ्या पिकांकडे वळण्यासाठी आर्थिक प्रोत्साहन आणि तांत्रिक मदत देणे काळाची गरज आहे.शहरांमध्ये पावसाचे पाणी साठवणे आणि सांडपाण्याचा पुनर्वापर सक्तीचा केल्यास पाणी वापरावरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो. हवामान बदलामुळे भविष्यात दुष्काळ आणि अनियमित पावसाचे प्रमाण वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन दीर्घकालीन नियोजन गरजेचे. महाराष्ट्राने आता 'पाणी हे अमर्याद संसाधन आहे' हा भ्रम सोडून 'प्रत्येक थेंब मौल्यवान' ही भूमिका स्वीकारण्याची वेळ आली आहे. भविष्यातील आर्थिक विकास, शेतीची उत्पादकता, औद्योगिक वाढ आणि सामाजिक स्थैर्य या सर्वांचा पाया जलसुरक्षेवरच उभा आहे. पाणी प्रश्नाकडे केवळ संकट म्हणून नव्हे, तर व्यवस्थापन आणि शाश्वततेची संधी म्हणून पाहिले तरच महाराष्ट्र पुढील दशकात सुरक्षित राहू शकेल. अन्यथा दरवर्षी उन्हाळा आला की टँकर, टंचाई आणि तहानलेल्या गावांचेच चित्र पुन्हा पुन्हा समोर येत राहील. जल व्यवस्थापनात आधुनिक तंत्रज्ञान, डेटा विश्लेषण आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचा समन्वय वाढविल्यास परिस्थितीत सकारात्मक बदल घडू शकतो. राज्याच्या विकासाचा पाया मजबूत ठेवायचा असेल, तर पाण्याचे संवर्धन आणि न्याय्य वितरण हीच पुढील काळातील सर्वांत मोठी जबाबदारी ठरणार आहे. बंगालच्या उपसागरात निर्माण होत असलेल्या सकारात्मक स्थितीवर अवलंबून राहून चालणार नाही, पाण्याच्या दीर्घकालीन नियोजनाच्या दिशेने पाऊल टाकणे हिताचे.

# तापमानवाढीचे अर्थकारण



**तापमानवाढीचे रोजचे वाढते आकडे हा केवळ हवामानाचा प्रश्न नसून ते आर्थिक विकास, सार्वजनिक आरोग्य, रोजगार आणि सामाजिक समता यांच्यासमोरील गंभीर आव्हान बनले आहे. तापमान किती वाढले हा मुद्दा महत्त्वाचा आहेच, पण त्याची किंमत कोण मोजत आहे, हे त्याहून अधिक महत्त्वाचे आहे.**

यंदा मे महिन्याच्या सुरुवातीलाच भारतातील अनेक राज्यांमध्ये तापमानाने ४४ ते ४७ अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला आहे. राजधानी दिल्लीपासून गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, तेलंगणा आणि विदर्भापर्यंत उष्णतेच्या लाटेने जनजीवन विस्कळीत केले आहे. हवामान बदलाचा परिणाम भविष्यात दिसेल, अशी एके काळी व्यक्त केली जाणारी भीती आता वर्तमानातील वास्तव बनली आहे. यंदा एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यातच भारतातील वीज मागणीने २५६ गिगावॅटचा विक्रमी स्तर गाठला, जो भारताच्या ऊर्जा इतिहासातील महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. वाढते तापमान हा केवळ हवामानाचा प्रश्न नसून ते आर्थिक विकास, सार्वजनिक आरोग्य, रोजगार आणि सामाजिक समता यांच्यासमोरील गंभीर आव्हान बनते आहे. प्रश्न एवढाच नाही की तापमान किती वाढले, तर हा आहे की या तापमानवाढीची किंमत कोण मोजत आहे? अर्थातच शेतकरी, मजूर, शहरी गरीब, विद्यार्थी, वृद्ध, महिला आणि लहान उद्योग हे सर्व घटक या संकटाच्या केंद्रस्थानी आहेत. हे विचारात घेता निसर्गाचा समतोल राखणे ही आता केवळ नैतिक जबाबदारी नसून आर्थिक निकड बनली आहे.

### तापमानाचे बदलते स्वरूप

भारतात एप्रिल-मे महिन्यांत उष्णता असणे नवीन नाही; मात्र उष्णतेची तीव्रता, कालावधी आणि भौगोलिक विस्तार चिंताजनक वेगाने बदलत आहे. आंतरराष्ट्रीय हवामान संशोधन मंचाच्या 'क्लायमामीटर'च्या एप्रिल २०२६च्या अहवालानुसार भारतातील एप्रिल २०२६ उष्णतेची लाट ऐतिहासिक सरासरीपेक्षा सुमारे दोन अंश सेल्सिअस अधिक तीव्र होती आणि तिचा परिणाम सुमारे १४.६ कोटी लोकसंख्येवर झाला. हा बदल केवळ तापमानाच्या आकड्यांत दिसत नाही; रात्रीचे तापमान कमी न होणे ही अधिक गंभीर बाब आहे. विदर्भ, गुजरात आणि उत्तर भारतातील अनेक शहरांमध्ये रात्रीचे तापमान ३० अंशांच्या आसपास नोंदवले गेले. परिणामी शरीराला नैसर्गिक शीतलता मिळत नाही आणि उष्माघाताचा धोका वाढतो. भारतातील शहरीकरण, काँक्रीटीकरण, हरित क्षेत्रांची घट, वाहनांची वाढती संख्या आणि औद्योगिक उत्सर्जन यामुळे ''अर्बन हीट आयलंड'' परिणाम तीव्र होत आहे. त्यामुळे ग्रामीण भागापेक्षा शहरे अधिक तापत आहेत. पुणे, नागपूर, मुंबई, दिल्ली, अहमदाबाद यांसारख्या शहरांमध्ये हा परिणाम स्पष्ट दिसतो. हवामान बदल हा आता भविष्यातील धोका नसून विकासाच्या प्रत्येक समीकरणात समाविष्ट करावा लागणारा वास्तव घटक बनला आहे.

### उत्पादन, शेती आणि ऊर्जा क्षेत्रासमोरील संकटे

वाढत्या उष्णतेच्या लाटेचा सर्वाधिक परिणाम देशाच्या उत्पादनक्षमतेवर होत आहे. बांधकाम, वाहतूक, शेती, लघुउद्योग, लॉजिस्टिक्स आणि उत्पादन उद्योगांमध्ये काम करणाऱ्या कामगारांची कार्यक्षमता यामुळे मोठ्या प्रमाणात घटते. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या अंदाजानुसार उष्णतेमुळे भारतात दरवर्षी अब्जावधी श्रम-तासांचे नुकसान होते. 'लॅन्सेट'च्या अहवालानुसार, अतिउष्णतेमुळे भारतात कृषी आणि बांधकाम क्षेत्रात दरवर्षी अंदाजे १० ते १५ हजार कोटी मनुष्य-तासांचे नुकसान होत आहे. वाढत्या तापमानामुळे गव्हांच्या उत्पादनात १०-३० टक्क्यांची घट होण्याची शक्यता आहे. यामुळे अन्नसुरक्षेचा प्रश्न निर्माण होऊन महागाई वाढते. उष्णतेमुळे देशात आधीच सुमारे १५९ अब्ज अमेरिकी डॉलर्स इतक्या उत्पादकतेचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. शेती क्षेत्रात रब्बी हंगामातील गहू, हरभरा, डाळी, फळबागा आणि भाजीपाला उत्पादनावर उष्णतेचा परिणाम होत आहे. जमिनीतील आर्द्रता कमी झाल्याने सिंचनाचा खर्च वाढतो आहे. पाण्याची मागणी वाढते आहे आणि उपलब्धता कमी होते आहे.

ऊर्जा क्षेत्रातही या परिस्थितीमुळे प्रचंड दबाव निर्माण झाला आहे. एप्रिल २०२६ मध्ये भारतातील वीज मागणीने २५६ गिगावॅटचा विक्रम केला. त्याच काळात गुजरातमध्ये राज्यस्तरीय वीज मागणी २५,३६० मेगावॅटपर्यंत पोहोचली. साहजिकच वीज मागणी वाढली की उत्पादन खर्च वाढतो, कोळसा वापर वाढतो, कार्बन उत्सर्जन वाढते आणि पुन्हा हवामान बदल तीव्र होतो हे एक दुष्टचक्र आहे. वाढत्या उष्णतेमुळे अन्नधान्य पुरवठ्यावर परिणाम झाल्यास बाजारात महागाई वाढते. फळे, भाज्या, दूध आणि दैनंदिन वापराच्या वस्तूंच्या किमती वाढण्यामागे वाहतूक खर्च आणि उत्पादन घट ही महत्त्वाची कारणे ठरतात.

### गरीब, कामगार आणि आरोग्यव्यवस्था

हवामान बदलामुळे वाढणारे तापमान आता केवळ पर्यावरणीय प्रश्न राहिलेला नाही; तो सामाजिक न्याय, श्रम अर्थकारण आणि सार्वजनिक आरोग्याचा गंभीर प्रश्न बनला आहे. भारतासारख्या उष्ण कटिबंधीय देशात त्याचे परिणाम सर्वाधिक गरीब, असंघटित कामगार आणि आधीच ताणाखाली असलेल्या आरोग्य व्यवस्थेवर दिसून येत आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या २०२४च्या विश्लेषणानुसार, २००० ते २०१९ या कालावधीत जगभर दरवर्षी सरासरी सुमारे ४.८९ लाख उष्णतासंबंधित मृत्यू नोंदवले गेले. यातील जवळपास ४५ टक्के मृत्यू आशिया खंडात झाले आहेत. उष्णतेचा सर्वाधिक परिणाम वृद्ध, बालके, हृदयविकार, मधुमेह आणि किडनीच्या आजारांनी ग्रस्त व्यक्तींवर होतो. आरोग्य व्यवस्थेवर अचानक वाढणाऱ्या रुग्णसंख्येचा मोठा दबाव निर्माण होतो.

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या २०२४ अहवालानुसार, जगभर ७० टक्क्यांहून अधिक कामगार वर्षातून किमान एकदा अतिउष्णतेच्या धोक्याला सामोरे जातात. शेती, बांधकाम, कचरा व्यवस्थापन, वाहतूक आणि रस्त्यावर व्यवसाय करणारे सर्वाधिक जोखमीच्या गटात आहेत. तापमान ४० अंशांच्या पुढे गेले की मानवी श्रमक्षमता झपाट्याने घटते; परिणामी कामाचे तास कमी होतात, उत्पन्न घटते आणि कुटुंबाच्या आर्थिक सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर होतो. एकंदरीतच गरिबांसाठी उष्णता ही केवळ तापमानाची समस्या नसते; ती निवारा, पाणी, रोजगार आणि आरोग्य या सर्वांशी जोडलेली असते. झोपडपट्ट्या, पत्र्याची घरे, अपुरी हवा खेळती व्यवस्था आणि सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा अभाव यामुळे उष्णतेचा परिणाम अनेक पटींनी वाढतो. भारतातील परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. लॅन्सेटच्या २०२५ अहवालानुसार, भारतातील प्रत्येक व्यक्तीने २०२४ मध्ये सरासरी १९.८ उष्णतेचे दिवस अनुभवले. त्याच वर्षी उष्णतेमुळे भारतात २४७ अब्ज संभाव्य श्रमतासांचे नुकसान झाले, जे आतापर्यंतचे सर्वाधिक आहे.

वाढत्या तापमानाचा सर्वाधिक फटका आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गाला बसतो. वातानुकूलन, सुरक्षित निवास, पुरेसे पाणी किंवा आरोग्यसेवा यांची उपलब्धता नसलेला वर्ग अधिक असुरक्षित असतो. बांधकाम मजूर, शेतमजूर, रस्त्यावरचे विक्रेते, डिलिव्हरी कर्मचारी, वाहतूक क्षेत्रातील कामगार यांना काम थांबविणे परवडत नाही. यावर्षी अनेक कंपन्यांनी कामाच्या वेळेत बदल, विश्रांती केंद्रे आणि घरून कामाचे पर्याय लागू केले असल्याच्या बातम्या आहेत. आरोग्य क्षेत्रावरही मोठा दबाव येतो. उष्माघात, डिहायड्रेशन, रक्तदाब, हृदयविकार, मूत्रपिंडाशी संबंधित आजार, त्वचारोग आणि श्वसनाचे त्रास वाढतात. वृद्ध नागरिक आणि लहान मुले विशेषत: जोखमीच्या गटात असतात. शाळा-कॉलेजांचे वेळापत्रक बदलणे, परीक्षा पुढे ढकलणे, दुपारी सार्वजनिक कार्यक्रम टाळणे अशा उपाययोजना राज्यांना कराव्या लागत आहेत. वाढती उष्णता ही सामाजिक विषमता अधिक तीव्र करते. श्रीमंत वर्गासाठी ती असुविधा असू शकते; गरिबांसाठी ती जगण्याचा प्रश्न बनते.

### हवामानस्नेही विकासाची अपरिहार्यता

भारतीय अर्थव्यवस्था जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे; मात्र हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या उष्णतेच्या संकटाकडे दुर्लक्ष केल्यास ही प्रगती असमतोल ठरू शकते. उष्णतेच्या लाटा या केवळ तापमानवाढीचा विषय नाहीत; त्या रोजगार, शेती, आरोग्य, शिक्षण, ऊर्जा आणि सामाजिक न्याय यांच्याशी थेट जोडलेल्या आहेत. जागतिक बँकेच्या अंदाजानुसार, २०३० पर्यंत उष्णतेमुळे कामाच्या तासांत होणाऱ्या घटीमुळे भारताच्या जीडीपीला सुमारे २.८ ते ४.५ टक्क्यांचा फटका बसू शकतो. दिवसेंदिवस वाढत असलेल्या तापमानाच्या झळा फक्त तात्पुरत्या उपायांनी कमी होणार नाहीत. यासाठी राष्ट्रीय आणि स्थानिक पातळीवर दीर्घकालीन धोरणात्मक बदल आवश्यक ठरतील. प्रथम, प्रत्येक राज्याने 'हीट ॲक्शन प्लॅन' अधिक प्रभावी करणे गरजेचे आहे. उष्णतेचा अंदाज, सार्वजनिक सूचना, पाणी उपलब्धता, आरोग्य केंद्रांची तयारी आणि कामगार संरक्षण यांचा समन्वय हवा. दुसरे म्हणजे शहर नियोजनात हरित पट्टे, जलसंधारण, उष्णता परावर्तित करणारे बांधकाम साहित्य, छतांवरील सौर ऊर्जा आणि पावसाचे पाणी साठवण या उपाययोजना अनिवार्य कराव्या लागतील. तिसरे म्हणजे कृषी क्षेत्राला हवामान-संवेदनशील तंत्रज्ञान, सूक्ष्म सिंचन, दुष्काळसहिष्णू बियाणे आणि डिजिटल हवामान सूचना उपलब्ध करून द्याव्या लागतील. चौथे म्हणजे अक्षय ऊर्जा क्षेत्रात गुंतवणूक वाढवावी लागेल. यंदाच्या विक्रमी वीज मागणीत सौर ऊर्जेचे योगदान महत्त्वाचे ठरले आहे. एकंदरीतच विकासाचा पुढचा टप्पा केवळ जीडीपी वाढीऐवजी नागरिकांना सुरक्षित, शाश्वत आणि हवामानस्नेही जीवन देता येते का, यावर ठरणार आहे. उष्णतेच्या या वाढत्या लाटांच्या माध्यमातून निसर्ग आपल्याला इशारा देत आहे. आता निर्णय आपणच घ्यायचा आहे.

**– नितीन बाबर**

# द्रविड राजकारण

द्राविड मुनेत्र कळहम आणि अण्णा द्रविड मुनेत्र कळहम (पुढे ऑल इंडिया द्रविड मुनेत्र कळहम) हे दोन राजकीय पक्ष आत्मसन्मान आंदोलनाच्या सांस्कृतिक आंदोलनातून उभे राहले.मूळ संघटना द्रविड कळहम. या संघटनेचा भारतीय संविधानाला विरोध होता. कारण संविधान हे ब्राह्मणांचे कारस्थान आहे,अशी पेरीयार रामस्वामी नायकर यांची धारणा होती. भारतीय संविधानाची जाहीर होळी हा द्रविड कळहमचा कार्यक्रम वर्षातून एकदा पार पडायचा.

कर्नाटक, आंध्र प्रदेश, तमिळनाडू आणि केरळ या राज्यांचा म्हणून द्रविडनाडू नावाचा स्वतंत्र देश म्हणजे राष्ट्र-राज्य असायला हवे अशी मागणी रामस्वामी नायकर यांनी केली होती.१९६२ साली, चीनने भारतावर आक्रमण केल्यानंतर मात्र केंद्र सरकारने द्रविड कळहमच्या विरोधात कठोर भूमिका घेतली. नायकर आणि अण्णा दुराई यांच्यामध्ये मतभेद होते. अण्णा दुराई यांनी फुटीर राष्ट्रवादाला विरोध केला. त्यातून द्रविड मुनेत्र कळहम हा राजकीय पक्ष उभा राह्यला. आणि १९६७ साली या पक्षाने राजकारणात प्रवेश केला आणि पहिल्याच निवडणुकीत काँग्रेसला पराभूत केले. अण्णादुराई तमिळनाडूचे मुख्यमंत्री झाले.

तेव्हापासून आजतागायत तमिळनाडूमध्ये द्रमुक आणि एआयडिएमके हे आलटून-पालटून सत्तेवर आहेत.



तमिळनाडूमध्ये कोणत्याही राष्ट्रीय पक्षाला (काँग्रेस, भाजप, कम्युनिस्ट, इत्यादी) सत्ता सोडा परंतु विरोधी पक्षनेतेपदही मिळालेले नाही. जयललिता यांच्या निधनानंतर रजनीकांत, कमल्हासन यांनीही राजकीय पक्ष काढले. मात्र चित्रपट क्षेत्राचा त्याग केला नाही. पुढे त्यांनी द्रमुकशी जुळवून घेतले. कमल्हासन त्यामुळेच राज्यसभेत गेले.

द्रविड सांस्कृतिक आंदोलनातून निर्माण झालेल्या दोन्ही पक्षांबाबत जनतेमध्ये नाराजी होती.वास्तविक या दोन्ही पक्षांनी राज्यामध्ये लोककल्याणकारी योजनांना प्राधान्य दिले. राज्याची औद्योगिक प्रगती केली.एम.के.स्टालीन यांची कारकीर्द या मुद्द्यावर सर्वांवर कडी करणारी होती.

जोसेफ विजय यांचा तमिळगा वेत्री कळघम हा पक्ष गेल्या वर्षी स्थापन झाला. हा आपला प्रमुख स्पर्धक आहे ही बाब द्रमुक वा एआयडिएमके यांच्या ध्यानी आली नाही. कारण या पक्षाचे संघटन,प्रचार, राजकारण वेगळे होते.विजय हे तरुणांच्या आकांक्षांचे प्रतिनिधीत्व करत होते. त्यांचा प्रचार वेगळा होता.मूळ हिरोचा डबल म्हणजे त्याच्यासारखा दिसणारा माणूस मेकअप वगैरे करून स्टंट सीनमध्ये काम करतो.आपल्या डबल ना विजय यांनी प्रचारात उतरवले होते.त्याशिवाय होलोग्रामचा वापर केला होता.त्यांचे फॅन क्लब हीच त्यांची राजकीय संघटना झाली. द्रविड सांस्कृतिक आंदोलनातून उभे राह्यलेले दोन पक्ष,एकमेकांचे स्पर्धक नाही तर शत्रू होते. त्यांनी एकमेकांवर शरसंधान चालू ठेवले. मात्र मतदारांना या दोन्ही राजकीय पक्षांना पर्याय हवा होता, ही बाब त्यांच्या ध्यानी आली नाही. आत्मसन्मान आंदोलनाचे दागिने विकून झाले आहेत.राज्याची आर्थिक प्रगती झाली आहे,मात्र मतदारांच्या मनात दोन्ही द्रविड पक्षांबद्दल कमालीची नाराजी आहे, ही बाब दोन्ही द्रविड पक्षांच्या ध्यानी आली नाही. तमिळ वेत्री कळघम या पक्षाकडे त्यांनी दुर्लक्षच केले. हा राजकीय पक्ष नाही, एका अराजकीय संघटनेला (फॅन क्लब) तामिळनाडूच्या राजकारणात स्थान नाही, आणि कोणताही राष्ट्रीय पक्षालाही तामिळनाडून सामाजिक-सांस्कृतिक-आर्थिक आधार नाही, अशी दोन्ही द्रविड पक्षांची धारणा होती.

तमिळ वेत्री कळघम या पक्षाला निसटते बहुमत मिळाले. अशा परिस्थितीत सरकार स्थापन करण्यासाठी त्यांना अन्य पक्षांचा पाठिंबा गरजेचा होता.हा पक्ष सत्तेवर आला तर दोन्ही द्रविड पक्षांचा राज्यामध्ये झपाट्याने ऱ्हास होईल त्यामुळे द्रमुक आणि एआयडिएमके यांनी एकत्र यावे का, अशीही चर्चा दोन्ही पक्षांमध्ये सुरु होती.

जोसेफ विजय यांचा तमिळ वेत्री कळघम हा पक्ष पेरियार यांच्या विचारधारेचा पाईक आहे असे सांगितले जाते.दोन द्रविड पक्षांच्या विरोधात तमिळनाडूतील बहुसंख्य मतदारांनी राष्ट्रीय पक्षांचा नाही तर प्रादेशिक पक्षाचा पर्याय स्वीकारला.द्रविड अस्मिता आणि आत्मसन्मान आंदोलनाची मूळ किती खोलवर रुजली आहेत,हे यावरून समजते. तामिळनाडूच्या राज्यपालांनी विजय यांचा सत्ता स्थापनेचा दावा मान्य केला नाही, म्हणजे विजय आणि त्यांचा पक्ष, भाजपचा प्रॉक्सी नाही हे स्पष्ट झाले आहे. विरुथलाई चिरुथिगल काची (व्हीसीके), भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि काँग्रेस यांनी विजय यांनी पाठिंबा दिल्याने विजय यांचा मुख्यमंत्री होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

विरोधी पक्षाची जागा द्रमुक घेतो की एआयडिएमके एवढाच प्रश्न आहे. आसाम, पश्चिम बंगाल, महाराष्ट्र यांच्यापेक्षा तमिळनाडूचे मतदार प्रगल्भ आहेत, हे मोकळ्या मनाने मान्य करायला हवे.महाराष्ट्राची परिस्थिती कमालीची शोचनीय आहे. मराठा, ओबीसी,दलित मतदार काँग्रेसच्या झेंड्याखाली एकत्र येऊ नयेत याची खबरदारी घेण्यासाठी शिंदे सेना, राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट भाजपने दावणीला बांधले आहेत (आपण भाजपचे प्रॉक्सी मतदार आहोत हे बारामतीच्या मतदारांना माहीत नाही कारण शरद पवारांनी त्यांचे असेच राजकीय प्रशिक्षण केले आहे). त्याशिवाय आंबेडकरवादी आहेतच, ठाकरे सेना आणि मनसे नेहमीच तळ्यात-मळ्यात असा खेळ करत असतात.

**-सुनील तांबे,** मुंबई

## सेंद्रीय शेतीकडे वळूय

मा. पंतप्रधानांनी इराण–अमेरिका युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशाला परकीय चलनाच्या वापराबाबत काटकसरीचे आवाहन केले आहे. या युद्धामुळे तेलाच्या आयातीबरोबरच रासायनिक खतांच्या आयातीवरही मोठा परिणाम झाला आहे.रासायनिक खतांमुळे कमी खर्चात अधिक उत्पादन मिळत असले, तरी दीर्घकालीन दृष्टीने त्याचे दुष्परिणाम गंभीर आहेत. जमिनीचा सुपीकपणा कमी होणे, मातीतील नैसर्गिक गुणधर्म नष्ट होणे आणि अन्नधान्यातून विषारी घटक मानवी शरीरात जाणे, यामुळे विविध आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागत आहे. 'जगाचा पोशिंदा' म्हणून ओळखला जाणारा आपला शेतकरी नकळतपणे रासायनिक शेतीमुळे अन्नसाखळीत निर्माण होणाऱ्या विषाचा भागीदार बनत आहे.

**अनिकेत शेटे**

## मराठी पाट्या ?

मार्च २०२२ मध्ये पार पडलेल्या राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्यातील दुकाने, आस्थापने आणि कार्यालयांवरील नामफलक मराठी भाषेत आणि ठळकपणे लिहिण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र चार वर्षानंतर आजही अनेक दुकाने आणि आस्थापनांवर मराठी पाट्या नसल्याचे आढळून आले आहे. त्यात प्रामुख्याने नामांकित हॉटेल आणि कॉर्पोरेट कार्यालयांवर मराठी भाषेत नामफलक नसल्याने मुंबई महापालिकेच्या विधी समितीच्या बैठकीत नामांकित हॉटेल, कॉर्पोरेट कार्यालयांना कायद्यापासून सवलत देण्यात आली आहे का, असा मुद्दा उपस्थित झाला होता. त्या अनुषंगाने अशा कायदा न पाळणाऱ्या आस्थापनांना अंतिम इशारा देऊन एका महिन्यात मराठी पाट्या न लावल्यास थेट आस्थापना बंद करण्याचे आदेश पालिका प्रशासनाने दिले आहेत, ते योग्यच आहेत या निमित्ताने मराठी पाट्यांची आठवण पुन्हा एकदा झाली आहे.

**- प्रदीप मोरे**

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

# १९० मंडळांतील शेतकरी पीक विम्यापासून वंचित ?

## पालकमंत्री, जिल्हाधिकारी व कृषी विभागाच्या दुर्लक्षामुळे ही वेळ : देवानंद पवार

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - खरीप हंगाम २०२५-२६ मध्ये यवतमाळ जिल्ह्यातील तब्बल ३ लाख ६९ हजार ३६२ शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत सुमारे २६ कोटी ६७ लाख रुपयांचा प्रीमियम भरला. केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा मिळून जवळपास १३३ कोटी ८५ लाख रुपयांचा निधी विमा कंपनीकडे जमा झाला. मात्र एवढा मोठा निधी जमा होऊनही जिल्ह्यातील ११० मंडळांतील शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मिळणार नसल्याची माहिती समोर आल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.



सततच्या पावसामुळे कापूस व सोयाबीन पिकांचे मोठे नुकसान झाले होते. उत्पादन घटल्याने शासनाने जिल्ह्याला दुष्काळी मदतही जाहीर केली. मात्र एकीकडे नुकसान मान्य करून दुसरीकडे पीक विमा नाकारणे हा मोठा विरोधाभास असल्याची चर्चा सुरू आहे. पीक काढणी प्रयोग (CCE), Threshold Yield (TY) व Actual Yield (AY) निश्चित करताना गंभीर त्रुटी झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. प्रत्यक्ष शेतात नुकसान असताना कागदावर उत्पादन जास्त दाखवण्यात आल्याने जिल्ह्याला "झिरो क्लेम" दाखवण्यात आल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये आहे. या संपूर्ण प्रक्रियेत पालकमंत्री संजय राठोड, जिल्हाधिकारी आणि कृषी विभागाने विशेष लक्ष न दिल्यानेच ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप करण्यात आला. राज्यात सोयाबीनसाठी १ हजार २१९ कोटींची मदत जाहीर झाली, मात्र यवतमाळचा समावेश नसल्याने शेतकरी संभ्रमात आहेत. कपाशीबाबतही अद्याप स्पष्टता नसल्याने नाराजी वाढली आहे.

दरम्यान, "तांत्रिक त्रुटी"मुळे पोर्टलवर रक्कम शून्य दिसत असल्याचे स्पष्टीकरण देण्यात येत असले तरी, आवश्यक माहिती वेळेत अपलोड व पाठपुरावा करण्यात प्रशासन अपयशी ठरल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे मुख्यमंत्री यांनी संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून CCE अहवाल व तालुकानिहाय TY-AY आकडेवारी सार्वजनिक करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. देवानंद पवार, राजू पडगीलवार, शंतनू शेटे व पंजाब जाधव यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

# मोटर सायकल चोरट्यास पोलीसांनी ठोकल्या बेड्या

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - पोलीस स्टेशन पुसद शहर येथे फिर्यादी नामे अतुल विश्वनाथ वानखडे रा. गायमुख नगर हे दि.03/05/2026 रोजी रात्री 09/15 वा. सुमारास त्यांची पेंशन प्रो कंपनीची मोटर सायकल अनुप्रभा हॉटेल समोर उभी करुण मंडपाचे काम करीत असताना त्यांची मोटर सायकल कोणीतरी अज्ञात ईसमाने चोरुण नेली आहे.

पोलीस स्टेशन पुसद शहर येथे दिलेल्या रिपोर्ट वरुण अपराध अप.क्र. 334/2026 कलम 303 (2) भा.न्या. सं.प्रमाणे गुन्हा नोंद करुण तपासावर असताना पोलीस स्टेशनचे पुसद शहरचे ठाणेदार सेवांनद वानखडे यांनी पुसद



शहरातील वाढलेल्या चोरीचे गुन्हयाचे गांभीर्य ओळखुन मोटर सायकल चोरटे यांचा शोध घेने कामी डी.बी.स्टॉप.यांना योग्य त्या सुचना देउन गुन्हा उघडकीस आनन्याचे आदेशीत केले. त्यावरुण सातत्याने पोलीस कौशल्याचा वापर करुण आरोपीचा शोध घेत असताना दि.11/05/2026 रोजी सायंकाळी 7/30 वाजता गोपनिय बातमीदार कडुन माहीती मीळाली की, नामे विजय विठ्ठल राठोड वय 30 वर्ष रा.तुळशीनगर ता. महागाव याने पुसद शहरातुन पॅशन प्रो कंपनीची मोटर चोरुण आनुन तीची नंबर प्लेट काढुन टाकुण गाडी विक्री करीता गि-हाईक शोधत आहे असे माहीती मिळाली वरुण आम्ही आरोपी निष्पन्न करुन अतिशय कौशल्यपुर्वक सापळा रचुन आरोपी नामे विजय विठ्ठल राठोड वय 30 वर्ष रा. तुळशीनगर ता.महागाव जि. यवतमाळ यांस ताब्यात घेउन सखोल विचारपुस केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली देउन अनुप्रभा हॉटेल समोरुन चोरुन नेलेली पॅशन प्रो कंपनीची मो.सा.क्र. MH-29-AH-8307 किंमत 50,000 रुपयेची आरोपी कडुन जप्त करन्यात आला आहे. पुढील तपास डी. बी. पथक पुसद शहर करीत आहे.

# अतिक्रमण हटाव मोहीमेत दुहेरी मापदंड ? उपाध्यक्ष दत्ता कुलकर्णी यांचे कार्यालयावर बुलडोजर कधी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - गोरगरिबांच्या टपऱ्या हटवताना कुठलाही भेद भाव न करता हटविले जात आहे मग दत्ता कुलकर्णींचे कथित अतिक्रमित कार्यालय कधी हटवणार?" असा नागरिकांचा सवाल उपस्थित होत आहे. शहरात नगरपरिषदेच्या वतीने मोठ्या प्रमाणात अतिक्रमण हटाव मोहीम सुरू असून, रस्त्याच्या कडेला टपऱ्या लावून व्यवसाय करणाऱ्या अनेकांवर कारवाई करण्यात येत आहे. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि नागरिकांच्या तक्रारींमुळे ही मोहीम राबविली जात असल्याचे प्रशासनाकडून सांगितले जात आहे.



मात्र, या कारवाईत दुहेरी मापदंड वापरला जात असल्याचा आरोप आता नागरिकांकडून केला जात आहे. नगरपरिषदेचे उपाध्यक्ष तथा नगरसेवक दत्ता कुलकर्णी यांचे शिक्षक कर्मचारी पतसंस्थेजवळील कथित अतिक्रमित कार्यालय अजूनही कायम असल्याने नागरिकांनी प्रश्न उपस्थित केला आहे. "जर अतिक्रमण हटवायचे असेल, तर ते सर्वांचे समानपणे हटवावे. फक्त गोरगरिबांच्या टपऱ्या हटवून मोठ्या लोकांचे अतिक्रमण कायम ठेवणे योग्य नाही," अशी प्रतिक्रिया अनेक नागरिकांनी व्यक्त केली. शहरातील काही मोठ्या व्यापाऱ्यांनीही दुकानांसमोर अतिक्रमण केल्याचा आरोप होत असताना, त्यांच्यावर मात्र कारवाई होत नसल्याची चर्चा शहरात सुरू आहे. त्यामुळे नगरपरिषद आणि बाजार विभाग प्रभावशाली लोकांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप केला जात आहे. नागरिकांनी मागणी केली आहे की, जर संबंधित जागा अतिक्रमित असेल तर दत्ता कुलकर्णी यांनी ते कार्यालय हटवून अधिकृत जागेत स्थलांतर करावे. अन्यथा अतिक्रमण हटाव मोहिमेची विश्वासार्हता धोक्यात येत असल्याचे मत व्यक्त होत आहे.

### "स्वतःचे झाकायचे, दुसऱ्यांचे दाखवायचे ?" : सूरज खोब्रागडे

"शहरात सामान्य लोकांच्या टपऱ्या हटवल्या जात आहेत, पण राजकीय लोकांचे कथित अतिक्रमण कायम ठेवले जात आहे. नियम सर्वांसाठी सारखे असले पाहिजेत," अशी प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते सूरज खोब्रागडे यांनी दिली.

# पांढरकवडा येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' १५ मे रोजी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - प्रशासन लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांच्या वतीने 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर – टप्पा १' चे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये महसूल सेवा, विविध दाखले, जमिनीशी संबंधित प्रकरणे तसेच इतर शासकीय विभागांच्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

हे शिबिर शुक्रवार, दिनांक १५ मे २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत शहीद नागेश्वर जिजेवार न.प. भवन, पांढरकवडा येथे पार पडणार आहे. शिबिरामध्ये प्रलंबित फेरफार, ७/१२ मधील चुका दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरीचे ७/१२ व ८-अ उतारे, उत्पन्न, रहिवासी, जात व नॉन-क्रीमिलियर प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार आहे. तसेच अकृषिक (NA) प्रकरणांबाबत मार्गदर्शन, तुकडेबंदी उल्लंघन प्रकरणांचा निपटारा, गाव नकाशे अद्ययावत करणे यासह विविध जमीन अभिलेख विषयक सेवा दिल्या जाणार आहेत.

## • वेचक

### पुसद येथे दुसऱ्या सामुहिक ग्रामगीता पारायणाची यशस्वी सांगता



पुसद - मानवतेचे महान पुजारी, वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज लिखित 'ग्रामगीता' ग्रंथाचे ५१ सामुहिक पारायण करण्याचा संकल्प करण्यात आला असून दुसऱ्या सामुहिक ग्रामगीता पारायण संकल्पाची यशस्वी सांगता सोमवारी (दि ११) करण्यात आली. श्री गुरुदेव सेवा मंडळ, तालुका शाखा, पुसदच्या सामाजिक उपक्रमांतर्गत हभप विठ्ठल महाराज भोयर यांच्या पुढाकाराने ५१ सामुहिक ग्रामगीता पारायणाचा संकल्प करण्यात आला आहे. शहरालगतच्या अमरनगर (श्रीरामपूर) येथील हनुमान मंदिराच्या सभागृहात आयोजित ग्रामगीतेचे दुसरे सामुहिक पारायण सोमवारी (दि ११) उत्साहात संपन्न झाले. पहिले सामुहिक ग्रामगीता पारायण ग्रामजयंतीनिमित्त संपन्न झाले होते. दुसऱ्या सामुहिक ग्रामगीता पारायण सप्ताहात दररोज सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत हभप विठ्ठल महाराज भोयर, भारतीताई भोयर, आराध्या भोयर, प्रथम भोयर, श्रुती भारती, कार्तिक भारती, मनस्वी देशमुख, ओवी भोयर, देविका रोकडे, दिव्या चौधरी, आराध्य चौधरी, जीविका रोकडे आदींनी सक्रीय सहभाग घेतला. याप्रसंगी गुरुदेव सेवा मंडळाचे तालुकाध्यक्ष प्रा प्रकाश लामणे, उपाध्यक्ष प्रा नंदकुमार खैरे, प्रचार प्रमुख तथा गुरूदेवभूषण पुरस्कारप्राप्त राजेंद्र काळबांडे, कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर सुरडकर, पदाधिकारी नंदकुमार पंडित, शिवशंकर नागरे, नरेश ढाले, किसन गरडे, महिला प्रतिनिधी माया काळबांडे, भारती भोयर, गुरुदेव सेवा मंडळ, श्रीरामपूरचे प्रमुख गणेश धर्माळे, प्रा स्मिता धर्माळे आदी उपस्थित होते. यावेळी येत्या जून महिन्यात तिसरे सामुहिक ग्रामगीता पारायण आयोजित करण्यात येणार असून गुरुदेवप्रेमी भाविकांनी या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन हभप विठ्ठल महाराज भोयर यांनी केले. पसायदान व राष्ट्रवंदनेने पारायणाची सांगता करण्यात आली. याप्रसंगी परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शेतमाल खरेदी-विक्रीसाठी परवाना बंधनकारक

यवतमाळ : राज्यामध्ये शेतमाल खरेदी-विक्री व्यवहार करण्यासाठी व्यापारी, संस्था तसेच शेतकरी उत्पादक कंपन्यांनी वैध परवाना घेणे बंधनकारक असल्याचे पणन संचालनालयाने स्पष्ट केले आहे. याबाबतचे परिपत्रक पणन संचालक शरद जरे यांनी जारी केले आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व नियम १९६७ हा कायदा अस्तित्वात आहे. या कायद्यामधील तरतूदीनुसार राज्यातील शेतमाल खरेदी-विक्री चे विनियमन करण्यात येते. सद्या राज्यामधील विविध भागामध्ये अनेक व्यापारी, काही संस्था, शेतकरी संस्था या मोठ्या प्रमाणात शेतमालाची खरेदी विक्री कोणत्याही परवान्याविना करीत असल्याबाबतच्या तक्रारी पणन संचालनालयास प्राप्त झालेल्या आहेत.

# पुसद दुय्यम निबंधक श्रीमती तळेगावकर यांच्याविरुद्ध जिल्हाधिकारी कार्यालय येथे उपोषण सुरू



पुसद येथील दुय्यम निबंधक श्रेणी-1 खरेदी विक्री कार्यालयात गेल्या अनेक वर्षापासून इथे तीन कर्मचारी असून बाकी खरेदी/विक्री व इतर कामे करण्यासाठी खाजगी माणसे लावलेली आहेत त्यांच्या मार्फत मागिल काही प्रकरणात मयत असलेल्या व्यक्तीच्या नावावर दुसरे व्यक्ती उभे करून बोगस खरेदी करण्यात आलेल्या आहेत, याशिवाय उपविभागीय अधिकारी यांच्या तुकडा बंदी कायदे अंतर्गत आदेश नसतानाही खरेदी होत असून तसेच आदिवासीच्या सुद्धा बोगस खरेदी/विक्री झालेल्या आहे याकडे मात्र वरिष्ठ मूंग गिळून गप्प बसले आहेत अशी परिसरातील खरेदी/विक्री करण्यासाठी येत असलेल्या नागरिकाकडून सांगण्यात येत आहे.

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - येथील सह दुय्यम निबंधक श्रेणी-१ कार्यालयामध्ये श्रीमती विद्या तळेगावकर यांनी उपविभागीय अधिकारी यांच्या परवानगीविना भूखंडाच्या खरेदी-विक्री परस्पर केल्याबाबत पुसद येथील काही सामाजिक कार्यकर्ते यांनी तक्रार केली आहे. त्यानुसार उपविभागीय अधिकारी पुसद यांनी 02/02/2026 रोजी तक्रारदार यांना बोलावून सुनावणी घेण्यात आली होती, तसेच सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यवतमाळ बाळासाहेब घोंगडे यांनी दि. 24/02/2026 रोजी तक्रारकर्ते यांना पत्र देऊन सुनावणी घेण्यात आली आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारकर्ते यांनी दोन्ही खरेदीच्या प्रती पुरावे म्हणून दस्त सह जिल्हा निबंधक यवतमाळ यांना लेखी म्हणणे सोबत सादर केले, यानंतर उपविभागीय अधिकारी पुसद यांनी सह जिल्हानिबंधक घोंगडे यांना पत्राद्वारे कारवाई करण्यासंदर्भात सुचवले असतांना सुद्धा अद्याप पर्यंत तळेगावकर यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसल्यामुळे तक्रारकर्ते यांनी दि. 12/05/2026 रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाचे उपोषणास बसण्याचे पत्र दिले होते. त्यानुसार तक्रारकर्ते यांनी आज दि.12/05/2026 पासून जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ येथे सकाळी 11 वाजता पासून बेमुदत उपोषणास सुरुवात केली आहे, त्यामुळे सदर प्रकरणात जिल्हाधिकारी यवतमाळ हे उपोषणाबाबत तसेच तक्रारीबाबत कोणत्या प्रकारे कारवाई करतात याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# १०८ मंडळांत अतिवृष्टी, तरीही सोयाबीन विमा नाकारला, शिवसेना आक्रमक

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे सोयाबीन, कापूस व तूर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊनही पीक विमा कंपनीने एकाही महसूल मंडळाला सोयाबीन विम्यास पात्र ठरवले नसल्याने शिवसेना (शिंदे) आक्रमक झाली आहे. जिल्हा संपर्कप्रमुख हरिहर लिंगनवार यांच्या नेतृत्वात पंतप्रधान व केंद्रीय कृषिमंत्र्यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन सादर करण्यात आले.

यंदा जिल्ह्यात सरासरीपेक्षा ३० ते ४० टक्के अधिक पाऊस झाला. तब्बल १०८ महसूल मंडळांत अतिवृष्टीची नोंद झाली असून सुमारे २.०९ लाख हेक्टर सोयाबीन क्षेत्र बाधित झाल्याचा दावा करण्यात आला आहे. अनेक भागांत उत्पादन पूर्णपणे हातचे गेले असतानाही विमा नाकारण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे. शिवसेनेने सॅटेलाईट आधारित पीक मूल्यांकन पद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. अतिवृष्टीमुळे शेतात तण वाढल्याने सॅटेलाईट प्रतिमांमध्ये शेत हिरवेगार दिसले, मात्र प्रत्यक्षात सोयाबीनला शेंगा लागल्या नव्हत्या व कापसाची बोंडे कुजल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. प्रत्यक्ष शेत पाहणी करून पुनर्मूल्यांकन करावे, अशी मागणी करण्यात आली. दरम्यान, जिल्ह्याचे पालकमंत्री तथा मृद व जलसंधारण मंत्री ना. संजय राठोड यांनीही मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांना पत्र पाठवत यवतमाळ जिल्ह्याला तातडीने पीक विमा लाभ देण्याची मागणी केली आहे. "केवळ तंत्रज्ञान आधारित मूल्यांकनावर विसंबून न राहता प्रत्यक्ष पीक कापणी प्रयोगाच्या आधारे नुकसान निश्चित करावे. शेतकऱ्यांवरील अन्याय दूर करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी सर्वपक्षीय बैठक घ्यावी," अशी मागणी त्यांनी केली आहे.

### बोरगाव धरणातून ०.२५ द.ल.घ.मी. पाणी सोडण्यास मंजुरी

यवतमाळ जिल्ह्यातील बाभुळगाव तालुक्यात वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला असून बोरगाव धरण प्रकल्पातून तालुक्यातील नाग नदी पात्रात पाणी सोडण्याचे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जारी करण्यात आले आहेत. माजी मध्यवर्ती बँक अध्यक्ष अमन भाऊ गावंडे यांनी तालुक्यातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या समस्येबाबत तसेच उन्हाळ्यात जनावरांना पाण्याची व्यवस्था व्हावी यासाठी पालकमंत्री Sanjay Rathod यांच्याकडे मागणी केली होती. या मागणीची तत्काळ दखल घेत पालकमंत्र्यांनी संबंधित विभागाला आवश्यक सूचना देत पाणी सोडण्याचे निर्देश दिले. जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ (पाणी टंचाई विभाग) यांनी जारी केलेल्या आदेशानुसार बोरगाव धरण प्रकल्पातून ०.२५ द.ल.घ.मी. पाणी नाग नदी पात्रात सोडण्यात येणार आहे. यापूर्वी धरणात ०.५५ द.ल.घ.मी. पाणी आरक्षित करण्यात आले होते.

# "पांढरकवडा-केळापूरसाठी १०० कोटींचा आदिवासी औद्योगिक क्लस्टर द्या !"

## उद्योगाशिवाय पर्याय नाही ; युवकांचे स्थलांतर थांबवा, युवा टायगर फोर्सची आक्रमक मागणी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा-केळापूर हा संपूर्ण आदिवासी बहुल व भौगोलिकदृष्ट्या मागासलेला पट्टा असून, या परिसरात आजपर्यंत एकही मोठा उद्योग उभारला गेलेला नाही. शेती हाच एकमेव पर्याय असल्यामुळे हजारो आदिवासी युवकांना रोजगारासाठी बाहेर स्थलांतर करावे लागत आहे. या गंभीर परिस्थितीमुळे स्थानिक पातळीवर तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर "युवा टायगर फोर्स"ने पांढरकवडा येथे तात्काळ १०० कोटींचा आदिवासी औद्योगिक क्लस्टर उभारण्याची जोरदार मागणी केली आहे. या क्लस्टरमुळे स्थानिक पातळीवर वनधन प्रक्रिया, फूड प्रोसेसिंग, बांबू उद्योग, लघुउद्योग यांना चालना मिळून किमान ५०० पेक्षा अधिक युवकांना थेट रोजगार उपलब्ध होऊ शकतो, असा दावा संघटनेने केला आहे. दरम्यान, २२ मार्च २०२६ रोजी जंगोदाई पेनठाणा येथे आदिवासी समाजाच्या वतीने " आदिवासी उद्योग जत्रा" आयोजित करण्यात आली होती. या जत्रेतूनही एकच ठाम संदेश समोर आला. "या भागाला उद्योग अत्यावश्यक आहेत". मात्र, प्रत्यक्षात अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही दिसून आलेली नाही. विशेष म्हणजे, याच यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव मतदारसंघाचे आमदार व राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके हे स्वतः आदिवासी समाजातून असून, या भागातील वास्तव परिस्थितीची त्यांना पूर्ण जाणीव आहे. त्यामुळे त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन पांढरकवडा येथे आदिवासी औद्योगिक क्लस्टर जाहीर करावे, अशी ठाम मागणी होत आहे. "शासनाच्या योजना कागदावरच मर्यादित राहू नयेत. पांढरकवडा-केळापूरसारख्या आदिवासी पट्ट्यात उद्योग उभारले गेले नाहीत, तर येणाऱ्या काळात बेरोजगारी व स्थलांतराची समस्या अधिकच गंभीर होईल," असा इशारा युवा टायगर फोर्सचे संयोजक अंकित नैताम यांनी दिला आहे. युवा टायगर फोर्सने जिल्हाधिकारी व राज्य शासनाकडे निवेदन सादर करून तात्काळ निर्णय घेण्याची मागणी केली असून, लवकरच सकारात्मक निर्णय न झाल्यास तीव्र लोकआंदोलन उभारण्याचा इशाराही देण्यात आला आहे.



### गजानन वानखडे यांना मातृशोक

यवतमाळ - येथील लोककलावंत शाहीर गजानन वानखेडे यांच्या मातोश्री श्रीमती इंदुबाई पांडुरंग वानखडे यांचं 12 मे 2026 रोजी दुपारी चार वाजता दीर्घ आजाराने निधन झालं आहे. मृत्यू समयी त्या 80 वर्षाच्या होत्या. त्यांना दोन मुले तीन मुली, नातवंडे आणि बराच मोठा आप्त परिवार आहे. अंत्यविधी दि 13 मे रोजी सकाळी 11 वाजता होईल. अंत्ययात्रा त्यांच्या नेताजी नगरातील घरून निघेल.

# शंभर रुपये वाढ म्हणजे ऊस उत्पादक शेतकऱ्यांची थट्टा : गोविंदराव देशमुख सवनेकर

**जनमाध्यम प्रतिनिधी**

महागाव - काल परवा केंद्र सरकारने जाहीर केलेली ऊसाची वाढीव एफ आर पी शंभर रूपये म्हणजे एक प्रकारे ऊस उत्पादक शेतकऱ्यांची थट्टाच केली आहे यावर्षी शेतीला लागणारे साहीत्याचे दर बघीतले तर रा खत, मजुरी, इंधन, औजारे, औषधी यांचे दर दुपटीने वाढलेले आसतांना ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्या ऐवजी शंभर रुपये प्रति टन वाढ करुन चेष्टा केली आहे.

इथेनॉल चे दर साखरेच्या दरावर नियंत्रण यांनीच ठेवायचे आणि ऊसाचे दर सुध्दा यांनीच ठरवायचे यात ऊस उत्पादक शेतकर्याच्या हीताचा किवां कष्टाचा विचार न करता दर जाहीर करायचा आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी निमुटपणे स्वीकारायचा १०.२५ रीकव्हरीचा जो मुद्दा आहे



तो खरोखरच किती कारखानदार प्रामाणिकपणे रीकव्हरी दाखवीतात हा विषय सुध्दा महत्त्वाचा आहे.

एकदंरीत हा प्रकार ऊस उत्पादक शेतकऱ्यांची एक प्रकारे पिळवणूक करणाराच आहे आणि याचे ऊस लागवडीवर होणारे दुष्परिणाम पुढील काळात दिसतीलच ऊस दराची शिफारस करणारे समीती सदस्य हे कोणाचे प्रतीनीधी आणि कुठल्या घटकांचा विचार करतात हे नावे बघीतल्यावरच लक्षात येते.

# बनावट स्वाक्षरीवर व्यवहार ?

## पांढरकवडा नगर परिषदेत भ्रष्टाचाराचा स्फोट

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - नगर परिषद येथे लोखंडी हातगाडी खरेदी प्रकरणात बनावट स्वाक्षरीच्या आधारे आर्थिक व्यवहार झाल्याचा गंभीर आरोप समोर आल्याने प्रशासनात खळबळ उडाली आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते रजनीकांत बोरेले यांनी हा कथित भ्रष्टाचार उघड करत दोषींवर तातडीने गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे.

नगर परिषदेच्या स्वच्छता विभागासाठी लोखंडी हातगाड्यांच्या खरेदीदरम्यान मुख्याधिकारी पंकज गावंडे यांच्या बनावट स्वाक्षरीचा वापर करून प्रत्येकी १० हजार रुपयांच्या तीन हातगाड्यांची देयके काढण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रकरणी अभियंता कल्याणी सोळंके यांना जानेवारीमध्ये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. मात्र त्यांनी सर्व आरोप फेटाळून लावले. यानंतर मुख्याधिकारी गावंडे यांनी चौकशी समिती नेमली. स्थापत्य अभियंता शिवांगी राऊत यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या चौकशीत मुख्याधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीत प्रथमदर्शनी बनावटपणा आढळल्याचे समोर आले. तसेच कंत्राटदार विजय थोरात यांच्या सह्यांमध्येही तफावत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. गंभीर निष्कर्ष समोर येऊनही अद्याप एफआयआर दाखल न झाल्याने संताप व्यक्त होत आहे. संबंधित अधिकारी व कंत्राटदारांविरोधात तातडीने गुन्हे दाखल करून निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

# तायडे नगर पुन्हा रक्तरंजित ! अवैध धंद्यांच्या विळख्यात वाढली गुंडगिरी

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - शहरातील तायडे नगर परिसरात पुन्हा एकदा धारदार शस्त्राने झालेल्या हल्ल्यामुळे खळबळ उडाली असून, अवैध धंदे आणि वाढत्या गुंडगिरीमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात दाखल फिर्यादीनुसार, जुन्या वादातून चार जणांनी तिघांवर जीवघेणा हल्ला केल्याची घटना ११ मे रोजी रात्री उशिरा घडली.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी मुज्जमील खान इसराईल खान (वय २४) हे आपल्या वडील, काका आणि चुलत भावासोबत वेगवेगळ्या दुचाकींवरून घरी परतत होते. दर्गा मंदिराजवळील डांबरी रस्त्यावर आरोपींनी त्यांना अडवून धारदार शस्त्राने हल्ला केला. या हल्ल्यात रियाज खान यांच्या चेहऱ्यावर तर अफताब खान यांच्या पाठीवर गंभीर दुखापत झाली. तिघांनाही रक्तबंबाळ अवस्थेत उपचारासाठी हलविण्यात आले.

याप्रकरणी जफर हातम बेग, शेख नावेज शेख नाजीम, जिशान व अब्दुल या चौघांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम 118(2), 352, 351(2), 351(3) व 3(5) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास यवतमाळ शहर पोलीस करीत आहेत.

### "तायडे नगर अवैध धंद्यांचे सुरक्षित आश्रयस्थान ?"

गांजा, एमडी ड्रग्स, अवैध दारू आणि वाळू तस्करीवर नागरिकांचा संताप व्यक्त केला जात असून दरम्यान, या घटनेनंतर तायडे नगर परिसरातील वाढत्या अवैध धंद्यांवरून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध दारू विक्री, गांजा, एमडी ड्रग्ससारख्या अमली पदार्थांची खुलेआम विक्री होत असल्याची चर्चा स्थानिकांमध्ये सुरू आहे. तसेच वाळू तस्करीचे जाळेही येथे सक्रिय असल्याचा आरोप होत आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, काही तरुण सार्वजनिक ठिकाणी खुलेआम नशा करताना दिसतात. मात्र याकडे पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. चार्ली पोलीस गस्त केवळ नावालाच असून, कारवाई पेक्षा चिरीमिरीकडे अधिक लक्ष दिले जाते,असा संतप्त आरोप काही नागरिकांनी व्यक्त केला.

### "गुन्हेगारीवर नियंत्रण की फक्त कागदी दावे ?"

पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नागरिकांनी प्रश्न उपस्थित केले असून एकीकडे शहरात अवैध व्यवसायांवर नियंत्रण असल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात असताना, दुसरीकडे तायडे नगरसारख्या भागात वाढणारी गुंडगिरी आणि शस्त्रसज्ज टोळ्यांची दहशत गंभीर प्रश्न निर्माण करत आहे. वारंवार घडणाऱ्या हिंसक घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, परिसरात नियमित पोलीस गस्त, अमली पदार्थांविरोधात विशेष मोहीम आणि संशयित गुन्हेगारांवर कठोर कारवाईची मागणी जोर धरत आहे.

# स्टुडन्ट्स वेलफेअर इंग्लिश मीडियम स्कूल, दहागावच्या विद्यार्थ्यांनी मारली बाजी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - आज दि. ०८/०५/२०२६ रोजी नुकताच वर्ग १० वी चा निकाल जाहीर झाला असून मागील सतत १४ वर्षांपासून इ.१० वी च्या १००% निकालाची परंपरा स्टुडन्ट्स वेल्फेअर इंग्लिश मीडियम स्कूल दहागावच्या विद्यार्थ्यांनी कायम राखत या ही वर्षी परीक्षेत चकचकीत यश संपादन केले.माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत प्रणाली जयवंतराव चव्हाण हिने ९३.८०% गुण घेऊन शाळेतून प्रथम क्रमांक पटकावला.

त्याचबरोबर गौरव दिपक शिंदे याने ९२.८०% गुण घेऊन द्वितीय व प्रज्वल प्रदिप तळेगावकर याने ९२.६०% गुण प्राप्त करून तृतीय क्रमांक पटकावला तर स्वरा आशिष लासिनकर हिस ९१.८०% घेऊन चौथ्या क्रमांकावर आणि प्रांजली ज्योतिबा बरगे हिला ९०.२०% घेऊन



पाचव्या क्रमांक घेतला.शाळेतील ६ विद्यार्थ्यांनी ९०.००% पेक्षा जास्त गुण मिळविले.२२ विद्यार्थ्यांनी ८०.००% पेक्षा जास्त गुण मिळविले.असून उर्वरित विद्यार्थी उत्कृष्ट श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. सर्व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे शाळेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. विशेष बाब म्हणजे शाळेत ग्रामीण भागातील विद्यार्थी असून त्यांना कुठल्याही खाजगी शिकवणी वर्ग नसताना सुद्धा विद्यार्थ्यांनी अप्रतिम चकचकीत यश संपादन केले. शाळेच्या या महत्त्वाच्या विषयाची तालुक्यात चर्चा होत आहे.

# उद्यापासून विद्यापीठ व महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी जाणार संपावर




## विद्यापीठ अधिसभागृहात कर्मचारी संघाची व्दारसभा

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठासह राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयां तील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी 'महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती'ने आक्रमक पवित्रा घेतला आहे. येत्या १४ मे २०२६ पासून टप्प्याटप्प्याने राज्यव्यापी आंदोलन करण्याचा अधिकृत इशारा समितीने प्रशासनाला दिला आहे.याबाबत विद्यापीठा तील अधिसभागृहात व्दार सभा संपन्न झाली.संयुक्त कृती समितीचे समन्वयक तथा महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष अजय देशमुख यांनी यांनी सभेला संबोधित केले. यावेळी महासचिव नरेंद्र घाटोळ, विद्यापीठ ऑफिसर्स फोरमचे उपाध्यक्ष मंगेश वरखेडे, सचिव डॉ. विलास नांदुरकर व विभागीय कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर बारस्कर उपस्थित होते.

विद्यापीठ व महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांना न्यायोचित मागण्या अनेक वर्षापासून शासनस्तरवर प्रलंबित आहे. त्यामध्ये सातवा वेतन आयोगानुसार १०, २० व ३० वर्षानंतर देय असलेली सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना तात्काळ लागू करण्यात यावी. राज्य सार्वजनिक विद्यापीठांतील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगाची संपूर्ण अंमलब जावणी करण्यात यावी. सन २००५ पूर्वी जाहिरात प्रक्रिया पूर्ण होऊन सन २००५ नंतर नियुक्ती प्राप्त झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी. सेवानिवृत्त शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना देय असलेले रजा रोखीकरण सातव्या वेतन आयोगानुसार अंतिम वेतनाच्या आधारे अदा करण्यात यावे. शिक्षक पदभरतीप्रमाणेच अकृषी विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयांतील रिक्त शिक्षकेत्तर पदे भरण्यास तात्काळ मंजुरी देण्यात यावी. विद्यापीठातील शैक्षणिक विभागांतील प्रयोगशाळा सहायक व प्रयोगशाळा परिचर यांना रजा रोखीकरणाचे लाभ पूर्ववत सुरू करण्यात यावेत. सन १९८८-८९ पासून नव्याने सुरू झालेल्या महाविद्यालयांमध्ये सरळ सेवेने मुख्य लिपिक व वरिष्ठ लिपिक पदांवर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्ती प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यात यावीत. न्यायप्रविष्ट नसलेल्या महाविद्यालयीन प्रयोगशाळा सहाय्यकांची शासन निर्णय २२सप्टेंबर २०२५ नुसार सहावा व सातवा वेतन आयोग लागू करून ग्रेड पे रु. २४०० प्रमाणे वेतननिश्चिती करण्यात यावी. विद्यापीठातील नियमित शिक्षकेत्तर पदभरतीच्या अनुषंगाने सध्या असलेला मनुष्यबळाचा अभाव व सन २०१३ पासूनची भरती बंदी विचारात घेऊन पदोन्नतीचे प्रमाण ५०:५० ऐवजी ८०:२० करण्यात यावे व ८० टक्के पदे पदोन्नतीने भरण्यास मान्यता देण्यात यावी. थकीत डी.सी.पी.एस. वर्गणी कपात बंद करण्यात आलेली आहे. तसेच सन २०२३ पासून एन.पी.एस. योजना अस्तित्वात आल्याने बंद करण्यात आलेली डी.सी.पी.एस. वर्गणी कपात पूर्ववत सुरू करण्यात यावी आदी मागण्यांचा समावेश आहे.

महाराष्ट्र स्तरावर संयुक्त कृती समितीच्या निर्णयानुसार१४ मे २०२६ पासून टप्प्याटप्प्याने आंदोलन कार्यक्रम राबविण्यात येणार असून आंदोलनाच्या टप्प्यांमध्ये १४ ते १६ मे दरम्यान सर्व विद्यापीठ व महाविद्यालयांमध्ये काळ्या फिती लावून कामकाज करणे, १८ ते२० मे या कालावधीत धरणे व निषेध सभा व घोषणाबाजी करणे. दि. २५ मे २०२६ रोजी राज्यव्यापी एकदिवसीय लेखणी बंद आंदोलन, दि. २९ मे २०२६ रोजी विभागीय सहसंचालक कार्यालयासमोर एकदिवसीय धरणे आंदोलन, १ जून रोजी शासनाने निर्णय न घेतल्यास एक दिवसासाठी लाक्षणिक कामबंद, त्यानंतर दि. ८ जून पासून तरीही प्रश्न न निकाली निघाल्यास बेमुदत कामबंद आंदोलन करण्यात येईल.

गेल्या अनेक वर्षापासून शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उपरोक्त मूलभूत मागण्यांसाठी लढा देत आहेत. शासनासोबत वेळोवेळी निवेदने देऊन तसेच चर्चा करूनही ठोस निर्णय न झाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. सातत्याने पाठपुरावा करूनही शासनाने केवळ आश्वासने दिली आहेत. आता निर्णय झाल्याशिवाय कर्मचारी शांत बसणार नाहीत, अशी भूमिका समितीचे प्रमुख अजय देशमुख, डॉ. नितीन कोळी आणि शशिकांत रोडे यांनी मांडली आहे. संप वजा आंदोलनामुळे विद्यापीठांच्या शैक्षणिक आणि परीक्षा कामकाजावर मोठा परिणाम होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांना पाठवण्यात आल्या आहेत. त्यांनी ह्या मागण्यांची पूर्तता करून कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा, अशी अपेक्षा आहे. यावेळी विद्यापीठ व महाविद्यालयीन कर्मचारी संघाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जी एच रायसोनी विद्यापीठात

# जनरेटिव्ह एआयवर पाच दिवसीय ऑनलाइन एफडीपीचे आयोजन



**अमरावती/का.प्र.**

जी एच रायसोनी विद्यापीठ, अमरावती येथील इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागाने 'जनरेटिव्ह एआय इन हायर एज्युकेशन : अभ्यासक्रम डिझाइन, मूल्यमापन नवोन्मेष आणि शैक्षणिक प्रामाणिकता' या विषयावर नुकतेच पाच दिवसीय ऑनलाइन फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (एफडीपी) आयोजित केला.

कार्यक्रमाला देश-विदेशातील प्राध्यापक, संशोधक व उद्योग क्षेत्रातील व्यावसायिकांसह एकूण ५०० हून अधिक सहभागींची नोंदणी झाली होती. उद्घाटन सत्रात राष्ट्र संत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा.डॉ. सिद्धार्थ विनायक काणे यांनी मुख्य अतिथी म्हणून तर भारतीय विद्यापीठ संघटना (एआययू) च्या संयुक्त सचिव रंजना परिहार यांनी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती दर्शवली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विनायक एस. देशपांडे होते.पाच दिवसांच्या या कार्यक्रमात एआय-चालित शिक्षण प्रणाली, शिक्षणात व्हर्च्युअल रिॲलिटीचा वापर, एआय-सक्षम मूल्यमापन पद्धती, एआय युगातील शैक्षणिक प्रामाणिकता, अभ्यासक्रम पुनर्रचना आणि भविष्योन्मुख शैक्षणिक पद्धती या विविध विषयांवर नामवंत तज्ज्ञांनी सखोल मार्गदर्शन केले. प्रत्येक सत्रात व्यावहारिक प्रात्यक्षिके, एआय साधनांचे हाताळणी प्रशिक्षण, संवाद आणि क्विझ यांचा समावेश होता.

डॉ. प्रांतिक बॅनर्जी, डॉ. रिचा कपूर मेहरा, डॉ. पूरवा रंजन, डॉ. कोमल चोपडा, डॉ. तस्किन जायदी, डॉ. नेहा मुंजल,डॉ. नीरंजन चितरे, डॉ. उमा कंबोज, डॉ. नरेंद्र लोंढे आणि प्रा. डॉ. दीलीप कुमार एम.यांच्यासह अनेक मान्यवरांनी संसाधक म्हणून सहभाग घेतला. सहभागींनी कार्यक्रमातील सैद्धांतिक ज्ञान आणि व्यावहारिक प्रशिक्षणाच्या मिश्रणाची विशेष प्रशंसा केली. हा एफडीपी प्राध्यापकांना जनरेटिव्ह एआय साधनांचा शिक्षण प्रक्रियेत समावेश करताना शैक्षणिक प्रामाणिकता आणि नैतिकता यांचा विचार कसा राखावा याबाबत आवश्यक कौशल्ये आणि दृष्टीकोन प्रदान करणारा ठरला.

कार्यक्रम यशस्वी झाल्याबद्दल आयोजकांनी उच्च शिक्षण क्षेत्रात होत असलेल्या बदलांना सामोर जाण्यासाठी या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले. या एफडीपीचे समन्वयक डॉ. श्रीकांत चवाटे आणि डॉ. स्नेहील जायस्वाल होते. आयोजकांनी कुलगुरू डॉ. देशपांडे, कुलसचिव डॉ. जायस्वाल, विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता डॉ. अवाचट, अँकर डॉ. बोहरे, संसाधक, एआययू-एएडीसी आणि सर्व सहभागी यांचे मन:पूर्वक आभार व्यक्त केले.

## संक्षिप्त

### अंतरा कुऱ्हेकर शिष्यवृत्तीकरिता पात्र

**कुऱ्हा-** स्थानिक अशोक शिक्षण संस्था अशोक नगर द्वारा संचालित कुऱ्हा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय कुऱ्हा येथील विद्यार्थिनी कु. अंतरा कुऱ्हेकर ही राष्ट्रीय आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थी शिष्यवृत्ती (एन.एम.



एम.एस) करिता पात्र ठरलेली आहे.या यशाबद्दल तिचे विद्यालयाच्या मुख्याध्यापिका कु. आर्. जी.कुंमरे , जेष्ठ शिक्षिका अ. भी. चांबटकर मॅडम, मार्गदर्शक शिक्षिका एस. व्ही. चौधरी , प्रा. एच. एन. बोके सर, यांनी कु. अंतरा कुऱ्हेकर हिचा सत्कार करून पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या त्याचप्रमाणे ज्येष्ठ शिक्षक एस.एन.दवाळेर, एस. आर.इसळ , व्ही. आर. इंगोले , एन.डी.राठोड, के.एन.ढगे ,जे.पी. निमकर ,एस. ए. पारवे एस.एस.चव्हाण, एस.एस.इरपाते , एच.बी.जाधव, व्ही.जी. बेठेकर, प्रा.एस.पी.ढोले, प्रा एन.एस. घुणार,प्रा.एम एच वाळके प्रा.एस.आर.जीरापुरे ,प्रा.एस.पी.रवाळे ,प्रा. एम. एस. शिरभाते, पी. एम. राऊत, राजू गुल्हाने युनूस खान या सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद, प्राध्यापक वृंद यांनी शुभेच्छा दिल्या.

### कुऱ्हा हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालयाचा उत्कृष्ट निकाल

**कुऱ्हा-** स्थानिक अशोक शिक्षण संस्था अशोकनगर द्वारा संचलित कुऱ्हा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय कुऱ्हा विद्यालयाच्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखून विद्यालयाचा दहावीचा निकाल ६४. ७० टक्के लागला असून १३ विद्यार्थी उच्च श्रेणीत पास



झाले तर १५ विद्यार्थी प्रथम श्रेणी, ३१ विदयार्थी द्वितीय श्रेणी मध्ये पास झाले आहे. नेहा पुरुषोत्तम सोनवणे हिने ९३.२०% गुण घेऊन विद्यालयातून प्रथम येण्याचा बहुमान प्राप्त केलेला आहे तसेच श्रावणी विलासराव वानरे हिने ९२.८० टक्के गुण प्राप्त करून द्वितीय तर जानवी गणेश लिल्लर्वे हिने ९१.४० टक्के गुण प्राप्त करून तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे त्याचप्रमाणे वैष्णव विजय इखार ह्याने ८४.२० पूर्वा प्रमोद खेडकर ८४.०० टक्के संयुक्ता संदीप कावरे ८२.३०% वेदांत संजय सुने ८२., ०० टक्के प्रेरणा धर्मेंद्र कुरळकर हिला ८०.६० टक्के गुण प्राप्त करून घवघवीत यश प्राप्त केले आहे या यशाचे श्रेय आई-वडील व कुऱ्हा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व शिक्षक वृंद यांना देत आहे या यशाबद्दल अशोक शिक्षण संस्था मा.अध्यक्ष व संचालक मंडळ तसेच कुऱ्हा हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका तथा प्राचार्या या शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद,प्राध्यापक वृंद यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहे.

### वरिष्ठ ॲथलॅटिक स्पर्धा

**अमरावती -** जिल्हा ॲथलॅटिक संघटना व हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमानाने १६ व १७ मे रोजी हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या नवीन ॲथलॅटिक ट्रॅकवर जिल्हा वरिष्ठ ॲथलॅटिक स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेतून निवड झालेल्या जिल्हा संघ येणाऱ्या राज्यस्तरीय वरिष्ठ ॲथलॅटिक स्पर्धेमध्ये सहभागी होणार आहे.या स्पर्धेत १०० मी., २०० मी., ४०० मी., ८०० मी., १५०० मी., ५००० मी., १० कि.मी, ११० मी. अडथळा शर्यत, १०० मी. अडथळा शर्यत, ४०० मी अडथळा शयंत, ३ कि. मी स्टिंपल चेस, २० कि.मी. चालणे, लांबउडी, उंचउडी, तिहेरी उडी, पोल बॉल्ट, गोळाफेक, थाळीफेक, भालाफेक, हातोडा फेक व आदी क्रीडा प्रकार आहेत. या स्पर्धेत जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय मंडळे, शाळा, व इतर खेडांळुना सहभागी होता येणार आहे.

# आयुक्तांची आधार शहरी बेघर निवारा केंद्राला भेट

**अमरावती/का.प्र.**

मदर्स डेच्या निमित्ताने सामाजिक संवेदनशीलतेचा हृदयस्पर्शी अनुभव रविवारी आधार शहरी बेघर निवारा केंद्रात पाहायला मिळाला. अमरावती महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांनी सहपरिवार केंद्राला सदिच्छा भेट देत निवारावासी बांधवांशी आत्मीयतेने संवाद साधला.

आयुक्त वर्षा लड्डा यांनी केंद्रातील विविध विभागांची पाहणी करून तेथील सुविधा, स्वच्छता, शिस्त तसेच निवारावासींसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती घेतली. यावेळी त्यांनी आधार केंद्राच्या कार्यपद्धतीचे कौतुक करत समाजातील बेघर, निराधार व गरजू नागरिकांसाठी संस्था करत असलेले कार्य प्रेरणादायी असल्याचे सांगितले.भेटीदरम्यान आयुक्तांनी निवारावासी बांधवांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी, गरजा आणि दैनंदिन जीवनाविषयी माहिती जाणून घेतली. त्यांच्या आपुलकीच्या



## निवारावासींशी साधला जिव्हाळ्याचा संवाद

संवादामुळे केंद्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. अनेक निवारावासींनी आपल्या भावना व्यक्त करत आयुक्तांचे आभार मानले.

यावेळी सहाय्यक आयुक्त धनंजय शिंदे, भुषण पुसतकर, अभियंता राजेश आगरकर तसेच महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच आधार केंद्राचे संचालक राजीव बसवनाथे, व्यवस्थापिका ज्योती राठोड, काळजीवाहक रोहित घोंगडे, विलास थोरात, किशोर मरकाम आणि निवारावासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नांदगाव बाजार समिती सभापतिपदी डॉ. राजेंद्र पांडे अविरोध



**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती पदासाठी सोमवार, ११मे रोजी झालेल्या निवडणुकीत डॉ. राजेंद्र नानासाहेब पांडे यांची एकमताने अविरोध निवड करण्यात आली.

सभापती पदासाठी डॉ. राजेंद्र पांडे यांचा एकमेव उमेदवारी अर्ज होता. त्यामुळे डॉ. राजेंद्र पांडे सभापती पदासाठी अविरोध विजयी ठरले. बाजार समितीचे सभापती प्रभात ढेपे यांनी १० एप्रिल रोजी सभापती पदाचा राजीनामा दिल्याने सभापती पद रिक्त होते. त्यामुळे ही निवडणूक घेण्यात आली. निवडणूक प्रक्रिया अधिकारी तथा साहाय्यक निबंधक (सहकारी संस्था) सचिन पतंगे व साहाय्यक आशिष भांडे यांनी निवडणुकीचे कामकाज सांभाळले.यावेळी जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अभिजित ढेपे, बाजार समितीचे माजी सभापती विलास चोपडे, उपसभापती विलास सावदे, संचालक प्रभात ढेपे, प्रमोद ठाकरे, ज्ञानेश्वर हांडे, गजानन ढेरे, पंकज ठाकरे, धनंजय मेटकर, सोनाली लेंडे, अर्चना कणसे, अंकुश कोल्हे, गजानन सावदे, विजय अजबले, दीपक सवाई, ओमप्रकाश साबळे, जितेश जंगडा, विवेक वैष्णव, मोहम्मद जावेद यांचीही उपस्थिती होती.

### निवृत्त कर्मचाऱ्याला तीन महिन्यांचा कारावास

**अचलपूर/वार्ताहर**

धनादेश अनादरप्रकरणी एका निवृत्त कर्मचाऱ्याला तीन महिने साधा कारावास आणि सहा लाख रूपयांच्या दंडाची शिक्षा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्या.व्ही.बी. साळुंके यांनी ठोठावली आहे. योगेश किल्लेदार रा. छोटा बाजार परतवाडा, असे याचिकाकर्त्याचे तर नामदेव अवघड असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. योगेश किल्लेदार यांनी आपसातील संबंधामुळे नामदेव अवघड यांना ३ लाख रूपये उसनवार दिले होते. २०१६ मध्ये नोटबंदी असल्याने नामदेव अवघड यांनी रोख रक्कम न देता सदर रकमेचा स्टेट बँक ऑफ इंडियाचा धनादेश किल्लेदार यांना दिला. तो धनादेश २ जानेवारी २०१७ रोजी किल्लेदार यांनी बँकेत जमा केला; मात्र अवघड यांच्या खात्यात रक्कम नसल्याने सदर धनादेश वटविला गेला नाही. दरम्यान, सदर प्रकरण प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी साळुंके यांच्या न्यायालयात दाखल करण्यात आले. न्यायालयाने नामदेव अवघड यांना शिक्षापात्र गुन्ह्यासाठी दोषी ठरवून तीन महिने साधा कारावास व ६ लाख रुपये दंडाची शिक्षा ठोठावली.

# ज्ञानभारतम् राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला प्रारंभ

## जिल्हाधिका- यांचे नागरिकांना आवाहन

**अमरावती/का.प्र.**

भारताचा समृद्ध आणि मौल्यवान हस्तलिखित वारसा जतन करण्यासाठी केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने ज्ञानभारतम् या महत्त्वाकांक्षी मोहिम राबविण्यात येत आहे. या योजनेत देशभरातून एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या मोहिमेत जिल्ह्यातील नागरिकांनी सहभाग नोंदवा, असे आवाहन करण्यात आले आहे.

भारताला हस्तलिखितांचा मोठा वारसा लाभलेला आहे. ही हस्तलिखिते विविध ठिकाणी विखुरलेल्या स्वरूपात आहेत. हे सर्व ज्ञानभंडार एकत्र करून एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या अंतर्गत हस्तलिखितांचे सर्वेक्षण, दस्तऐवजी करण, संवर्धन, डिजिटायझेशन व प्रसार केला जाणार आहे. यात हस्तलिखितांचा 'राष्ट्रीय डिजिटल संग्रह' तयार करण्यात येणार आहे. या प्रक्रियेत हस्तलिखितांची मालकी ही मूळ संस्था, ग्रंथालय किंवा खासगी संग्राहक यांच्याकडेच राहणार आहे. मात्र, स्वखुशीने ही हस्तलिखिते शासनाकडे सुपूर्द करायची असल्यास शासन स्विकारणार आहे.

या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यात विविध सांस्कृतिक संस्था व विद्यापीठांच्या सहकार्याने ही मोहीम राबवली जात आहे. प्रकल्पासाठी राज्याची नोडल संस्था म्हणून पुराभिलेख संचालनालयाची नियुक्ती करण्यात आली आहे.सर्वेक्षणासाठी ग्यान भारतम् हे विशेष मोबाईल ॲप विकसित करण्यात आले आहे. त्याद्वारे हस्तलिखितांचे मूल्यांकन, पडताळणी व दस्तऐवजीकरण केले जाणार आहे. जिल्हा स्तरावर देखील जिल्हा नोडल अधिकारी आणि जिल्हास्तरीय समितीच्या माध्यमातून विविध मंदिरे, मठ, शैक्षणिक संस्था व खासगी संग्राहकांना या मोहिमेत जोडून घेतले जात आहे. या मोहिमेत विद्यार्थी, संशोधक, पारंपरिक पंडित, एनसीसी आणि एनएसएसच्या स्वयंसेवकांचा सक्रिय सहभाग राहणार आहे.

नागरिकांकडे अथवा संस्था, मंदिरे, ग्रंथालये किंवा खासगी संग्रहात जुनी हस्तलिखिते उपलब्ध असल्यास, त्याची माहिती ग्यान भारतम् या मोबाईल ॲपवर अपलोड करावीत. या अमूल्य ज्ञानवारशाचे जतन करण्याच्या कार्यात नागरिक, संस्था आणि संशोधकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# अमरावती बाजारात विविध आंब्याची आवक वाढली

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक बाजार समितीमध्ये देशभरातून विविध वाणांच्या आंब्याची आवक वाढती असल्याचे व्यापारी सूत्रांनी सांगितले. यामध्ये हापूस आंब्याची देखील ११७ क्विंटल इतकी आवक होत असून दहा हजार ते बारा हजार रुपये क्विंटल असा दर याला मिळत आहे.

उन्हाळी हंगामाच्या पार्श्वभूमीवर बाजारात आंब्याची आवक वाढली आहे. याला ग्राहकांचा देखील चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे सांगण्यात आले. यातूनच बाजारात आंब्याचे दरही तेजीत आले आहेत सध्या हापूस आंबा सर्वाधिक विकला जात असून याची आवक ११७ क्विंटल आहे. दहा हजार ते बारा हजार रुपयांनी याचे व्यवहार होत असल्याचे सांगण्यात आले. तोतापुरी आंब्याची आवक १२२ क्विंटल असून एक हजार पाचशे ते दोन हजार रुपयांचा दर याला मिळत आहे. दशेहरी आंब्याची आवक १३५ क्विंटल असून त्याचे दर चार हजार ते - पाच हजार रुपये क्विंटल याप्रमाणे होते. लालपट्टा आंब्याला तीन हजार ते चार हजार रुपयांचा दर मिळत असून १२० क्विंटलची आवक झाली.



कैरीची देखील नियमित आवक होत असून होते.

ती ८२ क्विंटल झाली. याचे दर २५०० ते ३००० रुपये होते.

स्थानिक चरकुलस आंब्याला तीन हजार ते चार हजार रुपये विवंटलचा दर मिळत असून याची आवक ११४ क्विंटल होती. कलिंगड आवक १४२ क्विंटल असून याचे दर ७०० ते १४०० रुपये याप्रमाणे होते.

खरबूज आवक नियमित असून ती ७४ क्विंटल वर पोहोचली आहे. ८०० ते १०००० रुपये याचा दर याला होता. बाजारात सोयाबीनची देखील नियमित आवक होत असून तर हमीभावाच्या पुढे गेले आहेत.

५३२८ रुपयाचा हमीभाव सोयाबीनला आहे. मात्र बाजारात सद्यःस्थितीत ६३५० ते ६८०० रुपये या दराने सोयाबीनचे व्यवहार होत आहेत. तुरीला ७५०० ते ८००० रुपयांचा दर मिळत असून याची आवाज ४६३४ इतकी आहे उडिदाची आवक एक क्विंटल तर ६५०० ते ७१०० रुपयाचादयौ लागत आहे. हरभऱ्याला ५२०० ते ५६०० रुपयांचा दर मिळत २४२८ क्विंटल आवक झाली.

बाजारात हंगामातील भुईमुगाची देखील आवक होत असून ती २२८ क्विंटल आहे. याचे दर ७००० ते ७६०० रुपये याप्रमाणे होते. गव्हाची आवक २४२१ क्विंटल असून याचे दर २२०० ते २५०० याप्रमाणे आहे.



# राष्ट्राची काटकसर आणि विरोधकांचे 'राज'कारण

**भा**रतीय राजकारणात सध्या एका नव्या वादाला तोंड फुटले आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला 'काटकसर' आणि विशेषतः 'इंधन बचती'चे आवाहन केले.एका राष्ट्रप्रमुखाने आपल्या नागरिकांना भविष्यातील आर्थिक संकटांची जाणीव करून देणे आणि बचतीचा मार्ग दाखवणे,हे प्रगल्भ नेतृत्वाचे लक्षण मानले जाते.मात्र,दुर्दैवाने भारतातील राजकारण इतके खालच्या थराला गेले आहे की, राष्ट्रहिताच्या आवाहनातही विरोधकांना उणिवा शोधायची सवय लागली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी पंतप्रधानांच्या परदेश दौऱ्यांवरून केलेली टीका आणि ते दौरे रद्द करण्याची मागणी, हे याचेच एक ताजे आणि आश्चर्यकारक उदाहरण आहे.

पंतप्रधानांचे आवाहन- पंतप्रधानांनी जेव्हा इंधन बचतीचे आवाहन केले, तेव्हा त्यामागे केवळ 'पैसा' हे एकमेव कारण नव्हते. भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा तेल आयातदार देश आहे. आपण आपल्या गरजेच्या ८० टक्क्यांहून अधिक कच्चे तेल परदेशातून आयात करतो. जागतिक भू-राजकीय स्थिती, रशिया-युक्रेन युद्ध किंवा मध्यपूर्वेतील तणाव यामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत होणारी वाढ थेट आपल्या परकीय चलन साठ्यावर घाला घालते.

जेव्हा एखादा सामान्य नागरिक दिवसाला अर्धा लिटर पेट्रोल वाचवतो, तेव्हा तो केवळ स्वतःचे ५०-६० रुपये वाचवत नसून, देशाच्या तिजोरीतील डॉलर वाचवत असतो. ही 'काटकसर' म्हणजे गरिबीचे लक्षण नसून ती 'आर्थिक राष्ट्रवादा'ची सुरुवात आहे. पंतप्रधानांचा उद्देश हाच आहे की, भारतीयांनी ऊर्जेच्या वापराबाबत शिस्त पाळावी जेणेकरून देश आत्मनिर्भरतेकडे वेगाने वाटचाल करेल.

**राज ठाकरेंची टीका**-राज ठाकरे यांनी आपल्या भाषणात मोदींच्या परदेश दौऱ्यांवर प्रहार केला. 'लोकांना काटकसर सांगता आणि स्वतः विमानाने फिरता,'हा त्यांचा युक्तिवाद अत्यंत उथळ आणि बालिश वाटतो. राजनैतिक दौरे आणि वैयक्तिक पर्यटन यातील फरक विरोधकांना समजत नसावा का?

**दौरे हे गुंतवणुकीचे साधनः**-पंतप्रधानांचा प्रत्येक परदेश दौरा हा भारतासाठी अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक घेऊन येतो. 'मेक इन इंडिया', 'डिजिटल इंडिया' यांसारख्या मोहिमांना जागतिक व्यासपीठ मिळवून देण्यासाठी हे दौरे अनिवार्य आहेत.

**सुरक्षा आणि रणनीतीः**- आशिया खंडात चीनचा वाढता प्रभाव रोखण्यासाठी आणि भारताचे स्थान बळकट करण्यासाठी शेजारील आणि विकसित देशांशी संवाद साधणे ही काळाची गरज आहे.

**दौरे रद्द करण्याची मागणी हा आत्मघातः**-राज ठाकरेंनी मागणी केली की मोदींनी आपले दौरे रद्द करावेत. जर भारताचा पंतप्रधान जागतिक परिषदांना उपस्थित राहिला नाही, तर जागतिक निर्णयांमध्ये भारताचा आवाज कोण मांडणार? भारताला जगापासून वेगळे पाडण्याचा हा विचार अत्यंत घातक आहे.

**विरोधासाठी विरोधः एक राजकीय फॅशन**

विरोधकांचा सर्वात मोठा आक्षेप हा पंतप्रधानांच्या विमानावर किंवा त्यांच्या दौऱ्यांच्या खर्चावर असतो. मात्र, याच विरोधकांनी आपल्या सत्ताकाळात किंवा आपल्या राज्यांमध्ये केलेल्या उधळपट्टीवर कधी भाष्य केले आहे का? अनेक राज्यांचे मुख्यमंत्री आपल्या वैयक्तिक प्रतिमेसाठी दरवर्षी जाहिरातींवर हजारो कोटी रुपये खर्च करतात. मोफत योजनांच्या (ड्रींगे) नावाखाली राज्यांच्या तिजोऱ्या निकामी केल्या जात आहेत. जेव्हा पंतप्रधान देशाच्या विकासासाठी अधिकृत दौरा करतात, तेव्हा तो खर्च वाटतो आणि जेव्हा राज्यांमध्ये मतांच्या राजकारणासाठी जनतेचा पैसा उधळला जातो, तेव्हा त्याला 'कल्याणकारी योजना' म्हटले जाते. हा दुटप्पीपणा आता जनतेच्या लक्षात येऊ लागला आहे.

**इंधन बचत**-पंतप्रधानांच्या आवाहनाचा दुसरा पैलू 'पर्यावरण' हा आहे. इंधन बचतीमुळे कार्बन उत्सर्जन कमी होते. भारत 'नेट झिरो' उत्सर्जनाचे ध्येय गाठण्यासाठी प्रयत्नशील आहे. सोलर एनर्जी, इलेक्ट्रिक वाहने आणि हायड्रोजन फ्युएल यांसारख्या पर्यायांकडे वळण्यापूर्वी उपलब्ध नैसर्गिक संसाधनांचा जपून वापर करणे, ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. विरोधकांनी या विषयावर पंतप्रधानांना साथ देण्याऐवजी त्यांच्यावर टीका करणे, हे त्यांचे पर्यावरणाविषयीचे अज्ञानच दर्शवते.

**काटकसर**-भारतीय संस्कृतीने नेहमीच 'तेन त्यक्तेन भुंजीथाः' हा संदेश दिला आहे. पंतप्रधान मोदींनी केवळ त्याच संस्कृतीची आठवण करून दिली आहे. राष्ट्रप्रमुख म्हणून त्यांनी स्वतः अनेकदा उपवास करून किंवा साधे राहून आदर्श घालून दिला आहे. जेव्हा देशाचा नेता जनतेला त्याग करायला सांगतो, तेव्हा तो देशाला एका मोठ्या ध्येयासाठी तयार करत असतो. जपानने दुसऱ्या महायुद्धानंतर केवळ काटकसरीच्या जोरावर पुन्हा उभारी घेतली. भारताला जर 'विकसित भारत २०४७' बनायचे असेल, तर ही शिस्त पाळावीच लागेल.

**धुराळा आणि वास्तवाचा प्रकाश**-राज ठाकरे किंवा इतर विरोधकांनी हे समजून घेतले पाहिजे की, प्रत्येक गोष्टीत राजकारण शोधणे हे देशाच्या प्रगतीसाठी मारक आहे. पंतप्रधानांचे परदेश दौरे हे देशाची 'सॉफ्ट पॉवर' वाढवणारे आहेत, तर त्यांचे काटकसरीचे आवाहन हे देशाचे 'आर्थिक संरक्षण' करणारे आहे.

विरोधकांनी आपले लक्ष विधायक कामांवर केंद्रित करावे. जर त्यांना खरोखरच जनतेची काळजी असेल, तर त्यांनी जनतेला या आवाहनात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करायला हवे होते. पण दुर्दैवाने, आपली 'राजकीय दुकानदारी' सुरू ठेवण्यासाठी राष्ट्रहिताच्या मुद्द्यांनाही बगल दिली जात आहे.

शेवटी,जनतेला हे स्पष्टपणे दिसत आहे की,कोणी देशाला जोडण्याचे काम करत आहे आणि कोणाची गाडी केवळ 'टीकेच्या' इंधनावर चालत आहे. पंतप्रधानांचे दौरे हे भारताच्या उज्ज्वल भविष्याचे उड्डाण आहे आणि काटकसरीचे आवाहन हा त्या प्रवासातील पाया आहे. या पायावर टीका करणे म्हणजे स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेण्यासारखेच आहे.देशाचा विकास हा केवळ सरकारी तिजोरीतून होत नसतो, तर तो प्रत्येक नागरिकाच्या बचतीतून आणि राष्ट्रप्रेमातून होत असतो. विरोधकांच्या ओरडण्याने वास्तवाचा सूर्य मावळत नाही.

**विरेंद्र सोनवणे**
मो.८८८८२४४८८३

# गर्व वारशाचा!

**मी आयुष्यभर कष्टात काढले म्हणून माझ्या मुलांना काही कमी पडता कामा नये या हेतूने पालक कष्टाने मिळवतात, यात काही चूक नाही. परंतु त्या पैशाची किंमत, कष्ट याची जाणीव करून देऊन मुलांनी खर्च करावयास शिकवायला हवे.**

**हॉ**स्पिटलमध्य ओपीडीत एक तरुण विद्यार्थी बसून बोलत होता, 'मी खूप व्यसनाधीन झालो, परिक्षेत खूपदा नापास झालो, इतरांच्यावर अरेरावी करीत आलो, याचे कारण मी तर आहेच परंतु माझे आई-वडील सुद्धा आहेत. त्यांनी मला हवे तेव्हा पैसे पुरवले, चुकांवर पांघरून घातले, परंतु या सर्व वागण्यात माझ्या शरीराचे नुकसान झाले आणि मानसिक स्थिती बिघडली त्यातून व्यसनाधीनता वाढत गेली, मला यातून बाहेर पडायचंय.' त्याचे बोलणे ऐकताना जाणवत होते. वयाच्या पंचविशीत त्याच्या बोलण्यात वडिलांच्या राजकीय व आर्थिक परिस्थितीचा गर्व होता. हवे तेवढे पैसे, हवी ती मुभा, गंभीर चुकांतून सोडवणे यामुळे वडीलांच्या जिवावर त्याचा अहंकार पोसला होता.

**गर्व पैशाचा**

लहानपणापासून मुलांना घडवताना आपण त्यांच्यात कोणत्या अवगुणांना भरवतो आहे याची जाणीव न ठेवल्यास अहं वाढत जाईल. आपण खूप श्रीमंत आहोत, कशाचीच कमी नाही, कोणतीच गोष्ट कमी पडता कामा नये. अशा वातावरणात पैशाचे मूल्य समजत नाही. मी आयुष्यभर कष्टात काढले म्हणून माझ्या मुलांना काही कमी पडता कामा नये या हेतूने पालक कष्टाने मिळवतात, यात काही चूक नाही. परंतु त्या पैशाची किंमत, कष्ट याची जाणीव करून देऊन मुलांनी खर्च करावयास शिकवायला हवे. नाहीतर वडीलांच्या पैशाचा गर्व करून निरर्थक उधळपट्टी करणे चुकीचे ठरते. ही पैशाची लालसा वाढत राहते. थोडे जरी पैसे मिळेनासे झाले तरी अस्वस्थता येते. त्यासाठी वाममार्गाने पैसे मिळवले जातात. अशा पैशातून आज शालेय तरुणाईला दारू, सिगारेट, मादक द्रव्ये यांचे व्यसन लागलेले दिसत आहे. या व्यसनी अवस्थेत ती अजून आक्रमक होतात, अहं वाढतो. अरेरावी केली जाते. गाड्या भरधाव चालवून निष्पाप लोकांचे प्राण घेतले जातात. तरीही शिक्षा न होता, पुन्हा पैशाच्या जोरावर, पालकच मुलांना सोडवून आणतात, कारण त्यांना त्यांच्या इज्जतीला वाचवायचे असते.



काहीच्या बाबतीत असे घडते की, राजकीय वारसा अभ्यासपूर्णरित्या, सामाजिक बांधिलकी घरून पुढच्या पिढीला न देता केवळ सत्ता व अर्थकारण शिकवले जाते. त्यातून वाढणारा अहंकार मुलांना दुबळे बनवतो. वडिलोपार्जित मुलांच्या गंभीर चुकांतून सुधारणा करण्याऐवजी केवळ अहं जोपासला जातो. काही मुले जेव्हा बोलतात की 'मला शिकायची, करिअरची काळजी करण्याची गरज नाही. कारण माझ्या वडिलांकडे खूप पैसा आहे.' तेव्हा या मुलांतील अहंभाव इतका टोकाचा असतो की, चुकून वाईट परिस्थिती घडली तर त्यातून स्वतःला सावरणे कठीण होते. पैशाचा माज पालकांनी केला तर ते मुलांना बिघडवते अन् वडिलांच्या पैशाचा माज मुलांनी केला तर ते निश्चित अधोगतीस जातात.

**धना गुंतले चित्त माझे**
**मुरारी।।**
**माझे हृदय हिंडवी**
**दारोदारी ।।**

धनात गुंतलेले मन दारोदारी हिंडवते तरी ते तृप्त होत नाही. सरपंचापासून खासदारांपर्यंत राजकीय वारसा सर्वांना टिकवता येतोच असे नाही कारण समाजात उतरून काम करण्याची तयारी नसते, आपसूक मिळालेली सत्तेची किंमत नसते, ती टिकविण्यासाठी बुद्धिचातुर्य, व्यवहारचातुर्य कमी असते. असे अहंकारी समाजाचे कल्याण काय करणार? काही बुद्धिमान पालकांची मुले बुद्धिमान जन्माला येतात,तेव्हा या बुद्धिमत्तेचा अहंकार होऊ शकतोच. माझ्या पिढ्यानपिढ्या शास्त्रज्ञ किंवा अधिकारी आहेत हा अहं सुद्धा हानिकारक आहे.बौद्धिकतेचा वारसा नम्रतेने घ्यायला हवा तरच त्याची वृद्धी व सन्मान होईल.

नजरेला दिसते आहे इतकी शेती आहे हे सांगताना, ती वडिलोपार्जित आहे आणि त्यात कष्ट केले तरच पिकते याची जाणीव ठेवली तर भरभराट होईल. नाहीतर शंभर एकर जमिनीचा मालक आहे या धुंदीत, कधी बांधावर न जाता मोठेपणा मिरवणारे यशस्वी होत नाहीत. पदावर असणाऱ्या काही व्यक्तीची मुले सर्व ठिकाणी सवलती मिळवण्याचा प्रयत्न करतात. त्यांची स्वतःची ज्ञानजिज्ञासा, कष्टाळू वृत्ती कमी होते. महागडे मोबाईल, कार, आलिशान राहण्याची सवय लागते. काहींचा जन्म राजेशाही घराण्यात होतो. राजाच्या आविर्भावात सतत राहण्यामुळे 'अहं' ची बाधा होते. कुळाचा गर्व माणसाला आंधळं करतो. वारशाचा सन्मान ठेवून पुढे चालायला हवे. संत कबीर म्हणतात,

**जाति न पूछो साधु की,**
**पूछ लीजिए ज्ञान।**
**मोल करो तलवार का,**
**पडा रहन दो म्यान।।**

माणसाची जात, घराणे न पाहता त्याचे ज्ञान, गुण पाहावेत. पूर्वजांकडून आलेल्या वारशाचा अभिमान असावा, गर्व नव्हे. स्वकर्तृत्वावर स्वतःची ओळख निर्माण करावी. मनुष्य जन्माने नव्हे, तर कर्माने महान होतो. वंशपरंपरेचा अभ्यास करून योग्य ते घ्यावे अयोग्य ते सोडावे, स्वतःच्या कर्मावर विश्वास ठेवावा.

**डॉ. वर्षा खोत**
मो.९४२३५६५८८६

# प्रेमस्वरूप आई....

**श्री**मती मालतीबाई मनोहर जोशी हिचा आज प्रथम स्मृतीदिन. असंख्य आठवणींचा ठेवा मागे ठेवून वैशाख कृष्ण प्रतिपदेला म्हणजेच १३ मे २०२५ ला आईने अल्पशा आजाराने जगाचा निरोप घेतला. प्रेम, वात्सल्य आणि अलोकिक कर्तृत्व यांचा त्रिवेणी संगम असलेली माऊली होती. तिला निवडक आठवणरूपी शब्दसुमनांनी आदरांजली अर्पण करण्याचा प्रयत्न....

आजोबा वारंवार कामानिमित्त बाहेरगावी असायचे.त्यामुळे आईचे संगोपन व पालनपोषण आजोळी मंगरूळपीर येथे कांत कुटुंबाने केले.वयाच्या १८ व्या वर्षी आईचा विवाह झाला व कुटुंबवत्सल जोशी घराण्यात तिने प्रवेश करून कुटुंबाचा भार समर्थपणे सांभाळला. त्याकाळी उच्च शिक्षणाची सोय केवळ अमरावती मध्येच असल्याने आमचे दोन मामा स्व. श्रीपाद व सुधाकर कांत तसेच इतरही आप्त स्वकीयांच्या उच्च शिक्षणाची व निवासाची सोय आईने घरी केली व त्यांच्या जीवनाचे सार्थक केले.आमची आजी (आईची आई) स्व. लक्ष्मीबाई उर्फ ताई महाराज या नामवंत कीर्तनकार म्हणून पश्चिम महाराष्ट्रात सुपरिचित होत्या. त्यांचा शिष्य परिवारही मोठा होता. ताई महाराज याच आईच्या गुरुस्थानी होत्या.आईला उपजतच कीर्तनाची आवड होती. आईची वक्तृत्वशैली उत्कृष्ठ तर होतीच पण तिचा आवाज सुमधुर व भारदस्त होता. त्यातच तिचा आध्यात्मिक व पौराणिक कथांचा दांडगा अभ्यास होता.ती आपल्या कीर्तनात अभंग, ओव्या, दिंड्या, साक्या, भारुड, जोगवा, गोंधळ, गवळण, संतांची वचने आणि समर्पक कांचा सहजपणे वापर करीत असे. तिचे कीर्तन ऐकतांना श्रोते तल्लीन होऊन जात असत.अल्पावधीतच ती उत्कृष्ट कीर्तनकार म्हणून नावारुपाला आली. तिचे कीर्तनाचे कार्यक्रम नेहमीच व्हायचे.



स्मृतीदिनानिमित्त

अनेक वर्षे तिने अमरावती येथील दहीसाथ राम मंदिरात रामजन्माचे कीर्तन केले. तर कुंभारवाडयातील हनुमान जन्मोत्सवात पहाटे हनुमान जन्माचे कीर्तन केले. वडिलांचाही आध्यात्मिक क्षेत्रात सखोल अभ्यास असल्याने ते आईला कीर्तनासाठी विविध आख्याने तयार करून देत असत. आईने हार्मोनियम (संवादिनी) पेटी वादनाचेही शिक्षण घेतले व पेटीवादनातही चांगले कौशल्य प्राप्त केले. अनेक वर्षे अंबादेवी मंदिरात पेटी वाजवून हरिपाठ सादर केला. अंबादेवी समोरच्या सभामंडपात ३ दिवसीय संगीतमय वटसावित्री कथेचे गायनही केले.कालांतराने वार्धक्यामुळे पुढे त्यात खंड पडला. वयाच्या ९३ व्या वर्षी तिने अमरावतीच्या प्रभात कॉलनी स्थित गजानन महाराज मंदिरात प्रकट दिन महोत्सवात 'रामायणातील त्रिजटा' या विषयावर एक तासाचे सुंदर प्रवचन केले होते. आई कुटुंबातील सर्व लग्न, मौंज, डोहाळेजेवण, केजवण नामकरण व इतर प्रासंगिक कार्यक्रमात आवर्जुन उपस्थित राहात व त्याप्रसंगी मंगलाष्टके, पाळणा व प्रासंगिक गाणी सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध करीत. वयाच्या ९४ व्या वर्षी एका समारंभात तीने म्हटलेले देव जरी मज भेटला हे सुरेल गाणे अजूनही आमच्या स्मरणात आहे.

आमच्या आईचा स्वभाव प्रेमला, मनमिळाऊ, करारी व तेव्हढाच कर्तव्यदक्ष होता. आईची स्मरणशक्ती विलक्षण दांडगी होती. काळाप्रमाणे नवीन बदल आत्मसात करून दुसऱ्याच्या सुख-दुखात सामील होण्याची तिची वृत्ती होतो. आई 'अतिथी देवो भव' या उक्तीप्रमाणे घरी येणाऱ्या सर्वाची आस्थेने विचारपूस करायची व त्यांचा यथोचित आदर सत्कार करायचो. आदर सत्कारात जाती-भेदाचा गंधही तिला कधी शिवला नाही. तिच्या आदरातिथ्याची आठवण म्हणजे तपोवन कुष्ठसेवा संस्थेचे संस्थापक पद्मश्री स्व. दाजीसाहेब पटवर्धन आमच्या अंबागेट येथील घरी आले असता आईने अत्यंत आपुलकीने त्यांचा आदर सत्कार केला. आईच्या आदरातिथ्याची दुसरी आठवण म्हणजे पुण्याच्या वडगाव शेरी येथील समर्थभक्त श्री काडगावकर उभयता अमरावतोला प्रथमच रामदास स्वामीच्या पादुका घेऊन आमच्या घरी आले असता आईने त्यांचे ३ दिवस उत्तम आदरातिथ्य केले व भाविकांसाठी समर्थ - पादुकांच्या दर्शनाची सोय एकविरा देवी मंदिरात करून दिली होती.

आधी प्रपंच करावा नेटका मग साधावा परमार्थ या समर्थाच्या ओवीप्रमाणे आईने आयुष्याच्या पूर्वार्धात कौटुंबिक जबाबदाऱ्या चोखपणे पार पाडल्या व आयुष्याच्या उत्तरार्धात कीर्तन, भजन, प्रवचनांद्वारे परमार्थही साधला. आईची वृत्ती समाधानी होती. आमची आई कुटुंबाच्या कल्याणासाठी चंदनाप्रमाणे झिजली व वयाच्या ९४ व्या वर्षी अनंतात विलीन झाली.स्व. आईला समस्त जोशी परिवाराकडून प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त श्रध्दाजंली अर्पण.

**श्रीराम मनोहर जोशी**
गणेश कॉलनी, अमरावती.
मोबाईल नं. ७८७५८१०६९५

# युनायटेड स्टेट ऑफ अमेरिकेच्या भूमीवरून

१)कोलंबस यांनी इ.स. १४९२ मध्ये अमेरिकेचा शोध लावला.

२)युरोपातील Spain, England आणि France या देशांनी मिळून अमेरिकेत एकूण तेरा वसाहती स्थापन केल्या.



३)अमेरिकेतील तेरा वसाहती या युरोपियन सत्तांच्या अधीन असल्यामुळे त्यांना कर द्यावा लागत असे.

४)अन्यायकारक करप्रणाली व नियंत्रणामुळे तेरा वसाहतींनी इंग्लंडविरुद्ध क्रांती केली.

५)४ जुलै १७७६ रोजी United States Declaration of Independence जाहीर करण्यात आली आणि युनायटेड स्टेट ऑफ अमेरिका स्वतंत्र राष्ट्र बनले.

६) जॉर्ज वॉशिंग्टन हे अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष झाले.

७)कोलंबस यांनी शोधलेला प्रदेश हा आशिया खंडाचा भाग आहे असे सुरुवातीला मानले गेले. परंतु अमेरिगो वास्कूपो यांनी हा स्वतंत्र खंड असल्याचे संशोधनातून स्पष्ट केले. त्यामुळे जर्मन नकाशाकार मार्टिन यांनी त्यांच्या अमेरिगो वास्कुपो यांच्या नावावरून अमेरिका हे नाव दिले.

८)अमेरिकेच्या राष्ट्रध्वजात आडव्या लाल व पांढऱ्या अशा तेरा पट्ट्या आहेत. त्या सुरुवातीच्या तेरा वसाहतींचे प्रतीक आहेत तर राष्ट्रध्वजाच्या वरच्या डाव्या भागात निळा चौकोन असून त्यामध्ये ५० पांढरे तारे आहेत. हे अमेरिकेतील सध्याच्या ५० राज्यांचे प्रतीक आहे.

९)राष्ट्रध्वजातील लाल रंग शौर्याचे, पांढरा रंग शुद्धतेचे आणि निळा रंग न्याय व निष्ठेचे प्रतीक मानले जाते.

१०)अमेरिकेचा पहिला अधिकृत राष्ट्रध्वज १४ जून १७७७ रोजी स्वीकारण्यात आला. त्यामुळे दरवर्षी १४ जून रोजी Flag Day साजरा केला जातो.

**अशोक कविटकर** वनाधिकारी
(निवृत्त). रा. अमरावती(म.रा.)
ह. मु.ऑस्टिन टेक्सास

# धर्मांतराचा नवा प्रकारःकार्पोरेट जिहाद

**कॉ**र्पोरेट क्षेत्रात धर्मांतराचा आणि छळाचा धक्कादायक प्रकार आला आहे ज्याला 'कार्पोरेट जिहाद' म्हटले जात आहे. अलीकडे नाशिकमधील एका बहुराष्ट्रीय कंपनीत (TCS) समोर आला आहे. या घटनेने कार्यस्थळावरील सुरक्षितता आणि कॉर्पोरेट संस्कृतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. एप्रिल २०२६ मध्ये उघडकीस आलेले कथित धर्मांतर आणि लैंगिक शोषणाचे प्रकरण अत्यंत गंभीर आणि नवीन पद्धतीचे मानले जात आहे. महिला कर्मचाऱ्यांना प्रेमाच्या जाळ्यात ओढून (फ्लर्टिंग), त्यानंतर लैंगिक शोषण करून आणि शेवटी धर्मांतरासाठी दबाव टाकण्याचे मोठे षड्यंत्र असल्याचा आरोप केला जात आहे.कंपनीतील तौसीफ अत्तार आणि दानिश शेख यांसारखे कर्मचारी आपल्या पदाचा गैरवापर करून हिंदू कर्मचाऱ्यांवर, विशेषतः तरुणींवर धर्मांतरासाठी मानसिक आणि शारीरिक दबाव टाकत होते.



या प्रकरणात निदा खान नावाच्या महिलेला अटक करण्यात आली असून, तिला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.पीडित तरुणींनी असा आरोप केला आहे की, धर्मांतरित होण्यासाठी त्यांच्यावर नमाज पढण्याची सक्ती केली जात होती.कर्मचाऱ्यांवर रोजा ठेवणे, बिफ खाणे, नमाज पठण करणे आणि हिंदू देवतांबद्दल आक्षेपार्ह बोलून धर्मांतर करण्यास भाग पाडल्याचा आरोप आहे. एवढेच नव्हे तर लैंगिक अत्याचार व शोषण झाल्याचे प्रकार देखील समोर आल्याने कलबल निर्माण झाली.महिला कर्मचाऱ्यांच्या असहायतेचा फायदा घेऊन गेल्या चार वर्षांपासून लैंगिक अत्याचार आणि मानसिक छळ केला जात होता.या प्रकारांमध्ये व्यवस्थापनाची निष्क्रियता आणि कॉर्पोरेट संस्कृतीतील गंभीर त्रुटी दिसून आल्या आहेत.

विशेष व्हॉट्सॲप ग्रुप्स तयार करून त्याद्वारे महिला कर्मचाऱ्यांना टार्गेट केले जात होते, असे समोर आले आहे.या प्रकरणाला मलेशिया कनेक्शन असल्याचा संशय असून, तरुणींना तिथे पाठवण्याचा डाव असल्याचा आरोप आहे.ही घटना केवळ एक वैयक्तिक गुन्हा नसून, मोठ्या कंपन्यांमध्ये कार्यस्थळी धार्मिक बाबींशी संबंधित वाद आणि कॉर्पोरेट कार्यसंस्कृतीच्या काळ्या बाजू चव्हाट्यावर आणणारी आहे.नाशिक आय टी कंपनीमधील घटनेनंतर आता इतर कंपन्यांमध्येही सुरक्षिततेचे प्रश्न निर्माण झाले आहेत.याप्रकरणी पोलीस तपास सुरू असून, आरोपी तौसिफ अत्तार याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा तपास सुरू असून, आर्थिक गैरव्यवहार आणि परदेशी बँक खात्यांशी संबंध असल्याचा संशय ED च्या तपासातून समोर येत आहे, ज्याला नुसार 'कॉर्पोरेट जिहाद' म्हणूनही संबोधले जात आहे.हे प्रकरण केवळ एका कंपनीपुरते मर्यादित नसून, कॉर्पोरेट क्षेत्रात शिरकाव करणारी ही एक संघटित जिहादी मानसिकता असल्याचा आरोप हिंदुत्ववादी संघटनांनी केला आहे.

**प्रा डॉ सुधीर अग्रवाल,** वर्धा
मो.९५६१५९४३०६

# बाजार फी लिलाव प्रक्रिया पूर्णत: कायदेशीर आणि पारदर्शक

■ प्रतिनिधी | अकोट ■

बाजार फी वसुलीच्या लिलाव प्रक्रियेत गैरप्रकार झाल्याचा आरोप करत दाखल करण्यात आलेल्या तक्रारीनंतर अखेर नगर परिषद प्रशासनाने अधिकृत खुलासा सादर केला आहे. मुख्याधिकारी शशिकांत बाबर यांनी नगर परिषदेच्या वतीने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात, सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी करण्यात आलेली बाजार फी वसुलीची लिलाव प्रक्रिया 'पूर्णतः कायदेशीर, पारदर्शक आणि नियमबद्ध' असल्याचा दावा करण्यात आला आहे.

## मुख्याधिकारी शशिकांत बाबर यांची माहिती




नगर परिषद प्रशासनाच्या म्हणण्यानुसार, तक्रारदार विशाल उर्फ गोलू गणेशराव भगत यांनी यावर्षी झालेल्या दोन्ही लिलाव प्रक्रियेत सहभाग घेतलेला नव्हता. एवढेच नव्हे, तर यापूर्वी नगर परिषदेच्या आठवडी बाजाराशी संबंधित कोणत्याही लिलावात त्यांनी भाग घेतल्याची नोंद उपलब्ध नसल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, लिलावाच्या दिवशी तक्रारदाराने संबंधित लिपिकाशी दूरध्वनीवर संपर्क साधून बाजार लिलावाबाबत माहिती विचारली होती. त्यावेळी त्यांना संपूर्ण माहिती देण्यात आल्याचा दावा खुलाशात करण्यात आला आहे. त्यामुळे प्रत्यक्ष लिलावात सहभागी होण्याची संधी उपलब्ध असूनही त्यांनी सहभाग घेतला नसल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.

दरम्यान, ही संपूर्ण प्रक्रिया नगराध्यक्षा, उपनगराध्यक्ष, सभापती तसेच नगरसेवकांच्या उपस्थितीत पार पडल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. लिलाव प्रक्रिया निष्पक्ष, भेदभावरहित आणि पारदर्शकपणे राबविण्यात आल्याचा पुनरुच्चार प्रशासनाने केला आहे.

विशेष म्हणजे, यंदाची स्वीकृत बोली रक्कम ही मागील वर्षाच्या तुलनेत तब्बल २३ टक्क्यांनी अधिक असल्याचा दावा खुलाशात करण्यात आला आहे. त्यामुळे नगर परिषदेचे आर्थिक नुकसान झाल्याचा आरोप तथ्यहीन असून, उलट नगर परिषदेच्या महसुलात वाढ झाल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.

तसेच जाहीर लिलावाची नोटीस विहित वेळेत नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आल्याचे नमूद करत, संपूर्ण प्रक्रिया नियमानुसार पार पडल्याचा दावा करण्यात आला आहे. सन २०२६-२७ मधील अंतिम बाजार फी वसुलीची बोली ही नगर परिषद अकोटच्या इतिहासातील सर्वोच्च बोली असल्याचाही उल्लेख खुलाशात करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर, बाजार फी लिलावावरून सुरू झालेला वाद आता अधिकच चिघळण्याची शक्यता व्यक्त होत असून, प्रशासनाच्या खुलाशानंतर तक्रारदार विशाल भगत यांच्याकडून पुढे काय भूमिका घेतली जाते, याकडे लक्ष लागले आहे.

# तामिळनाडू सरकारच्या हमीभाव धोरणासाठी शेतकरी नेते प्रकाश पोहरे यांना निमंत्रण

■ प्रतिनिधी | अकोला ■



शेतीमालाला हमीभाव (MSP) देण्यासाठी ठोस धोरण आखण्याच्या दृष्टीने तामिळनाडू सरकारकडून आयोजित करण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण बैठकीसाठी किसान ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा शेतकरी नेते प्रकाश पोहरे यांना विशेष निमंत्रण देण्यात आले आहे. येत्या १६ मे रोजी तामिळनाडूची राजधानी चेन्नई येथे ही बैठक पार पडणार असल्याची माहिती किसान ब्रिगेडचे प्रवक्ते धनंजय मिश्रा यांनी दिली.

तामिळनाडू शेतकरी संयुक्त कृती दलाचे अध्यक्ष डी. गुरुस्वामी यांनी पोहरे यांना निमंत्रित केले आहे. किसान ब्रिगेडने नुकतीच हमीभावासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्यामुळे देशभरात MSP चा मुद्दा पुन्हा चर्चेत आला असून, या पार्श्वभूमीवर पोहरे यांची उपस्थिती महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

'नदी जल व्यवस्थापन आणि कृषी विकासावर आंतरराज्यीय नेत्यांची बैठक' या विषयावर आयोजित चर्चासत्रात विविध राज्यांतील कृषी धोरणे, जलसंधारण, सिंचन व्यवस्था आणि शेतकरी कल्याणकारी योजनांचा तुलनात्मक अभ्यास केला जाणार आहे. तामिळनाडूतील शेती विकास, पाणलोट व्यवस्थापन आणि शेतीमालाला किफायतशीर भाव मिळवून देण्यासाठी एकात्मिक धोरण तयार करण्यावर बैठकीत भर राहणार आहे.

### १६ मे रोजी चेन्नईत आंतरराज्यीय कृषी व जलव्यवस्थापन बैठकीचे आयोजन

बैठकीत 'एकात्मिक नदी जल व्यवस्थापन योजना' या विषयावर कार्यपत्रिका तयार करण्यात येणार असून, सिंचन आणि पिण्याच्या पाण्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी व्यापक आराखडा तयार केला जाणार आहे. तसेच तेलंगणातील कालेश्वरम उपसा सिंचन प्रकल्प, आंध्र प्रदेशातील गोदावरी-कृष्णा नदी जोड प्रकल्प आणि त्या राज्यांतील कृषी विकासाच्या उपाययोजनांचाही संदर्भ चर्चेत घेतला जाणार आहे.

गेल्या काही दशकांतील कृषी क्षेत्रातील बदल, शेतकऱ्यांच्या वाढत्या समस्या आणि रास्त भावाच्या प्रश्नावर विविध राज्यांतील अनुभवांचा आढावा घेऊन नव्या तामिळनाडू सरकारसमोर ठोस प्रस्ताव मांडले जाणार आहेत. बैठकीत झालेल्या चर्चेचे दस्तऐवजीकरण करून ते राज्य सरकारकडे सादर करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली. या बैठकीत शेतकरी नेते प्रकाश पोहरे यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार असून, महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचा आवाज राष्ट्रीय स्तरावर पोहोचत असल्याचा अभिमान असल्याची भावना किसान ब्रिगेडचे प्रवक्ते धनंजय मिश्रा यांनी व्यक्त केली.

# जिल्ह्यात उष्णतेची लाट; हवामान विभागाचा इशारा

## नागरिकांनी दक्षता घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

**अकोला :** नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागातर्फे दि. १२ मे ते दि. १६ मे दरम्यान अकोला, तसेच विदर्भातील इतर जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट राहण्याची शक्यता आहे. त्यानुसार आवश्यक दक्षता घेण्याबाबत आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

नागरिकांनी दुपारी १२ ते ४ या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे, बाहेर तापमान अधिक असल्यास शारीरिक श्रमाची कामे टाळावीत, उन्हात वाहने शक्यतो चालवू नये, ज्वलनशील पदार्थापासून शक्यतो दूर राहावे, लहान मुले व पाळीव प्राण्यांना गेट बंद असलेल्या वाहनात तसेच पार्क केलेल्या वाहनात ठेवू नयेत, तहान लागलेली नसली तरी जास्तीत जास्त पाणी पिण्यात यावे.

अशक्तपणा, स्थूलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा, पशुधनास तसेच पाळीव प्राण्यांना छावणीत ठेवण्यात यावे. तसेच त्यांना पुरेसे पिण्याचे पाणी देण्यात यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# उघड्यावरचे रोहित्र ठरतेय 'मृत्यूचा सापळा'

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील शिरपूर गावात महावितरणाच्या निष्काळजीपणामुळे नागरिकांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाला आहे. सस्ती वीज उपकेंद्राअंतर्गत गावालगत उभारण्यात आलेले वीज रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) अत्यंत धोकादायक अवस्थेत असून, त्याभोवती कोणतेही संरक्षणात्मक कुंपण नसल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

विशेष म्हणजे, रोहित्राजवळील फ्यूज पेटी उघडी पडलेली असून विजेचा धक्का लागण्याचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे. गावातील लहान मुले, वयोवृद्ध नागरिक तसेच परिसरातील जनावरे यांच्यासाठी ही परिस्थिती अधिक चिंताजनक ठरत आहे. एखादी दुर्दैवी घटना घडण्यापूर्वीच महावितरण विभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, गेल्या अनेक वर्षांपासून या रोहित्राला संरक्षण कुंपण नसून

### महावितरणाचा निष्काळजीपणा ; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण



'गेल्या अनेक वर्षांपासून रोहित्राला संरक्षण कुंपण नसल्याने अनेक वेळा शॉक लागून जनावरे दगावल्याच्या घटना घडल्या आहेत. महावितरणाकडे वारंवार तक्रारी करूनही दखल घेतली जात नाही. भविष्यात जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रशासनाने तात्काळ लक्ष देण्याची गरज आहे.'

**तसावुर खान,**
सामाजिक कार्यकर्ता, शिरपूर

अनेकदा जनावरांना शॉक लागून मृत्यू झाल्याच्या घटनाही घडल्या आहेत. मात्र, वारंवार तक्रारी करूनही महावितरण विभागाने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. गावातील नागरिकांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की, भविष्यात एखादी जीवितहानी झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी महावितरण प्रशासनावर राहील. त्यामुळे तातडीने दुरुस्ती करून सुरक्षितता उपाययोजना राबविण्याची मागणी जोर धरत आहे.

# ईव्हीएम, वीज व गॅस दरवाढीच्या निषेधार्थ बहुजन मुक्ती पार्टीचे आंदोलन

## कंदील, चूल व दे धक्का स्टाईल ने आंदोलन

■ प्रतिनिधी | अकोला ■

देशात इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीन रद्द करून त्या जागी बॅलेट पेपरवर मतदान करावे, जनतेला स्मार्ट मीटर ऐवजी विद्युत दर कमी करावेत, तसेच नागरिकांना गॅस पेटोल उपलब्ध करून वाढलेले दर कमी करावेत या मागणीसाठी बहुजन मुक्ती पार्टी ने राष्ट्रीय स्तरावर आंदोलन सुरू केले असून त्याचा पहिला टप्पा मंगळवारी अकोला जिल्हा शाखेच्या वतीने साकार करण्यात आला.राष्ट्रात दिनांक १२ मे ते ३१ मे पर्यंत हे श्रृंखलाबद्द पद्धतीचे आंदोलन सुरू राहणार असून मंगळवारी भरमसाठ




वाढलेल्या विद्युत बिलाच्या संदर्भात कंदिल आंदोलन राबविण्यात आले.यात हातात कंदील घेऊन स्मार्ट मीटर व वाढलेले दर रद्द करण्याची मागणी करण्यात आली. दिनांक २० मे रोजी गॅस दरवाढीच्या विरोधात जिल्हाधिकारी कार्यालयावर चूल पेटवा आंदोलन होणार असून यात नागरिकांना वेळेवर गॅस उपलब्ध करून देण्यात यावा, गॅस दरवाढ रद्द करावी, घरगुती व व्यावसायिक गॅसचे दर कमी करावेत आदी मागण्या करण्यात येणार आहेत. दिनांक ३१ मे रोजी देशात भरमसाठ वाढलेले पेट्रोल ,डिझेलचे भाव कमी करण्यात यावे व मुबलक पेट्रोल व डिझेल उपलब्ध व्हावे यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर श्रृंखलाबद्ध दे धक्का आंदोलन राबविण्यात येणार असून यात बहुजन मुक्ती पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते तथा नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले.या आंदोलनात बहुजन मुक्ती पार्टी चे पश्चिम विदर्भ प्रभारी चंदन वानखडे,अकोला लोकसभा प्रभारी शाम अवचार,जिल्हाध्यक्ष विनोद शिरसाठ,युवक अध्यक्ष रवी सरदार, योगेश जायले,गजानन दोड, राहुल वानखडे, विश्वंभर खंडारे,सुरेखा दांदळे, गणेश शिरसाट, निरंजन सावळे,अपर्णा खांडेकर, सुभेदार रमेश हातोले, सतीश अवचार, सुभाष जंजाळ ,एस एस शिरसाट आदी उपस्थित होते.

# छत्रपतींचा चित्रपट बघून निराधार वृद्धांच्या चेहऱ्यावर फुलला आनंद!

**अकोला :** राज्याचे माजी मंत्री गुलाबराव गावंडे यांच्या मार्गदर्शनात गेल्या २६ वर्षापासून सुरू असलेल्या स्थानीय खडकी परिसरातील मातोश्री वृद्धाश्रमातील वृद्धजन व सूर्योदय बालगृहातील निराधार बालकांना मातोश्री परिवाराचे संचालक संग्राम गावंडे यांच्या संकल्पनेतून छत्रपती शिवाजी महाराजांच्या ज्वाजल्य देशप्रेमाने नटलेला स्वराज्याचा शौर्यपूर्ण इतिहास राजा शिवाजी चित्रपटाच्या माध्यमातून दाखविण्यात आला. मातोश्री परिवाराच्या वतीने मातोश्री वृद्धाश्रमातील वृद्धजन व सूर्योदय बालगृहातातील बालकांसाठी मिराज चित्रपट



गृहात विशेष शो चे आयोजन करण्यात आले होते.यात आबालवृद्धांनी सहभाग घेत छत्रपतींचा शौर्यपूर्ण इतिहास जाणून घेतला.आजच्या आधुनिक डिजिटल युगात वृद्ध व निराधार बच्चे कंपनीला बाहेर पडून आनंद घेता यावा, त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलावे यासाठी हा छत्रपतींचा चित्रपट त्यांना दाखविण्यात आला.संस्काराची शिदोरी केवळ मनोरंजन न होता नव्या पिढीला शिवरायांचा ज्वाजल्य देशप्रेमाचा इतिहास कळावा म्हणून मातोश्री परिवाराच्या वतीने असे उपक्रम राबविण्यात येत असल्याचे संग्राम गावंडे यांनी सांगितले.

# मारवाडी महिला सम्मेलनाचा पक्ष्यांना दानापाणी उपक्रम



**अकोला :** सामाजिक व मानवीय सेवेत कार्यरत असलेल्या अखिल भारतीय मारवाडी महिला सम्मेलनच्या स्थानिक शाखेच्या वतीने तीव्र उन्हाळ्यात पक्ष्यांसाठी दानापाणी मोहीम राबवली गेली. सम्मेलनाच्या पर्यावरण समितीच्या अंतर्गत व अध्यक्ष संध्या अग्रवाल व सचिव दीप्ती सिकरिया यांच्या पुढाकारात पार पडलेल्या या मोहिमेत पक्ष्यांसाठी विविध ठिकाणी कुंडे ठेवून पाण्याची व्यवस्था करण्यात आली. तसेच त्याच्यासाठी दाण्याचीही व्यवस्था करण्यात आली. या मोहिमेचा उद्देश तीव्र उन्हात पक्ष्यांना दिलासा मिळावा असा होता. तीव्र उन्हाळ्याचे प्रमाण पाहता या मोहिमेची अंमलबजावणी शहरातील अनेक ठिकाणी करण्याची इच्छा संध्या अग्रवाल व दीप्ती सिकरिया यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाला अकोला शाखेच्या अध्यक्ष संध्या अग्रवाल, सचिव दीप्ती सिकरिया, कोषाध्यक्ष हेमा खटोड, पर्यावरण प्रकल्प प्रमुख पूनम अग्रवाल यांच्यासह अनेक महिला सदस्यांनी हजेरी लावली.

**Change In Name**

I have change my name from **AKASH KIRAN KAMBALE** -TO- **AKASH KIRAN KAMBLE** MY DOB IS 11/05/1996 My Residential Address is MAHAKALI NAGAR BALAPUR ROAD OLD CITY AKOLA 444002

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- ४८/२०२६ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक -** आनंद गौरक्षण ट्रस्ट, निंबी मालोकार, ता. जि. अकोला

**अर्जदार : -** श्री. विजय श्रीकृष्ण मालोकार रा. मु.पो. निंबी मालोकार, ता. जि. अकोला

संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहायक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ / १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१ ) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २ ) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ? अ) जंगम मिळकत (वर्णन) : रोख रक्कम रु.३००/- श्री. विजय श्रीकृष्ण मालोकार यांचे ताब्यात आहे. आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- काही नाही.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला. १ यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक- ०८/०५/२०२६ रोजी दिली.

(शिक्का) **अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- ३५३/२०२६ कलम २२ ने. ता तारिख - ०८/०६/२०२६

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक:-** निमा भवन फाउंडेशन, अकोला. नोदणी क्रमांक. एफ - १९६९६

**अर्जदार :-** डॉ. दिनेश ईश्वरदास राठी, रा. गणेश नगर, डाबकी रोड, अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१ ) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) :- काहि नाहि

आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- मौजे डाबकी, प्र. ता. जि. अकोला र.स.डी.र.डी. अकोला, महानगरपालिका अकोला (पुर्वीची ग्राम पंचायत डाबकी)चे हददीतील शेत सर्व्हे नं. १२, गट नं.१३,१५,१६ चे १७ मधील १४ हे. ५४ आर. शेत मिनीचे एस.डी.ओ. अकोला यांचे फाईलवरील रे.के.नं. एनएपी - ३४ / डाबकी/ २४/१९९२/१९९३ आदेश पारित दिनांक १२.०४.१९९३ नुसार जाजु नगर या नावाने मुंजूर झालेल्या लेआउट प्लॉट नं. ११४ ज्यांचे मोजमाप- पुर्वेस :- १८.०० मीटर पश्चिमेस :- २२.०० मीटर उत्तरेस :- १८.०० मीटर दक्षिणेस :- २२.५ मीटर एकुण क्षेत्रफळ - ४७७.०० चौ.मी. ५१३३ चौ. फुट ज्याची चतु: सिमा खालीलप्रमाणे पुर्वेस :- रोड पश्चिमेस :- लेआउट प्लॉट नं. १३३ उत्तेरस :- लेआउट प्लॉट नं. ११५ दक्षिणेस :- लेआउट प्लॉट नं. १०६ अंदाजे किंमत – १,७८,०००/- अक्षरी - रुपये एक लाख अठयाहत्तर हजार रुपये.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला- यांचे शिक्कयानीशी आज दिनांक- ०७/०५/२०२६ रोजी दिली.

(शिक्का) **अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०५वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७९१/२०२६ प्रोसेस नं.६६२८/२०२६
चौ.ता. ३०/०६/२०२६ दिनांक : ०८/०५/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती राजकुमारी वसंतकुमार बाबेरवाल २. आशिष वसंतकुमार बाबेरवाल ३. मनिष वसंतकुमार बाबेरवाल सर्व रा. बाबेरवाल बिल्डिंग, खोलेश्वर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : वसंतकुमार देबुलाल बाबेरवाल
**पत्ता :-** रा. बाबेरवाल बिल्डिंग, खोलेश्वर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत वसंतकुमार देबुलाल बाबेरवाल यांचे दि. ०४/०२/२००६ रोजी बाबेरवाल बिल्डिंग, खोलेश्वर, अकोला. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्ज़दार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का) **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७३७/२०२६ प्रोसेस नं.६२३५/२०२६
चौ.ता. २२/०६/२०२६ दिनांक : ०४/०५/२०२६

**अर्जदार :** १. सुरेशकुमार टिकमदास कोटवानी २. श्याम टिकमदास कोटवानी ३. मनोज टिकमदास कोटवानी ४. गोपीचंद टिकमदास कोटवानी अर्जदार क्र. १ ते ४ रा. कोटवानी कलेक्शन जवळ, बाब हरदासराम नगर, सिंधी कॅम्प, कच्ची खोली, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : प्रितमदास पंजुमल कोटवानी
**पत्ता :-** रा. कोटवानी कलेक्शन जवळ, बाब हरदासराम नगर, सिंधी कॅम्प, कच्ची खोली, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रितमदास पंजुमल कोटवानी यांचे दि. २४/०४/२०२४ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २२/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०४/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का) **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**विद्यमान जिल्हा न्यायाधीश- २ तथा अति. सत्र न्यायाधीश, अकोला यांचे न्यायालय**

गैरअर्जदार/गैरअपिलार्थी यांनी अपीलमध्ये चौकशी तारीख रोजी हजर होण्यासाठीची जाहीर नोटीस

प्रोसेस नंः १६६५ /२०२६ तारीखः ०४/०५/२०२६
Civil M.A. No. 214/2026 Fix for: 09/06/2026

1) Satish S/o Nanhkau Sahu, 2) Sau. Nitu W/o. Satish Sahu, Both R/o Gadge Nagar, Hariharpeth, Old City Akola Tq. and Dist. Akola 3) Sachin S/o Nanhkau. Sahu, 4) Sau. Komal W/o. Sachin Sahu, Applicant No. 3 & 4 R/o Gadge Nagar, Hariharpeth, Old City Akola Tq. and Dist. Akola 5) Kashish (Father) - Sachin Sahu, (Mother) - Komal Sahu, R/o Hariharpeth, Old City Akola Tq. and Dist. Akola

**-- Vrs -- Nil**

**विरुध्द**

ज्याअर्थी या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी 'जिल्हा न्यायाधीश–२ तथा अति. सत्र न्यायाधीश, अकोला' या न्यायालयामध्ये 'AN APPLICATION UNDER SECTION 8 OF HINDU ADOPTIONS AND MAINTENANCE ACT, 1956 FOR GRANT OF PERMISSION FOR ADOPTION OF THE MINOR DAUGHTER NAMELY KASHISH D/O SACHIN SAHU AND SAU. KOMAL SACHIN SAHU.' दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. सदर प्रकरणामध्ये पुढील चौकशी तारीख ०९/०६/२०२६ ठेवलेली आहे.

त्याअर्थी आपणांस याव्दारे कळविण्यात येते की, जर आपण स्वतः किंवा आपले वकील अथवा आपल्या वतीने कायदेशीर बाजु मांडणारा व्यक्ती चौकशी तारखेला ०९/०६/२०२६ जिल्हा न्यायालयात सकाळी ११:०० वाजता हजर व्हावे, जर आपणापैकी कोणीही हजर झाले नाहीत तर सदर प्रकरणामध्ये आपल्या गैरहजेरीत कायदेशीर आदेश पारीत करण्यात येईल. आज दिनांक ०४ माहे मे सन २०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

अकोला.
दिनांक :- ०४/०५/२०२६ (शिक्का) **आदेशानुसार**
अधिक्षक
न्यायीक विभाग, जिल्हा न्यायालय, अकोला.

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७४०/२०२६ प्रोसेस नं.६४३२/२०२६
चौ.ता. २९/०६/२०२६ दिनांक : ०६/०५/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती रूक्मनीबाई टिकमदास कोटवानी २. सुरेशकुमार टिकमदास कोटवानी ३. श्याम टिकमदास कोटवानी ४. मनोज टिकमदास कोटवानी ५. गोपीचंद टिकमदास कोटवानी अर्जदार क १ ते ५ रा. कोटवानी कलेक्शन जवळ, बाबा हरदासराम नगर, सिंधी कॅम्प, कच्ची खोली, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. पद्माबाई पंजुमल कोटवानी २. टिकमदास पंजुमल कोटवानी
**पत्ता :-** रा. कोटवानी कलेक्शन जवळ, बाबा हरदासराम नगर, सिंधी कॅम्प, कच्ची खोली, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत पद्माबाई पंजुमल कोटवानी यांचे दि. १८/०८/२००० रोजी व मयत टिकमदास पंजुमल कोटवानी यांचे १८/०३/२००८ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २९/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०६/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का) **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १५८**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# उन्हाच्या तडाख्यात ट्रॅफिक पोलिसांना 'हायटेक कूलिंग जॅकेट'

## -अमरावती पोलिसांची स्मार्ट व्यवस्था

**अमरावती/प्रतिनिधी:-** विदर्भात उन्हाचा कहर दिवसेंदिवस वाढत असून तापमानाने ४५ अंशांचा टप्पा पार केला आहे. अशा भीषण उष्णतेत रस्त्यांवर उभे राहून वाहतूक नियंत्रण करणाऱ्या ट्रॅफिक पोलिसांसाठी अमरावती पोलीस आयुक्तालयाने आधुनिक तंत्रज्ञानाचा आधार घेत मोठी दिलासादायक सुविधा उपलब्ध करून दिली आहे. शहरातील वाहतूक शाखेला तब्बल १५० 'हायटेक कूलिंग जॅकेट' देण्यात आली असून, या विशेष जॅकेटमुळे उन्हातही पोलिसांना थंडावा अनुभवता येणार आहे.



शहरातील चौकांमध्ये तासन्तास ड्युटी करणाऱ्या वाहतूक कर्मचाऱ्यांना उष्माघात, डिहायड्रेशन आणि प्रचंड थकव्याचा सामना करावा लागत होता. याची गंभीर दखल घेत पोलीस आयुक्तालयाने ही आधुनिक जॅकेट खरेदी केली. त्यामुळे आता चौकात ड्युटी करणारे पोलीस विशेष पांढऱ्या रंगाच्या कूलिंग जॅकेटमध्ये दिसत आहेत. या जॅकेटमध्ये खास कूलिंग सिस्टम बसविण्यात आली आहे. मोबाईलप्रमाणे चार्ज करता येणाऱ्या बॅटरीवर ही यंत्रणा चालते. जॅकेटच्या आत बसविण्यात आलेले छोटे पंखे आणि कूलिंग युनिट सतत थंड हवा निर्माण करतात. त्यामुळे शरीराचे तापमान नियंत्रणात राहते आणि उष्णतेचा त्रास कमी होतो. विशेष म्हणजे, एकदा चार्ज केल्यानंतर हे जॅकेट अनेक तास कार्यरत राहते. त्यामुळे पूर्ण शिफ्टदरम्यान कर्मचाऱ्यांना आराम मिळतो. हलक्या वजनामुळे ड्युटी करताना कोणतीही अडचण येत नाही. या जॅकेटवर रिफ्लेक्टर स्ट्रिप्स लावण्यात आल्या आहेत. त्यामुळे रात्रीच्या वेळीही वाहतूक पोलिसांची स्पष्ट दृश्यता राहते. उष्णतेपासून संरक्षणासोबतच सुरक्षिततेचीही काळजी या माध्यमातून घेण्यात आली आहे. वाहतूक शाखेतील कर्मचाऱ्यांनी सांगितले की, पूर्वी कडक उन्हात ड्युटी करताना डोकेदुखी, चक्कर आणि थकवा जाणवत होता. मात्र कूलिंग जॅकेटमुळे आता अधिक उत्साहाने आणि आरामात काम करता येत आहे. नागरिकांकडूनही या उपक्रमाचे स्वागत होत आहे. पोलीस आयुक्तालयाने वाहतूक विभागासाठी १५० कूलिंग जॅकेट उपलब्ध करून दिली आहेत. शहरातील विविध झोनमध्ये त्यांचे वितरण करण्यात आले आहे.

# एसटी कर्मचाऱ्यांचा प्रामाणिकपणा
## महिलेचे २ लाखांचे दागिने व रोख रक्कम केली परत

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधी:-** अंजनगाव सुर्जी तालुक्यात एसटी महामंडळाचे कर्मचाऱ्यांच्या तक्रारी प्रवाशयानकडून होत असताना प्रामाणिकपणाचे उत्तम उदाहरण आज एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी दाखवून दिले. ड्युटी क्रमांक ११, परतवाडा आगाराच्या बसमधून प्रवास करणाऱ्या एका महिलेची अंदाजे २ लाख रुपये किमतीची सोन्याची पोत आणि रोख रक्कम बसमध्येच हरवली. मात्र, वाहक आणि चालकाने ती वस्तू तत्परतेने शोधून महिलेला सुखरूप परत केली.

दि. १० रोजी बस क्रमांक ११ अकोला-परतवाडा (बस क्र. एमएच ४०-८८२८)अकोट ते अंजनगाव मार्गावर धावत होती. प्रवासा दरम्यान दहीगाव रेचा येथील प्रवासी महिलेची सोन्याची पोत व रोख रक्कम असलेली पिशवी (चंची) बसमध्येच पडली व सदर महिला गडबडीत जुने बसस्थानक येथे उतरली. काही वेळानंतर महिलेच्या लक्षात ही बाब आली आणि ती घाबरून गेली मात्र तो पर्यंत बस परतवाडा जवळ पोहचली होती. महीलेने अंजनगाव आगाराचे कंट्रोलर सय्यद यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी तातडीने सुत्रे हलवत बसचे वाहक संदीप झाडे



आणि चालक गोपाल देशमुख यांना सदर वस्तू बाबत माहीती दिली. त्यांना सदर पिषवी बसमध्ये सापडली. कोणतीही मोह न ठेवता दोघांनी तातडीने अंजनगाव आगाराचे कंट्रोलर सय्यद यांच्याशी संपर्क साधला. सय्यद यांच्या समक्ष संपूर्ण तपासणी करून, वाहक संदीप झाडे आणि चालक गोपाल देशमुख यांनी ती सोन्याची पोत व रोख रक्कम संबंधित महिलेला सुखरूप सुपुर्त केली. अंदाजे २ लाख रुपये किमतीचा ऐवज परत मिळाल्याने महिलेच्या डोळ्यात आनंदाश्रु तरळले. त्यांनी एसटी कर्मचाऱ्यांचे मनापासून आभार मानले.एसटी महामंडळाच्या या कर्मचाऱ्यांनी दाखवलेली इमानदारी संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आहे. प्रवाशांच्या सेवेसोबतच त्यांच्या वस्तूंची जबाबदारी घेणाऱ्या या कर्मचाऱ्यांनी खऱ्या अर्थाने 'प्रवाशांच्या सेवेसाठी' चे ब्रीद वाक्य सार्थ केले आहे. अंजनगाव आगाराचे कंट्रोलर सय्यद यांनीही संदीप झाडे व गोपाल देशमुख यांच्या कर्तव्यदक्षतेचे आणि प्रामाणिकपणाचे विशेष कौतुक केले. एसटी महामंडळाच्या या इमानदार कर्मचाऱ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांच्या या कृतीमुळे एसटीवरचा प्रवाशांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.

# कामरगाव जवळ राख घेऊन जाणारा ट्रक पलटी

**अमरावती/प्रतिनिधी:-** अमरावती ते कारंजा लाड महामार्गावर सुरू असलेल्या रस्त्याच्या कामामुळे मंगळवारी मध्यरात्री राख घेऊन जाणारा ट्रक अचानक पलटी झाल्याची घटना समोर आली आहे. या अपघातात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही मात्र ट्रकचे मोठे नुकसान झाले आहे. या घटनेनंतर रस्ता कामातील नियोजनाचा अभाव आणि सुरक्षेच्या उपायोजनावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उत्पन्न झाला आहे.

माहितीनुसार काल मध्यरात्री १२.३० वाजता सुमारास अमरावती वरून राख घेऊन जाणारा ट्रक एमएच २७ डिटी २०८२ कामरगांवाजवळ रस्ता कामामुळे अचानक पलटी झाला. रात्रीच्या वेळी अंधार आणि योग्य सूचना फलक नसल्याने चालकाला खोदकामाचा अंदाज आला नाही. त्यामुळे वाहनावरील नियंत्रण सुटून ट्रक उलटला. या अपघातात चालक बचावला असून कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र ट्रकचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे.

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती,
अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

(नमुना क्र.०२)

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 68/2026

सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **मायभूमी विकास चॅरिटेबल ट्रस्ट, सावळी बु., ता.अचलपूर जि.अमरावती**

बाबत अर्जदार - **अंकुश विजयराव धाकडे**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत-

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**(अ) जंगम मिळकत (वर्णन) -** रु.७,०००/- मात्र (अक्षरी रुपये सात हजार मात्र फक्त)

**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - काही नाही**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **०८.०५.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

## जाहीर सुचना

आम जनतेस सदरचे सुचना पत्राद्वारे अग्रेसीत करण्यात येते की, माझे पक्षकाराने खालील वर्णनांकीत मालमत्ता विकत घेतली आहे तेव्हापासून सदर मिळकत ही माझे पक्षकाराचे मालकीत व ताब्यात आहे. तिचे वर्णन खालीलप्रमाणे-

**स्थावर मालमत्तेचे वर्णन -** नोंदणी पोट तुकडी चांदूर रेल्वे कचेरीचे कक्षेतील व जि.प.अमरावतीचे हद्दीतील ग्रामपंचायत असलेले मौजे आमला वि. प्रगणे-मांजरखेड व ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथील भूमापन क्र. व उपविभाग क्र.३३७/१, भो.वर्ग-१, मधील ४ हे.०१ आर, आकार रुपये ४.७४ पै. शेतजमीन असून यापैकी माझे मालकीची व ताब्यातील उत्तर-दक्षिण वाटणीची पश्चिमेकडील भागाची १ हे.६२ आर, आ.रु.१.९१ पै. शेतजमीन काळी कोरडवाहू झाडाझुडपासह व पूर्ण तदंगभूत वस्तूसह याची चतुःसिमा-

पुर्वेस - प्रमोद हेरोडे यांचे शेत
पश्चिमेस - अनंत बनसोड यांचे शेत
उत्तरेस - रस्ता
दक्षिणेस - रमेश बनसोड यांचे शेत

वरील वर्णनांकीत मालमत्ता ही माझ्या पक्षकाराच्या मालकी व ताब्यात असून सदर मालमत्तेबाबत कोणीही कोणताही व्यवहार उदा. खरेदी, बोजा, गहाण, ईसार इत्यादी केल्यास माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही व तसे काही असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांचे आत खालील नमुद पत्त्यावर लेखी दस्तऐवजासहीत संपर्क साधावा व त्यानंतर येणाऱ्या तक्रार वा उजर चालणार नाही. करीता सदरचे सुचनापत्र.

**अमरावती**
**दिनांक ११.०५.२०२६**

(ॲड.एस.पी.वर्धे)
१६ए भोवते लेआऊट, बेनोडा
अमरावती, ता.जि.अमरावती
मो.८२७५३०९२६७

---

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
विद्यमान श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.९१३/२०२६
**सुनिल व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०९.०७.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Sunil Pandurang Dhamale, Age 56 Yrs. Occu.: Business
2. Nirmala Pandurangji Dhamale, Age 75 Yrs. Occu.: HOusehold
3. Sanjay Pandurangji Dhamale, Age 54 Yrs. Occu.: Business
4. Sharad Pandurangji Dhamale, Age 48 Yrs. Occu.: Labour
No.1 to 4 R/o Railway Station Road, Near Laxmi Floor Mill, Hamalpura, Amravati
5. Sunita Rajendr Dhande, Age 45 Yrs. Occu.: Household
R/o Mahendra Colony, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत पांडुरंग बाजीराव धमाले** यांचे दिनांक **०७.१०.२०२५** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार सुनिल व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुनिल व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०२.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.३३९/२०२६ ने.ता. २०.०६.२०२६

**अर्जदार -**
१. श्री.हरिभाऊ पुंडलिक डहाणे, वय ७५ वर्षे, धंदा - मजुरी
२. श्री.चक्रधर पुंडलिक डहाणे, वय ५९ वर्षे, धंदा - मजुरी
दोघेही रा.अडगांव, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. शोभा रामकृष्ण कोंडे, वय ७८ वर्षे, धंदा - घरकाम
रा.डोमक, पो.आष्टोली, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार यांचे वडील **पुंडलिक केशवराव डहाणे** हे दि.**२८.०५.२०१७** रोजी **अडगांव**, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०८.०५.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

## जाहीर सुचना

आम जनतेस सदरचे सुचना पत्राद्वारे अग्रेसीत करण्यात येते की, आमचे पक्षकार खालील वर्णनांकित मालमत्तामध्ये कायदेशीर वारस आहेत.

गाव जेवड (९४३७०९), तालुका अमरावती, जि.अमरावती .... भूमापन क्र. व उपविभाग क्र. ४४/१/१४, खाते क्र.२०४९१७९, सामाईक क्षेत्र ०.७५.४०, आकार १७०, अॅरिया गणेश नगर, अमरावती या मालमत्तामध्ये आमचे पक्षकार कायदेशीर वारस आहेत.

वरील वर्णनांकीत मालमत्तामध्ये माझ्या पक्षकाराचा हिस्सा आहे. म्हणून सदर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार उदा. खरेदी, बोजा, गहाण, ईसार इत्यादी केल्यास आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही व तसे काही असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांचे आत खालील नमुद पत्त्यावर लेखी दस्तावेजसहीत संपर्क साधावा व त्यानंतर येणाऱ्या तक्रार वा उजर चालणार नाही . करीता सदरचे सुचनापत्र.

**अमरावती**
**दिनांक १२.०५.२०२६**

(ॲड.सैय्यद जावेद अली)
रतनगंज मस्जिद रोड,
गवळीपुरा, अमरावती
मो.९८३४१८७६८९

---

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
विद्यमान श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.८८३/२०२६
**विठ्ठलराव व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०६.०७.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Vitthalrao Bhaurao Deshmukh, Age 74 Yrs. Occu.: Farmer
R/o Maherbaba Colony, Chatri Talao Road, Amravati
2. Vaibhav Vitthalrao Deshmukh, Age 45 Yrs. Occu.: Lawyer
3. Amit Vitthalrao Deshmukh, Age 43 Yrs. Occu.: Service
Both R/o Indrapuri Layout Laxmi Narayan Nagar, Square Shankar Road, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत कमल विठ्ठलराव देशमुख** यांचे दिनांक **०१.०४.२०२६** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार विठ्ठलराव व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **विठ्ठलराव व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०२.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.३३८/२०२६ ने.ता. २३.०६.२०२६

**अर्जदार -**
१. श्री.प्रल्हादराव शंकरराव पारीसे, वय ७० वर्षे, धंदा - शेती
२. श्री.जंगलाजी शंकरराव पारीसे, वय ६८ वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा.पिंपळखुटा (मोठा), ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार यांचे वडील **शंकर झिंगुंजी पारीसे** हे दि.**२१.०६.१९९२** रोजी **पिंपळखुटा मोठा**, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०५.०५.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८८०/२०२६
**श्रीमती शोभा अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.१७.०६.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Smt.Shobha Vasantappa Ganthade, Age 65 Yrs. Occu.: Household
2. Parag Vasantappa Ganthade, Age 42 Yrs. Occu.: Business
3. Shital Vasantappa Ganthade, Age 45 Yrs. Occu.: Service
All R/o 205, Om Shri Apartment, Near Datta Mandir, Budhawara, Amt.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Roshan Vasantappa Ganthade हे दिनांक 30.11.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Smt.Shobha Vasantappa Ganthade + 2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Smt.Shobha Vasantappa Ganthade + 2 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०७.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर**
**अमरावती**

---

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
विद्यमान श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.११०७/२०२६
**सुशिला अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.१९.०६.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Sushila Shamrao Gharjare, Age about 78 Yrs. Occu.: Nil
2. Ruchika Shailendra Gharjare, Age 43 Yrs. Occu.:Household
3. Rudraksh Shailendra Gharjare, Age 19 Yrs. Occu.: Education
4. Ved Shailendra Gharjare (Minor)
Through its natural guardian i.e. Appli.No.2 Mother
Aged 08 Yrs. Occu.: Education
All R/o Behind Kiran Petrol Pump, Kiran Nagar No.2, Rukhmini Nagar, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Shailendra Shamrao Gharjare यांचे दिनांक **१७.०४.२०२६**रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार** Sushila Shamrao Gharjare + 3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Sushila Shamrao Gharjare + 3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**११.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सुचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे **पंजाब गेंदाजी राक्षसकर** यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाणे --

**मिळकतीचे वर्णन -** मौजे - भंडारज, मालमत्ता क्र.४३२, गांव क्र.१६६ वार्ड क्र.०४, प्लॉट क्र.२८४ पैकी ता. अंजनगांव सुर्जी जिल्हा अमरावती.

सदर मिळकत माझे पक्षकार नामे **पंजाब गेंदाजी राक्षसकर** यांना सदर मालमत्ता ही वारसाने वडिलोपार्जित मिळाली आहे. तसेच सदर मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किंवा वारस हक्क असल्यास इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्र.वर ही जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या **७** दिवसांच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही, आणि सदर मालमत्ता Piramal Finance Ltd. येथे कर्जासाठी केलेल्या अर्जानुसार गहाण करण्यात येईल. करीता ही जाहीर नोटीस देत आहे.

शिक्का

**आपला,**
**ॲडव्होकेट**
**रवींद्र रु.वाटाणे,**
**स्नेहगंधा कॉलनी, अमरावती**
**मो.नं.9823698745**

---

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
विद्यमान श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.९०५/२०२६
**मधुबाला अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.१९.०६.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
१. मधुबाला राजेश शर्मा, वय ५७ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
२. कुणाल राजेश शर्मा, वय ३० वर्षे, व्यवसाय - खाजगी नोकरी
दोन्ही रा.अर्जुन नगर, शिवाजी नगर, ता.जि. अमरावती
३. वैष्णवी विकी शर्मा, वय २८ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.मोदी रियालिटी विस्टेरिया, श्रीकृष्ण सीएचएस, केएसएम मार्ग स्कारकोप सेक्टर-३, कांदिवली वेस्ट मुंबई-४०००६७

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत राजेश नंदलाल शर्मा** यांचे दिनांक **२८.१२.२०२५** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार मधुबाला राजेश शर्मा अधिक दोन** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मधुबाला राजेश शर्मा अधिक दोन** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०५.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर**
**अमरावती**

---

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
विद्यमान श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.९८४/२०२६
**गीता -वि- निरंक**
पुढील ता.१४.०७.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Smt.Geeta Wd/o Ramvilas Laddha, Age 84 Yrs. Occu.: Household
2. Smt.Devyani Wd/o Sunil Laddha, Age 51 Yrs. Occu.:Household
3. Sau.Shagun W/o Pranav Goenka
(Name before marriage Shagun D/o Sunil Laddha)
Age 30 Yrs. Occu.: Business
4. Ayush S/o Sunil Laddha , Aged 26 Yrs. Occu.: Business
All R/o Infront of Dr.Barabde Hospital Camp Rd. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत सुनिल रामबिलास लढ्ढा** यांचे दिनांक **०४.०४.२०२६**रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार गीता व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **गीता व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०७.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २४४
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

## संक्षिप्त

### सनराईज इंग्लिश स्कुलमधील दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**तिवसा** - दहावी बोर्ड परीक्षेत सनराईज इंग्लिश स्कूलने दैदिप्यमान यश संपादित केले. शाळेने यावर्षी तब्बल १००% निकाल नोंदवत उत्कृष्टतेची गौरवशाली परंपरा कायम ठेवली आहे.यावर्षी शाळतील एकूण ४४ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते आणि सर्वच्या सर्व ४४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ३४ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य प्राप्त केले असून १६ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा अधिक गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.यंदाच्या निकालातील सर्वात गौरवास्पद बाब म्हणजे शाळेतील प्रथम व द्वितीय क्रमांकाचे विद्यार्थी हे तालुका स्तरावरील टॉपर ठरले आहेत.या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार शाळेत घेण्यात आला.शाळेच्या गुणवंत विद्यार्थ्यांनी स्नेहाश्री देवानंद ठवळी हिने ९७.८०% (तालुका टॉपर), स्वरित प्रशांत गौरखेडे याने ९७.२०% (तालुका द्वितीय टॉपर),आरुषी अतुल लोखंडे हिने ९७.००% तसेच स्वानंदी महेंद्र बोडखे ९६.८०%,प्राची सतीश वाटकर ९५.२०% या विद्यार्थ्यांनी आपल्या कठोर परिश्रम, जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर हे नेत्रदीपक यश संपादन केले आहे.या सर्व विद्यार्थ्यांचे सनराईज इंग्लिश स्कुलच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेचे संचालक, मुख्याध्यापक व शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करतांना सांगितले की, 'हे यश म्हणजे विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन आणि पालकांचे मोलाचे सहकार्य यांचे फलित आहे.

### कस्तुराबाई जैन विद्यालयाचा निकाल ९२.२२ टक्के



**शिराळा** - महाराष्ट्र शिक्षण समिती शिराळा व्दारा संचालित कस्तुराबाई जैन विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवत यावर्षी विद्यालयाचा दहावी चा निकाल ९२.२२ टक्के लागला आहे. एकुण ९० प्रविष्ट विद्यार्थ्यांपैकी ८३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून २८ विद्यार्थी प्राविण्य श्रेणीमध्ये व २८ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत.वेदिका संजय लोहबरे ९३.२० टक्के गुण मिळवून प्रथम तर सान्वी विनोद उके ९२. २० टक्के गुणांसह व्दितीय व ऋतुजा विनोद कडु ८९.२०टक्के गुण मिळवत तृतीय येण्याचा मान मिळविला आहे.सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष मनोजभाऊ देशमुख व मुख्याध्यापक डॉ एस .आर. देशमुख सर सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी शाळा व्यवस्थापन समिती माता पालक संघ च्या वतीने अभिनंदन कौतुक करण्यात आले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**खल्लार** - श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित असलेल्या खल्लार हायस्कूल खल्लार येथिल फेब्रुवारीमध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेमध्ये एकूण ४८ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते यापैकी ४५ विद्यार्थी उत्तीर्ण झालेत यात प्राविण्यश्रेणी १३ प्रथम श्रेणी २१ तर द्वितीय श्रेणीमध्ये ११विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शाळेचा निकाल ९३.७५ टक्के लागला आहे. शाळेमधून मधून प्रथम येण्याचा मान वैष्णवी बाबुराव गोरे ८८.६०, द्वितीय क्रमांक गुंजन लक्ष्मीनारायण भोंडे ८६.२० व तृतीय क्रमांक गुंजन प्रविण मोरे ८४.०० तसेचशाळेतील १३ प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार मुख्याध्यापक डी.आर.नवरे, शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन व शाळा समिती सदस्य मधुसुदन धाबे यांच्या हस्ते विद्यार्थी व पालक यांचा सत्कार करण्यात आला आहे.या गुणवंत विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, शाळा समिती व कार्यकारिणी सदस्य केशवरावजी गावंडे, शाळा तपासणी अधिकारी विनायकराव गावंडे यांनी या यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केल. या कार्यक्रमाला यू.डी.राणे, अनिल बगाडे,सय्यद, अमोल मोपारी, घुरडे,चौधरी,चव्हाण, मलिये, मेश्राम, पंचभाई, नंदू शिरसाठ व नितीन चऱ्हाटे उपस्थित होते.

गोल्डन किड्स इंग्लिश प्रायमरी स्कूलच्या मुख्याध्यापिका नम्रता खंडारे तसेच ज्येष्ठ शिक्षक पराग देशपांडे यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला वर्ग १० चे वर्ग शिक्षक रवींद्र तसरे, अश्लेषा किरकोळ, सीमा उईके, निशा गायकवाड व वर्षा देवपुजारी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे संचालन संजय मुचळंबे यांनी केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे लेडी यशोदाबाई जोशी क्लबच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी, शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# गोवंशाना निर्दयपणे कोंबून नेणारे दोन ट्रक पकडले

## एकूण ३१ जनावरांची सुटका; तिवसा पोलिसांच्या १० तासांत दोन कारवाया

**तिवसा/ वार्ताहर**

गोवंशाना निर्दयपणे वाहनात कोंबून नेणाऱ्या दोन ट्रकांना तिवसा पोलिसांनी पकडून त्यातील एकूण ३१ गोवंशाची सुटका केली.

विशेष म्हणजे १० तासांत या दोन कारवाया तिवसा पोलिसांनी केल्या आहे.दोन्ही कारवाईत सुमारे ५० लाखाचा मुद्देमाल जप्त केला आहे.

त्यातील पहिली कारवाई ही सोमवारी रात्री ११ वाजता मोझरी बायपास रोडवर करण्यात आली.आयशर ट्रक क्रमांक MH 40,CT-0172 या वाहनात १९ गिर जातीच्या गायीना वर्धा येथून अमरावतीच्या दिशेने रात्री ११ वाजताच्या दरम्यान निर्दयपणे कोंबून नेण्यात येत असल्याचे तिवसा पोलिसांच्या निदर्शनास येताच त्यांनी ट्रकचा पाठलाग करून पकडले व त्यातील १९



गोवंशाची गोरक्षनात रवानगी केली.ट्रक व जनावरे असा एकूण २६.२० लाखाचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. ही कारवाई तिवसा पो स्टे चे पोलीस निरीक्षक गोपाल उपाध्याय यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकाश सोनेवाने,रोशन आठवले,मोईन मांजरे यांनी केली.

तर दुसरी कारवाई मंगळवारी सकाळी ९ वाजताच्या दरम्यान तिवसा येथील पंचवटी चौकात वाहतूक पोलिसांनी केली.MH 27,BX-9793 या आयशर ट्रक मध्ये १२ गोवंश हे निर्दयपणे कोंबून नेण्यात येत होते.

पंचवटी चौकात कर्तव्यावर असलेले वाहतूक पोलीस शरद खेडकर,सागर डोंगरे,सागर क्षीरसागर यांच्या निदर्शनास हा प्रकार येताच त्यांनी सदर वाहन पकडले व त्यातील १२ गोवंशाची सुटका करून सुरक्षिततेच्या दृष्टीने गोरक्षनात रवानगी केली.याप्रकरणी पुढील तपास तिवसा पोलीस करीत आहे.

# अमोल चौकडे यांना तिफण गौरव पुरस्कार प्रदान



**चांदूर रेल्वे/ वार्ताहर**

चांदूर रेल्वे येथील तालुका कृषि अधिकारी कार्यालयातील अधिनस्थ सहाय्यक कृषि अधिकारी अमोल ज्ञानेश्वर चौकडे यांना तिफण गौरव पुरस्काराने पुणे येथे सन्मानित करण्यात आले.

राज्यातील कृषि विषयक विशेष कार्य करणाऱ्या कर्मचारी अधिकाऱ्यांना पूणे येथे या कृषी गौरव पुरस्कारांचे वितरण कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचे हस्ते करण्यात आले. परंतु काही अपरिहार्य कार्यामुळे कार्यक्रमात न पोहोचू शकल्यामुळे अमोल चौकडे यांना हा पुरस्कार तिफण फाउंडेशनचे सर्व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.सोयाबीन, तूर,कपाशी व हरभरा पिकांमधील सुधारित पीक पेरणी पद्धतीचा प्रचार प्रसार व अंमलबजावणी करणे. त्याचप्रमाणे कृषी माहिती वेगवेगळ्या स्वरूपात शेतकरी बांधवांना देण्याच्या पद्धतीमध्ये कार्टून चैनल ची निर्मिती व कार्टून द्वारा वेगवेगळ्या योजनांची तसेच पिकाच्या प्रत्येक परिस्थितीत उपयुक्त माहिती देणे,तसेच कृषि अधिकारी कृषि कर्मचारी व कृषि विभागातील इतर प्रकल्पातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना सर्व योजना विषयक मार्गदर्शन करण्याचे कार्य ते सतत करत असतात. त्याच प्रकारे पर्यावरण विषयक कार्यामध्ये बालसंस्कार शिबिरे, शाळा व इतर कृषि महोत्सवात मुलांना पाणी व मातीचे महत्त्व तसेच पर्यावरणात मित्र किडींचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्याचे कार्य ते सतत करत असतात. या कृषिविषयक सतत करण्यात येणाऱ्या उत्कृष्ट कार्यप्रणालीमुळे त्यांना महाराष्ट्र राज्यातून कृषि विस्तार कार्यासाठी गौरविण्यात आले.या गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांच्या कार्यक्षेत्रातील शेतकरी बंधू-भगिनी, कृषि कार्यालयातील सहकारी तसेच त्यांचा मांजरखेड व नागपूर येथील मित्रपरिवार यांनी त्यांचे कौतुक केले आहे.

### श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयामध्ये

# बी.पी.ई.एस. व डी.वाय.एड. अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

**अमरावती/ का.प्र.**

शैक्षणिक सत्र २०२६-२७ करिता स्थानिक श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालया मध्ये बी.पी.ई.एस. (Bachelor of Physical Education and Sports) या तीन वर्षीय पदवी अभ्यासक्रमास तसेच डी.वाय.एड. (Diploma in Yoga Education) या एक वर्षीय अभ्यासक्रमास प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली असून विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. क्रीडा व योग क्षेत्रात करिअर घडवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे.

त्या दृष्टिकोनातून महाविद्यालयात अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापकवर्ग, विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज व सुरक्षित वसतिगृह, विशाल क्रीडांगण, जिम्नॅस्टिक हॉल, बॅडमिंटन हॉल, जुडो हॉल, अद्यावत संगणक कक्ष व इंटरनेट सुविधा उपलब्ध आहेत. तसेच मानसशास्त्रीय प्रयोगशाळा, संशोधन केंद्र, क्रीडा साहित्य सुविधा, सुसज्ज ग्रंथालय, हेल्थ सेंटर, योगा हॉल, स्पोर्ट्स



सायन्स लॅब आणि स्विमिंग पूल यांसारख्या आधुनिक सुविधा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.बी.पी. ई.एस. अभ्यासक्रमासाठी १२ वी उत्तीर्ण (Arts, Commerce, Science, M.C.V.C.) विद्यार्थी पात्र असून डी.वाय.एड. अभ्यासक्रमासाठी बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.पी.ई. एस. व बी.पी.एड. उत्तीर्ण विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात. महाविद्यालय प्रशासनाने इच्छुक विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर प्रवेश निश्चित करून आवश्यक कागदपत्रांसह महाविद्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

**संपर्क क्रमांक :**
९८५०६ ७६८४९,
९०११३३३७३१,
९६३७८४०७५२,
९८९०६ ९१५४७

सदर अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासोबतच उत्कृष्ट शैक्षणिक व क्रीडा वातावरण उपलब्ध करून देण्याचा महाविद्यालयाचा प्रयत्न असल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे यांनी याप्रसंगी सांगितले.

# गोल्डन किड्सच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**अमरावती** - स्थानिक गोल्डन किड्स इंग्लिश हायस्कूल कॅम्पच्यावतीने नुकत्याच घोषित झालेल्या दहावीच्या निकालात घवघवीत यश मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला.संपूर्ण अमरावती बोर्डातून शाळेतून प्रथम आलेली युक्ती अविनाश भोगे ९९.४० टक्के, द्वितीय ईशा महेंद्र डाखरे ९८.६० टक्के, वीर विजय इपार ९८.६० टक्के, तृतीय अधिराज प्रवीण चहाकार ९८ टक्के व चतुर्थ मुग्धा प्रेमानंद पुसतकर ९७.४० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाली.या विद्यार्थ्यांचा संस्थेच्या सचिव हर्षदा पांडे, उपाध्यक्ष नंदा वासनकर, गोल्डन किड्स इंग्लिश हायस्कूलचे मुख्याध्यापक उमाशंकर सिंगरोल,

# अ.भा.ग्राहक कल्याण परिषदेच्या कार्याध्यक्षपदी ऋषिकेश ठेलकर



**अमरावती/ का.प्र.**

अखिल भारतीय ग्राहक कल्याण परिषद, अमरावती महानगर कार्यकारणीची महत्त्वपूर्ण बैठक १० मे २०२६ रोजी विश्रामगृह बडनेरा येथे उत्साहात पार पडली. राज्य अध्यक्ष गजानन मुदगल, राज्य कार्याध्यक्ष निलेश टवलारे, राज्य सचिव ॲड. प्रभाकर वानखडे, महानगर अध्यक्ष रोहन ढोमणे, बडनेरा अध्यक्ष संजय बिसेन व महिला अध्यक्ष अर्चना मावळे यांच्या नेतृत्वात ही बैठक पार पडली.

या बैठकीदरम्यान नव्या पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र व ओळखपत्र प्रदान करण्यात आले तसेच त्यांच्या जबाबदाऱ्यांची सोपवणूक करण्यात आली. महानगर अध्यक्ष म्हणून रोहन ढोमणे यांच्या नियुक्तीनंतर आता महानगर कार्याध्यक्षपदी ऋषिकेश ठेलकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.ऋषिकेश तेलकर हे भाजप युवा मोर्चा स्वामी विवेकानंद मंडळ अध्यक्ष आणि मेळघाट जिल्हा सचिव म्हणूनही कार्यरत असून सामाजिक व संघटनात्मक क्षेत्रात त्यांचा सक्रिय सहभाग आहे.

अखिल भारतीय ग्राहक कल्याण परिषदेसोबत काम करत ग्राहकांच्या हक्कांसाठी मोठा बदल घडवून आणण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यापुढे ग्राहक जनजागृती, तक्रार निवारण व संघटन विस्तारासाठी अधिक प्रभावीपणे काम करण्यात येणार असल्याचेही बैठकीत सांगण्यात आले.

# मातृदिनानिमित्त दहावी यशस्वीरीत्या उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार

**चांदूर बाजार/ वार्ताहर**

चांदूरबाजार येथील शहरांमध्ये संपूर्ण ठिकाणी मातृदिन संपूर्ण साजरा करत असताना चांदूरबाजार या ठिकाणी शहरात अध्यक्ष माननीय मनीषा नागलिया विदर्भ सरचिटणीस प्रहार हिना यांच्या नेतृत्वाखाली नुकत्याच झालेल्या दहावीच्या मुलांनी उत्कृष्ट गुण प्राप्त केल्याबद्दल त्यांच्या घरापर्यंत जाऊन त्यांचा सत्कार घेण्यात आला आहे सचीण संतोषशव जवजाल ९७-८०% , साक्षी, भागवत ९०%, आराध्या मस्के ८०.५०% , यांचा सर्वांचा सत्व करत असताना नगराध्यक्ष मनीषा नागलिया यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला आहे या सत्कार प्रसंगीत राहायच्या



पदाधिकारी महिला शहराध्यक्ष स्वाती बगीले सुजाता डोंगरी हर्षा देशमुख माधुरी पलके चित्रा कडू जोशी जळवा नगराध्यक्ष मनीषा नागलिया व डेल्टा मॅग विदर्भ सर्च झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आले.

# आर्टिफिशियल इंटेलिजन्स शिकून उत्तम रुग्णसेवेला पाठबळ द्या- डॉ. अविनाश सुपे

## AI डॉक्टरांची जागा घेईल का? या विषयावर TEDx DRGITR तर्फे एकदिवसीय व्याख्यानमाला

**अमरावती/ का.प्र.**

डॉ. राजेंद्र गोडे एज्युकेशनल कॅम्पस, अमरावती तर्फे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतात. विद्यार्थ्यांच्या तांत्रिक कौशल्यां सोबतच नेतृत्वगुण, सृजनशीलता, व्यक्तिमत्त्व विकास आणि व्यावसायिक क्षमतांचा विकास घडवून आणण्याच्या उद्देशाने संस्थेमार्फत वेळोवेळी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञांची व्याख्याने, कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रम तसेच प्रेरणादायी उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.याच उपक्रमांच्या मालिकेत डॉ. राजेंद्र गोडे एज्युकेशनल कॅम्पस, अमरावतीचे अध्यक्षयोगेंद्रजी गोडे यांच्या प्रेरणेतून, सचिव तन्वी गोडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्राचार्य डॉ. सागर सी. जिरापुरे यांच्या संकल्पनेतून TEDx DRGITR तर्फे AI डॉक्टरांची जागा घेईल का?' या विषयावर एकदिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम डॉ. राजेंद्र गोडे मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटल, अमरावती येथील 'सुश्रुत लेक्चर हॉल' येथे उत्साहात झाला.

या TEDx कार्यक्रमात प्रख्यात वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. अविनाश सुपे यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि वैद्यकीय क्षेत्रातील तिची भूमिका याविषयी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. AI डॉक्टरांची जागा घेऊ शकते का?' या अत्यंत समकालीन आणि चर्चेतील विषयावर त्यांनी आधुनिक आरोग्यव्यवस्था, तंत्रज्ञान आणि मानवी मूल्यांच्या संदर्भात महत्त्वपूर्ण विचार मांडले.आपल्या व्याख्यानात त्यांनीAI चे दोन महत्त्वाचे प्रकार सांगितले Discriminative AI आणि Generative AI यांविषयी माहिती दिली. ChatGPT सारख्या Generative AI साधनांच्या माध्यमातून माहिती, सूचना, कल्पना आणि विविध प्रकारचे विश्लेषण सहज शक्य होत असल्याचे त्यांनी सांगितले.'ँ चा वापर करणे थांबवू नका; त्याचा योग्य आणि जबाबदारीने उपयोग करायला शिका,' असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. AI च्या सहाय्याने 3D Visualization, रिपोर्ट जनरेश न, डेटा विश्लेषण आणि विविध क्लिनिकल प्रक्रिया अधिक कार्यक्षमतेने पार पाडता येतात, असे त्यांनी स्पष्ट केले.यावेळी त्यांनी चीनमधीलॅँ आधारित हॉस्पिटलचे उदाहरण देत सांगितले की, काही ठिकाणी AI आधारित रोबोट डॉक्टरांचा वापर सुरू झाला असला तरी वैद्यकीय क्षेत्रातील गुंतागुंतीच्या आणि संवेदनशील परिस्थितींमध्ये मानवी डॉक्टरांची भूमिका अद्यापही अत्यंत महत्त्वाची आहे. AI विविध क्लिनिकल डेटा आणि रिपीटेटिव्ह कामे प्रभावीपणे करू शकतो; मात्र रुग्णाच्या मानसिक स्थितीची समज, भावनिक आधार, विश्वास आणि मानवी संवाद यांची जागाँ घेऊ शकत नाही, असे त्यांनी नमूद केले.

डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील संवाद ही उपचार प्रक्रियेतील सर्वात महत्त्वाची बाब आहे ते म्हणाले. रुग्ण आपल्या समस्या, भीती आणि मानसिक स्थिती डॉक्टरांसमोर मोकळेप णाने व्यक्त करू शकतो; मात्र अशी संवेदनशीलता कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये संभवत नाही. विशेषतः मानसिक आरोग्य, गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया तसेच यकृतातील गाठींसारख्या गंभीर आजारांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता केवळ सहाय्यक भूमिका बजावू शकते; अंतिम निर्णय मात्र अनुभवी डॉक्टरांचाच असावा, असे त्यांनी स्पष्ट केले.तसेच रेडियोलॉजि, सिटी स्कॅन रिपोर्ट जनरेशन, क्लिनिकल डिजाइन वर्किंग आणि लो क्लिनिकल टास्क यांसारख्या क्षेत्रांमध्ये AI अत्यंत उपयुक्त ठरू शकतो. AI मुळे वैद्यकीय क्षेत्रातील काही वेळखाऊ आणि तांत्रिक कामे अधिक वेगाने व अचूक पद्धतीने पूर्ण होऊ शकतात. मात्र हाय क्लिनिकल टास्क मध्ये पूर्णपणे AI वर अवलंबून राहणे धोकादायक ठरू शकते आणि त्यामुळे रुग्णाच्या जीवितालाही धोका निर्माण होऊ शकतो, असे त्यांनी स्पष्टपणे नमूद केले.

डॉ. सुपे यांनीAI च्या मर्यादांवर भाष्य करताना सांगितले की, त्वचारोगशास्त्र सारख्या अनेक क्षेत्रांमध्ये अनुभवी फिजिशियनचे निरीक्षण आणि अनुभव आजही अधिक प्रभावी ठरतात. १९९० च्या दशकात ँला विरोध होता; मात्र आजAI दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनत चालला आहे. शिक्षण, वैद्यकीय अभ्यासक्रम, संशोधन आणि आरोग्य सेवा या सर्व क्षेत्रांमध्ये ँ चे एकत्रीकरण वाढत



असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमा दरम्यान त्यांनी विद्यार्थ्यांना 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स शिकून उत्तम रुग्णसेवेला पाठबळ द्या' हा महत्त्वपूर्ण संदेश दिला. कृत्रिम बुद्धिमत्ता ही डॉक्टरांची जागा घेणारी नसून सहाय्यक तंत्रज्ञान असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता क्लिनिकल सेवा, लक्षणांचे विश्लेषण, रेडिओलॉजी अहवाल तसेच शस्त्रक्रियेनंतरच्या सहाय्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावेल; मात्र 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स डॉक्टरांची जागा घेऊ शकत नाही' असे ठाम मत त्यांनी व्यक्त केले.या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांना AI आणि वैद्यकीय क्षेत्रातील नव्या तंत्रज्ञानाचे फायदे, मर्यादा आणि मानवी मूल्यांचे महत्त्व याविषयी सखोल मार्गदर्शन मिळाले. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सदर कार्यक्रम डॉ. राजेंद्र गोडे एज्युकेशनल कॅम्पस अंतर्गत कार्यरत डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, डॉ. राजेंद्र गोडे पॉलिटेक्निक, डॉ. राजेंद्र गोडे मेडिकल कॉलेज, डॉ. राजेंद्र गोडे आयुर्वेद कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, डॉ. राजेंद्र गोडे कॉलेज ऑफ फार्मसी तसेच डॉ. राजेंद्र गोडे नर्सिंग कॉलेज येथील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमाला डॉ. राजेंद्र गोडे एज्युकेशनल कॅम्पस, अमरावतीच्या सचिव तन्वी गोडे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. योगेशजी गोडे, डॉ. राजेंद्र गोडे मेडिकल कॉलेज चे डायरेक्टर डॉ. एस. एस. हटकर तसेच डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च चे प्राचार्य डॉ. सागर सी. जिरापुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यासोबतच संस्थेअंतर्गत कार्यरत सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, डीन, समन्वयक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजना साठी डॉ. सागर सी. जिरापुरे, डॉ. गौरव धाडसे, प्रा. रवि श्रीवास, डॉ. अमोल मोरे, डॉ. सरोदे, प्रा. वैभव फुलारी, प्रा. चिंचोलकर आणि प्रा. मेत्रे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# दोन मोजण्या - दोन निष्कर्ष...आता 'सॅटॅलाइट' मोजणीची मागणी!

## ETS मोजणीवरच संशय; आकाशातून होणारी मोजणीच ठरणार खरी परीक्षा

### गाजीपूर-रुदाळी खाण प्रकरण :

**अॅड. समीर ठाकूर**

**अकोला** : गाजीपूर-रुदाळी गौण खनिज उत्खनन प्रकरणात आता संशयाची सुई थेट ETS मोजणीकडे वळली असून, 'सत्य नेमके कुठे दडले आहे?' हा प्रश्न अधिक तीव्र झाला आहे. सार्वजनिक बांधकाम उपविभाग अकोट आणि उप अधीक्षक भूमी अभिलेख अकोट यांच्या संयुक्त मोजणीत मोठ्या प्रमाणावर अतिरिक्त उत्खननाचे संकेत समोर आले असताना, त्यानंतर झालेल्या ETS पुनर्मोजणीत अचानक निष्कर्ष बदलल्याची चर्चा रंगू लागली आहे. यामुळे आता या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र सॅटॅलाइट मोजणी करण्याची मागणी जोर धरू लागली असून, 'जमिनीवरील मोजणीत जर संशय असेल, तर सत्य आकाशातून शोधा,' अशी भूमिका सुज्ञ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि पर्यावरणप्रेमींनी घेतली आहे. विशेष म्हणजे, दोन सरकारी यंत्रणांच्या मोजणीत इतका मोठा फरक निर्माण होणे हे केवळ तांत्रिक चूक म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही, असे मत तज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे. कारण पहिल्या संयुक्त मोजणीनंतर महसूल विभागाने संबंधित खाणधारकांना पत्र वजा नोटिसा बजावल्या होत्या. म्हणजेच त्या वेळी प्रशासनाने ती मोजणी अधिकृत आणि ग्राह्य मानली होती. मात्र नंतर ETS मोजणी समोर आल्यानंतर अचानक परिस्थिती बदलू लागली. यामुळे 'नेमके कोणते सत्य अधिकृत मानायचे?' हा प्रश्न आता जनतेसमोर उभा ठाकला आहे.

दरम्यान, या प्रकरणात उच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली किंवा स्वतंत्र विशेष तपास पथकामार्फत चौकशी करून सॅटॅलाइट मोजणी तातडीने करण्यात यावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. कारण हा प्रश्न केवळ एका खाणीचा नसून ; शासनाच्या विश्वासार्हतेचा, नैसर्गिक संपत्तीच्या संरक्षणाचा आणि प्रशासनातील पारदर्शकतेचा असल्याचे ठाम मत सुज्ञ नागरिक, पर्यावरणप्रेमी यांनी व्यक्त केले आहे.

### सॅटॅलाइट मोजणीच ठरू शकते निर्णायक?

या प्रकरणात आता सॅटॅलाइट इमेजिंग आणि रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानाद्वारे स्वतंत्र मोजणी करण्याची मागणी जोर धरत आहे. कारण सॅटॅलाइट मोजणीमध्ये विशिष्ट कालखंडातील भूभागातील बदल, उत्खननाची खोली, क्षेत्रफळातील बदल, डोंगरांच्या रचनेतील फरक आणि नैसर्गिक प्रवाहांमध्ये झालेला बदल अत्यंत स्पष्टपणे नोंदवला जाऊ शकतो. विशेष म्हणजे, ही प्रक्रिया मानवी हस्तक्षेपापासून तुलनेने मुक्त मानली जाते.

तज्ज्ञांच्या मते, जर सन २०२३ ते २०२५ या कालावधीतील सॅटॅलाइट प्रतिमांचे विश्लेषण करण्यात आले, तर कोणत्या खाणीत किती उत्खनन झाले, मूळ भूभाग किती बदलला आणि प्रत्यक्षात किती खनिज बाहेर काढले गेले, याचे अचूक चित्र समोर येऊ शकते. त्यामुळेच आता 'संयुक्त मोजणी की ETS?' या वादाचा निकाल सॅटॅलाइट तंत्रज्ञानातूनच लागू शकतो, अशी भावना बळावत आहे.

### ■ ETS मोजणी की व्यवस्थापित गणित?

स्थानिक स्तरावर ETS मोजणीबाबत संशयाचे वातावरण अधिक तीव्र होत आहे. कारण पहिल्या अहवालानंतर ज्या खाणींवर मोठ्या दंडवसुलीची शक्यता निर्माण झाली होती, त्याच प्रकरणात पुनर्मोजणीनंतर अचानक दिलासादायक चित्र निर्माण होत असल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. तज्ज्ञांच्या मते, कोणतीही डिजिटल मोजणी पूर्णपणे यंत्राधारित असली, तरी तिचा अंतिम निष्कर्ष हा इनपुट डेटावर अवलंबून असतो. बेस पॉइंट्स, मूळ भूस्तर, संदर्भ नकाशे किंवा उत्खननाची सुरुवातीची पातळी यामध्ये बदल झाल्यास संपूर्ण निकाल बदलू शकतो. त्यामुळे 'तंत्रज्ञानाचा वापर सत्य उघड करण्यासाठी झाला की सत्य झाकण्यासाठी?' हा प्रश्न आता अधिक तीव्रतेने विचारला जात आहे.

### ■ महसूल वाचविण्याचा खेळ की सत्य दडपण्याचा प्रयत्न?

गाजीपूर-रुदाळी परिसरातील उत्खनन हा केवळ स्थानिक प्रश्न राहिलेला नाही. शासनाचा संभाव्य महसूल, पर्यावरणीय हानी, डोंगरांची होत असलेली नासधूस आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा प्रश्न यामुळे हे प्रकरण आता राज्यस्तरीय चर्चेचा विषय बनू लागले आहे.

स्थानिकांच्या मते, जर पहिल्या संयुक्त मोजणीनुसार अतिरिक्त उत्खनन सिद्ध झाले, तर शासनाकडे कोट्यवधी नव्हे तर अरबो रुपयांचा दंड जमा होऊ शकतो. त्यामुळेच आता 'मोजण्या बदलल्या की वास्तव बदलते का?' असा उपरोधिक सवाल उपस्थित होत आहे.

### ■ प्रशासन मौन...संशय अधिक गडद

या संपूर्ण प्रकरणात महसूल प्रशासनाची भूमिका अधिकाधिक संशयास्पद ठरत चालली आहे. कारण एवढ्या गंभीर आरोपांनंतरही अधिकृत खुलासा समोर आलेला नाही. उलट अधिकारी प्रतिक्रिया देण्याचे टाळत असल्याने 'मौनामागे नेमके कोणाचे संरक्षण?' असा प्रश्न आता उघडपणे विचारला जात आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, जर प्रशासनाकडे सर्व काही पारदर्शक आणि नियमबद्ध असल्याचे पुरावे असतील, तर त्यांनी सॅटॅलाइट मोजणीस विरोध करण्याचे कारणच नाही. उलट अशा स्वतंत्र तपासणीमुळे प्रशासनावरील संशय दूर होण्यास मदत होईल. मात्र जर यालाही विरोध झाला, तर संशय आणखी बळावणार असल्याची चर्चा आता परिसरात सुरू झाली आहे.

# कोणार्कचे ट्रक चालक व स्वच्छता कामगार संपावर

## थकीत वेतनासाठी इर्विन चौकात आंदोलन



**अमरावती/प्रतिनिधीः-**

शहरात कचरा संकलनाचा प्रश्न एकदा पुन्हा गंभीर होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. कोणार्क कंपनीच्या कंत्राटदाराकडे कार्यरत असलेल्या शंभरहून अधिक ट्रक चालक आणि स्वच्छता कामगारांनी आज मंगळवार १२ मे पासून थकीत वेतनासाठी अचानक संप पुकारला आहे. कर्मचाऱ्यांनी दोन महिन्याचे वेतन न मिळाल्याचा आरोप करत इरविन चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर परिसरात ठिया आंदोलन सुरू केले आहे. कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे की गेल्या दोन महिन्यापासून त्यांना वेतन मिळाले नाही आहे. यामुळे घर खर्च करणे, कर्जाचे हप्ते भरणे, कुटुंबाचे उदरनिर्वाह करणे कठीण झाले आहे. चालकांनी वेतनासोबत अनेक मूलभूत सुविधा बाबत गंभीर तक्रारी केल्या आहे. पीएफ कपातीची स्पष्ट माहिती दिली जात नाही. इन्शुरन्स सुविधा उपलब्ध नाही. ओव्हरटाईम चे ☞(पान २ वर)

# अमरावतीवरून अपहृत तरुणी नागपूर स्टेशनवरून रेस्क्यू

## गाडगे नगर पोलिसांची यशस्वी कामगिरी

**अमरावती/प्रतिनिधीः-**

शहरातून अपहरण झालेल्या १७ वर्षीय अल्पवयीन तरुणीला गाडगे नगर पोलिसांनी तीन तासात शोधले आणि तिला आई-वडिलांच्या स्वाधीन केले. गाडगे नगर पोलीस आणि डायल ११२ यंत्रणेमुळे हे शक्य झाले.




माहितीनुसार पीडित तरुणी भातकुली तालुक्यातील रहिवासी आहे. ती शहरात राहून पोलीस भरतीची तयारी करत आहे. गाडगे नगर परिसरात तीने क्लास लावले आहे. सकाळी सहा वाजता जाऊन ती दुपारी बारा वाजता घरी परत येते. सोमवारी दुपारी ती परत नाही आली आणि आईच्या मोबाईलवर तिचा मेसेज आला की, कोणी तरी तिचे अपहरण केले आहे आणि तिला गाडीमध्ये बसवून घेऊन जात आहे, कोणाला मदतीसाठी पाठव. त्यामुळे कुटुंबातील लोक घाबरले. त्यांनी डायल ११२ वर फोन करून घटनेची माहिती दिली. दुसरीकडे क्लास मधून माहिती मिळाली की, सोमवारी सकाळी ती क्लासमध्ये आली नाही. यामुळे तिचे ☞(पान २ वर)

# चांदुर रेल्वे पोलिसांनी १ कोटींचा गुटका केला जप्त



## एसपींच्या सूचनेवर कारवाई; चालक अटकेत, तीन ते चार आरोपी फरार

**अमरावती/प्रतिनिधीः-**

ग्रामीण पोलिसांनी अवैध अंमली पदार्थाविरोधात मोठी कारवाई करत गुटखा तस्करीच्या रॅकेटला जबर धक्का दिला आहे. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे चांदूर रेल्वे पोलिसांनी सापळा रचून सुमारे १ कोटी १ लाख ३५ हजार रुपयांचा १० टन गुटखा, तंबाखू आणि ट्रक जप्त केला. एवढ्या मोठ्या प्रमाणात अमरावतीत येणारा गुटखा नेमका कुणाचा होता, याचा तपास पोलिसांकडून सुरू असून या कारवाईमुळे गुटखा व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई १२ मे रोजी पहाटे करण्यात आली. माहिती मिळताच चांदूर रेल्वे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजय आकरे यांनी पथकासह तातडीने पाठलाग करून मालखेड मार्ग परिसरात एमएच ०१/सीव्ही ४९६२ क्रमांकाचा ट्रक घेराव घालून पकडला. सुरवातीला चालकाची चौकशी ☞(पान २ वर)

# कर्जाच्या विळख्यात अडकलेल्या युवा शेतकऱ्याची आत्महत्या

## -शेंदुरजनाघाट परिसरात हळहळ

शेंदुरजनाघाट/प्रतिनिधीः-

सततची नापिकी, वाढते कर्ज आणि आर्थिक संकटाच्या छायेत जगणाऱ्या एका युवा शेतकऱ्याने विष प्राशन करून जीवन संपवल्याची हृदयद्रावक घटना शेंदुरजनाघाट येथे घडली. अक्षय पुंडलिक पाटील (वय ३३) असे मृत शेतकऱ्याचे नाव असून, त्यांच्या निधनामुळे गावात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अक्षय पाटील यांची सतनूर शिवारात शेती असून मागील काही हंगामांपासून पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत होते. उत्पादन घटल्याने आर्थिक अडचणी वाढत गेल्या आणि कर्जाचा बोजाही दिवसेंदिवस वाढत होता. या सततच्या तणावामुळे ते मानसिकदृष्ट्या खचले होते. शनिवारी सकाळी सुमारे ८ वाजताच्या दरम्यान अक्षय घराबाहेर गेले. त्यानंतर त्यांनी विषारी औषध प्राशन केल्याचे सांगण्यात येत आहे. काही वेळाने ते घरी परतले असता त्यांची प्रकृती अचानक बिघडू लागली. कुटुंबीयांनी विचारपूस केली असता त्यांनी विष घेतल्याची कबुली दिली. घटनेनंतर कुटुंबीयांनी त्यांना तातडीने वरुड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात हलवण्याचा सल्ला दिला. अमरावतीला ☞(पान २ वर)

# पालकमंत्र्यांच्या आदेशावर गुप्तचर अधिकारी निलंबीत

## खासदारांसोबत चर्चा करताना काढला होता व्हिडिओ

**अमरावती/प्रतिनिधीः-**

भाजपा शहराध्यक्ष व विदर्भयुथ वेल्फेअर सोसायटी चे अध्यक्ष डॉ.नितीन धांडे यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळ्याचे संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे सोमवारी रात्री आयोजन करण्यात आले होते. सोहळा झाल्यावर पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्यामध्ये गोपनीय चर्चा सुरू होती. त्यावेळी गाडगे नगर पोलीस ठाण्याच्या गुप्तचर विभागाचे अधिका-याने या चर्चेचे व्हिडिओ काढले होते. या मुळे पालकमंत्री यांनी त्यांचे निलंबन करण्याचे आदेश दिले. यामुळे पोलीस विभागात एकच खळबळ उडाली. रात्री २ वाजता निलंबनाचे हे आदेश काढण्यात आले आहे. माहितीनुसार सोमवारी सायंकाळी सांस्कृतिक भवन येथे डॉक्टर नितीन धांडे यांचा अभिष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला होता. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे या कार्यक्रमात मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. व्यासपीठावर खासदार डॉक्टर अनिल बोंडे, माजी खासदार नवनीत राणांसह आमदार व भाजप पदाधिकारी उपस्थित होते. रात्री ९ वाजता हा कार्यक्रम झाल्यावर पालकमंत्री बाहेर जात होते. त्यावेळी दरवाज्यावर ते खासदार अनिल बोंडे यांच्याशी गोपनीय चर्चा करण्यासाठी थांबले. मीडिया प्रतिनिधीनाही त्यांनी तेथून जाण्याचे ☞(पान २ वर)

# एकाच झाडावर दोन मित्रांनी घेतला गळफास

## दोन दिवसापासून होते घरून बेपत्ता

**अकोला/प्रतिनिधीः-**

बार्शीटाकळी पोलीस स्टेशन हद्दीत दोन मित्रांनी एकाच दोरीच्या साहाय्याने झाडाला गळफास घेत आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मृतकांमध्ये किशोर बळीराम सोनटक्के (वय ४०, रा. कानडी, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला) आणि किशोर मारोती बोडखे (५५, रा. वरुड, ता. मंगरूळपीर, जि. वाशिम) यांचा समावेश आहे. माहितीनुसार, दोन्ही मृतक ९ मे पासून घरातून निघून गेले होते. त्यानंतर त्यांच्या नातेवाईकांनी शोध घेतला मात्र ते कुठेच आढळून आले नाहीत. त्यामुळे मृतक किशोर सोनटक्के यांच्याबाबत पिंजर पोलीस स्टेशन येथे १० मे रोजी मिसिंग तक्रार दाखल करण्यात आली होती. तर दुसरे मृतक किशोर बोडखे यांच्याबाबत मंगरूळपीर पोलीस स्टेशनमध्ये बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली होती. दरम्यान, १० मे रोजी मृतक किशोर



सोनटक्के यांचा भाचा रोहन दत्तात्रय महल्ले, रा. शेलू (खुर्द), ता. बार्शीटाकळी याला त्याच्या मामाने व्हॉट्सअॅपवर एक चिठ्ठी पाठवली असल्याची माहिती समोर आली. माहितीनुसार, दोन्ही मृतकांनी महान धरणाजवळील जंगल परिसरातील बिहाड माथा शेतशिवारात एका निंबाच्या झाडाला एकाच दोरीच्या टोकाने गळफास घेत आत्महत्या केली. या घटनेनंतर ☞(पान २ वर)

# बंगाली व्यापारी हत्या प्रकरण आणखी ३ गजाआड

## उत्सव मेल्यात पैशावरून झाला होता वाद

**अमरावती/प्रतिनिधीः-** सायन्स कोर मैदानात सुरू असलेल्या उत्सव मेल्यात पैशाच्या व्यवहारावरून झालेल्या वादात पश्चिम बंगालच्या व्यापाऱ्याची हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात पोलिसांनी आज मंगळवार १२ मे रोजी कारवाई करत मेला संचालक रहीम खान याच्या तीन भावांना ताब्यात घेतले आहे. या प्रकरणात आता आरोपींची संख्या एकूण चार झालेली आहे.मुख्य आरोपी रहिम आणि हाफिज अजूनही फरार असल्याची माहिती आहे. त्यांचा शोध पोलीस घेत आहे. अमीर खान युसुफ खान (वय ३१), अहमद खान युसुफ खान (वय ३३) व एहफाज खान युसुफ खान (वय २९,सर्व राहणार नागोबा ओटा, रतनगंज) असे अटक आरोपींची नावे आहे. यापूर्वी आरोपी अजित खान युसुफ खान (वय ३८) याला ताब्यात घेतले होते. माहिती नुसार शुक्रवार ८ मे रोजी रात्री उत्सव मेल्यात पैशांच्या ☞(पान २ वर)








आमच्या आई स्वर्गीय श्रीमती मालतीबाई मनोहर जोशी यांना १३ मे २०२६ या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण.

सदैव ऋणी
श्रीराम - सौ प्राजक्ता जोशी
(मुलगा - सून)
अधिरथ - सौ प्रांजली पेंडसे
(जावई - नात)
व समस्त जोशी - पेंडसे परिवार

